# कृषि पणन विषयक बातम्या : फेब्रुवारी 2025

मराठी दैनिक

विश्वेश्वर

RNI No. MAHMAR/2006/19129




वर्ष १९ ● अंक ७५ ● दैनिक, पुणे, मंगळवार २५ फेब्रुवारी २०२५ ● पाने : ६ ● किंमत ३ रुपये

## शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून राज्यातील बाजार समित्या सक्षम करणार; अर्थसंकल्पात हक्काचा निधी देण्यासाठी प्रयत्न करणार - पणन मंत्री जयकुमार रावल





पुणे : बाजार समित्या या कृषि पणन व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. अगदी कोरोनाच्या काळातही सर्व व्यवहार ठप्प असतांनाही, बाजार समित्यांनी शेतमालाचा पुरवठा साखळी कार्यक्षमपणे हाताळून सुरळीत राखली. त्याची सरकारने, जागतिक बँकेने व प्रसार माध्यमांनीही दखल घेतली आहे.त्यामुळे राज्यातील बाजार समित्यांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. महाराष्ट्र हे मोठे कृषी निर्यातदार राज्य आहे. जागतिक बाजार समितीच्या धर्तीवर राज्याची पणन व्यवस्था स्पर्धात्मक करणे आवश्यक असून शेतकऱ्यांना केंद्र मानून राज्याच्या बाजार समित्या सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणार आहे, असे प्रतिपादन पणन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी केले. तसेच परिषदेत मांडलेल्या सकारात्मक सूचना व्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणार आहेत. त्याचप्रमाणे बाजार समित्यांना अर्थसंकल्पात हक्काचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्यावतीने आयोजित कृषी उत्पन्न बाजार समित्यांची राज्यस्तरीय पणन परिषदेच्यावेळी उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, आमदार चरणसिंह ठाकूर, आ.दिलीप बनकर, आ.अनुराधा चव्हाण, सहकार आयुक्त दीपक तावरे, कृषी पणन संचालक विकास रसाळ, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे तसेच राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक व सचिव आदी उपस्थित होते.

मंत्री रावल पुढे म्हणाले की, शेतमालाच्या उत्पादनाच्या बाबतीत आपण जरी आघाडीवर असलो तरी त्याची सक्षम पणन व्यवस्था निर्माण करण्याच्या अनुषंगाने काम करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाला किफायतशीर भाव मिळण्यासाठी पणन व्यवस्थेला अधिक स्पर्धात्मक करणे आवश्यक आहे. सुयोग्य पणन सुविधांच्या अभावामुळे शेतमालाची काही प्रमाणात सुगी पश्चात हानी होते. पश्चात अवकाळी पाऊस, गारपीट यासारख्या नैसर्गिक आपत्ती, व शेतमालाची अशास्त्रीय वाहतूक व हाताळणीमुळे होणारे नुकसान टाळण्याकरीता प्रयत्न करावे.

राज्यातील बहुतांश बाजार समित्यांच्या मालकीच्या जमीनी गावातील किंवा शहरातील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असून, त्यांचा विकास करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी स्थानिक गरजा लक्षात घेऊन व्यवसाय विकास आराखडे तयार करावे. कालबद्ध कार्यक्रम राबवून ते अंमलात आणले पाहिजे, राज्यामध्ये एकूण ३०५ कृषि उत्पन्न बाजार समित्या व त्यांचे ६२५ उपबाजार आवार कार्यरत आहेत. राज्यातील काही आदिवासी भागात व राज्यातील ६९ तालुक्यांमध्ये नव्याने बाजार समिती नव्याने निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीने अधिकाधिक शेतमाल बाजार समिती आवारात विक्रीसाठी येण्याकरीता शेतकऱ्यांना विविध सोई-सुविधा, शेतकऱ्यांचे संपर्क व प्रबोधन, शेतकऱ्यास शेतमालाचे पैसे देण्याबाबत संरक्षण, शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन शेतमाल संकलन व माफक दरात वाहतूक, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेती विषयक व प्रक्रिया विषयक तंत्रज्ञान याची उपलब्धता व माहिती देणे, अधिनस्त बाजार घटकांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे, बाजार समितीची व्यावसायिक उत्पन्न वाढीसाठी गोदाम व शीतगृह उभारणी, निर्यातीसाठी मूलभूत सुविधा निर्माण करणे, ग्रेडींग, स्टोअरेज, पॅकींग इत्यादींनी प्रोत्साहन देणे स्वतःचा व्यवसाय विकास आराखडा तयार करून त्याची कालबद्ध अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

जागतीक पातळीवर अनेक राष्ट्रांनी त्यांच्या अन्नधान्य साठवण मध्ये वाढ केल्यामुळे कृषि पणन क्षेत्राचे महत्त्व अधोरेखीत झाले आहे. कृषि पणन क्षेत्र हे शाश्वत विकासाचे क्षेत्र असल्याने मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येऊ लागली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर माहिती तंत्रज्ञानाचा वापर, कमोडीटी मार्केटस, फ्युचर व फॉरवर्ड मार्केटींग, ऑनलाईन मार्केटींग, विविध प्रमाणीकरण, पॅकेजींग इत्यादी तरतुदींमुळे आव्हाने निर्माण झाल्यामुळे उत्पादक शेतकऱ्यांबरोबरच कृषि पणन व्यवस्थेला आधुनिकतेची कास धरणे आवश्यक झालेले आहे. शेतीमालाची विक्री व्यवस्था निर्माण करणे हे बाजार समित्यांच्या स्थापनेच्या वेळचे उद्दीष्ट होते. तथापि सध्याच्या बदलत्या जागतिकीकरण व उदारीकरणाच्या वातावरणात बाजार समित्यांनी त्यांच्या कामकाजात आवश्यक बदल करणे गरजेचे आहे.

कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी भविष्यात अधिकाधिक पारदर्शकता ठेवून व शेतकऱ्यांना आधुनिक सुविधा पुरवून आकर्षित केले पाहीजे. अजूनही बऱ्याच बाजार समित्यांच्या बाजार आवारांत पारदर्शक विक्री व्यवहार होत नाहीत. बाजार आवारात विक्रीसाठी आलेल्या शेतमालाचे योग्य वजन, शेतमालाला वाजवी भाव व शेतमाल खरेदीचे चुकारे वेळेत करणे याची सुनियोजित व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. बाजार समितीने बाजार आवारात जास्तीत जास्त शेतमाल विक्रीसाठी येईल यासाठी शेतकऱ्यांशी संपर्क वाढवून त्यांचेसोबत उत्तम समन्वय ठेवणे आवश्यक आहे.

**ॲमेस्टरडॅम व पॅरिस बाजारपेठांच्या धर्तीवर राज्यात ही आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्केट उभारणार - पणन मंत्री जयकुमार रावल**

मोबाईल ॲप, बाजार आवारांतील आधुनिक डिस्प्ले सिस्टीम यांचा वापर करून राज्यातील व देशातील शेतमालाची आवक, बाजारभाव, तसेच इतर आवश्यक माहितीचा रिअल टाईम डेटा सर्व बाजार घटकांना सार्वजनिक रित्या उपलब्ध करून दिला पाहिजे. कृषि पणन व्यवस्थेतील आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत वेगाने काम झाले पाहिजे. त्यादृष्टीने पहिले पाऊल म्हणून राज्याचे मुख्यमंत्री यांचे कडून मंजूर पणन विभागाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमात राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाची बाजार समिती उभारणे या विषयाचा समावेश करणेत आलेला आहे. या अंतर्गत अल्समीर, ॲमेस्टरडॅम, रुंगीश, पॅरिस बाजार पेठ या आधुनिक बाजारपेठांच्या धर्तीवर राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्केट उभारणेचा राज्य शासनाचा विचार आहे. त्यासाठी आवश्यक सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडून तयार करणेत येत आहेत, असेही मंत्री श्री. रावल म्हणाले.

**शेतकऱ्यांना सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीने काम करावे : कृषीमंत्री ॲड.माणिकराव कोकाटे**

शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासोबतच त्यांच्या शेतमालाला संरक्षण देण्याकरीता विविध सोई-सुविधा उपलब्ध करून देण्याचे कृषी उत्पन्न बाजार समितीने काम करावे, असे प्रतिपादन कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केले.

शेतकऱ्यांना शेतमालाची विक्री केल्यानंतर त्यांना शाश्वती वाटली पाहिजे. शेतकरी विश्वासाने माल विक्री करतात ते पूर्णतः विक्री व्यवस्थेवर अवलंबून असतो. त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

व्यापाऱ्यांनी व्यापाऱ्यांची कृषी उत्पन्न बाजार समितीकडे नोंदणी करणे, त्यांच्याकडून आवश्यकतेनुसार काही रक्कम अनामत रक्कम म्हणून जमा करून घेणे, खरेदी-विक्री व्यवहाराची माहिती, कर्जफेडीची क्षमता आदीबाबत पणन विभागाने विचार करावा.

शेतकऱ्यांनी पारंपरिक शेती ऐवजी सेंद्रीय शेती करण्यावर भर दिला पाहिजे. कृषी क्षेत्रात विविध उपक्रमशील प्रयोग करण्यात येत होत असून त्याचा शेतकऱ्यांना लाभ होईल यादृष्टीने काम केले पाहिजे. शेतकरी चांगल्या प्रतीच्या शेतमालाचे उत्पादन करीत असतात, त्यांनी जनजागृती केली पाहिजे. कृषी उत्पन्न बाजार समितीने राज्यात शेतकरी विक्री केंद्र निर्माण केले पाहिजे.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात दर्शनी भागात मोठ्या आकाराचा एलईडी पडदा लावून त्यावर शेतमालाचे भाव, कृषी विषयक योजनांची माहिती, पर्जन्यमान, हवामान अंदाज आदीबाबत माहिती प्रकाशित केली पाहिजे.

राज्यात विविध ठिकाणी कृषी विभागाच्या जागेबाबत कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने करण्यात येणाऱ्या मागणीबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल. शेतकरी प्रगतशील असून त्यांच्या शेतमालाला भाव मिळवून देण्यासोबतच त्यांच्या मनातील अस्थिरता कमी करण्याकरीता कृषी व पणन विभागाच्या समन्वयाने येत्या काळात नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येईल, असेही ॲड. कोकाटे म्हणाले.

श्री. कदम म्हणाले, राज्यातील बाजार समित्यांच्या विविध विषयांसंदर्भात संवाद साधण्यासाठी येथे बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. राज्यात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पादित मालाला भाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे, असेही श्री. कदम म्हणाले. श्री. रावल यांच्या हस्ते २० वर्षांपासून अधिक कार्यकाळ पूर्ण केलेल्या सभापतींचा सन्मान करण्यात आले. यावेळी बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीची वाटचाल आणि कामकाजाबाबत चित्रफीत दाखविण्यात आली.

मुंबई तरुण भारत
Pune Edition | 2025-02-25 | Page- 2
epaper.mahamtb.con

# राज्यात बाजारसमित्या सक्षम करणार

## पणनमंत्री जयकुमार रावल : बाजारसमित्यांना निधीसाठी प्रयत्न करणार

**पुणे, दि. २४ : प्रतिनिधी**

''बाजारसमित्या या कृषिपणन व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. अगदी कोरोनाच्या काळातही सर्व व्यवहार ठप्प असतानाही बाजारसमित्यांनी शेतमालाची पुरवठासाखळी कार्यक्षमपणे हाताळून सुरळीत राखली. त्यामुळे राज्यातील बाजारसमितीचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. महाराष्ट्र हे मोठे कृषिनिर्यातदार राज्य आहे. जागतिक बाजारसमितीच्या धर्तीवर राज्याची पणनव्यवस्था स्पर्धात्मक करणे आवश्यक असून शेतकऱ्यांना केंद्र मानून राज्याच्या बाजारसमित्या सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणार आहे,'' असे प्रतिपादन पणनमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

तसेच ''परिषदेत मांडलेल्या सकारात्मक सूचनांच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणार आहोत. त्याचप्रमाणे बाजारसमित्यांना अर्थसंकल्पात हक्काचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार,'' असे ही त्यांनी सांगितले.



कृषी उत्पन्न बाजारसमित्यांची राज्यस्तरीय पणन परिषदेवेळी उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, आ. चरणसिंह ठाकूर, आ. दिलीप बनकर, आ. अनुराधा चव्हाण, सहकार आयुक्त दीपक तावरे, कृषी पणन संचालक विकास रसाळ, 'महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळा'चे व्यवस्थापकीय संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे तसेच राज्यातील सर्व बाजारसमित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक व सचिव आदी उपस्थित होते.

यावेळी ''शेतकऱ्यांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजारसमितीने काम करावे,'' असे आवाहन कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केले. यावेळी बोलताना कदम म्हणाले की, ''राज्यातील बाजारसमित्यांच्या विविध विषयांसंदर्भात संवाद साधण्यासाठी येथे बाजारसमित्यांच्या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले.''

Powered by Bharati Web

Lokmanya Sanjwarta, 25/02/2025

# शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून राज्यातील बाजार समित्या सक्षम करणार

## पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते कृषी उत्पन्न बाजार समित्यांची राज्यस्तरीय पणन परिषद पुण्यात संपन्न

**पुणे (दैनिक लोकमान्य सांजवार्ता प्रतिनिधी) :** बाजार समित्या या कृषि पणन व्यवस्थेचा महत्वाचा घटक आहे. अगदी कोरोनाच्या काळातही सर्व व्यवहार ठप्प असतांनाही, बाजार समित्यांनी शेतमालाची पुरवठा साखळी कार्यक्षमपणे हाताळून सुरळीत राखली. त्याची सरकारने, जागतिक बँकेने व प्रसार माध्यमांनीही दखल घेतली आहे,त्यामुळे राज्यातील बाजार समितीचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. महाराष्ट्र हे मोठे कृषी निर्यातदार राज्य आहे.जागतिक बाजार समितीच्या धरतीवर राज्याची पणन व्यवस्था स्पर्धात्मक करणे आवश्यक असून शेतकऱ्यांना केंद्र मानून राज्याच्या बाजार समित्या सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणार आहे, असे प्रतिपादन पणन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी केले. तसेच परिषदेत मांडलेल्या सकारात्मक सूचना च्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणार आहेत. त्याचप्रमाणे बाजार समित्यांना अर्थसंकल्पात हक्काचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ही त्यांनी सांगितले.



जयकुमार रावल

कृषी उत्पन्न बाजार समित्यांची राज्यस्तरीय पणन परिषदेच्यावेळी उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, आमदार चरणसिंह ठाकूर, आ.दिलीप बनकर, आ.अनुराधा चव्हाण, सहकार आयुक्त दीपक तावरे, कृषी पणन संचालक विकास रसाळ, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे तसेच राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक व सचिव आदी उपस्थित होते.

मंत्री ना. रावल पुढे म्हणाले की, शेतमालाच्या उत्पादनाच्या बाबतीत आपण जरी आघाडीवर असलो तरी त्याची सक्षम पणन व्यवस्था निर्माण करण्याच्या अनुषंगाने काम करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाला किफायतशीर भाव मिळण्यासाठी पणन व्यवस्थेला अधिक स्पर्धात्मक करणे आवश्यक आहे. सुयोग्य पणन सुविधांच्या अभावामुळे शेतमालाची काही प्रमाणावर सुगी पश्चात हानी होते. प्रत्यक्षात अवकाळी पाऊस, गारपीट यासारख्या नैसर्गिक आपत्ती, व शेतमालाची अशास्त्रीय वाहतूक व हाताळणीमुळे होणारे नुकसान टाळण्याकरीता प्रयत्न करावे.

राज्यातील बहुतांश बाजार समित्यांच्या मालकीच्या जमीनी गावातील किंवा शहरातील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असून, त्यांचा विकास करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी स्थानिक गरजा लक्षात घेवून व्यवसाय विकास आराखडे तयार करावे. कालबध्द कार्यक्रम राबवून ते अंमलात आणले पाहिजे, राज्यामध्ये एकूण ३०५ कृषि उत्पन्न बाजार समित्या व त्यांचे ६२५ उपबाजार आवार कार्यरत आहेत. राज्यातील काही आदिवासी भागात व राज्यातील ६९ तालुक्यांमध्ये नव्याने बाजार समिती नव्याने निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मोबाईल ॲप, बाजार आवारांतील आधुनिक डिस्प्ले सिस्टीम यांचा वापर करुन राज्यातील व देशातील शेतमालाची आवक, बाजारभाव, तसेच इतर आवश्यक माहितीचा सर्व बाजार घटकांना सार्वजनीक रित्या उपलब्ध करुन दिला पाहिजे. कृषि पणन व्यवस्थेतील आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत वेगाने काम झाले पाहिजे, असेही रावल सांगितले.

सामना

# बाजार समित्यांनी व्यवसायविकास आराखडे तयार करावेत



पुणे, दि. २४ (प्रतिनिधी) – 'बाजार समित्या या कृषी पणन व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. राज्यातील बहुतांशी बाजार समित्यांच्या मालकीच्या जमिनी गावातील किंवा शहरातील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असून, त्यांचा विकास करण्यासाठी बाजार समित्यांनी स्थानिक गरजा लक्षात घेऊन व्यवसायविकास आराखडे तयार करून त्याची कालबद्ध अंमलबजावणी करणे आवश्यक आहे,' असे मत पणनमंत्री तथा पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी केले. परिषदेत मांडलेल्या सकारात्मक सूचनांबाबत धोरणात्मक निर्णय घेणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने आयोजित कृषी उत्पन्न बाजार समित्यांची राज्यस्तरीय पणन परिषदेच्या वेळी उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, आमदार चरणसिंह ठाकुर, दिलीप बनकर, अनुराधा चव्हाण, सहकार आयुक्त दीपक तावरे, राज्याचे पणन संचालक विकास रसाळ, पणन मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, पुणे बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर यांच्यासह राज्यातील विविध बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक, सचिव उपस्थित होते.

रावल म्हणाले, सुयोग्य पणन सुविधांच्या अभावामुळे शेतमालाची काही प्रमाणावर सुगीपश्चात हानी होते. प्रत्यक्षात अवकाळी पाऊस, गारपीट यांसारख्या नैसर्गिक आपत्ती व शेतमालाची अशास्त्रीय वाहतूक व हाताळणीमुळे होणारे नुकसान टाळण्याकरिता प्रयत्न करावे. बाजार समित्यांना अर्थसंकल्पात हक्काचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडे १२०० कोटींच्या निधीची मागणी केली आहे.

कोकाटे म्हणाले, 'अलीकडे बांधावर खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांच्या फसवणुकीचे प्रकार समोर येतात. शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही यासाठी व्यापाऱ्यांची बाजार समितीकडे नोंदणी करणे, त्यांच्याकडून आवश्यकतेनुसार काही अनामत रक्कम म्हणून जमा करून घेणे, खरेदी-विक्री व्यवहाराची माहिती, कर्जफेडीची क्षमता आदींबाबत पणन विभागाने विचार करून परवाने दिले पाहिजेत.'

### शहरातील लोकांना खाण्याबद्दल माहिती नसते

■ 'अलीकडील काळात काय खावे आणि काय खाऊ नये, हे ठरविले पाहिजे. शहरातील लोकांना शेतीविषयक ज्ञान कमी असते. शाळेत शेती विषय नसतो. त्यामुळे त्यांना काय खायचे, हे माहीत नसते. काहीतरी पोट भरायचे म्हणून किंवा चवीला गोड लागले की खायचे. मात्र, चांगले वाईट आणि काय खावे याबाबत प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे. घटक खाद्य म्हणून निवडले पाहिजे,' असेही राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी सांगितले.

Pune Edition
Feb 25, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

सकाळ

# व्यवसाय विकास आराखडा तयार करावा

## पणन परिषदेत मंत्री जयकुमार रावल यांचे बाजार समित्यांना आवाहन

**मार्केट यार्ड, ता. २४ : ''राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी जास्तीत जास्त शेतमाल समितीच्या आवारात विक्रीस येण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच, समित्यांनी सरकारवर अवलंबून न राहता स्वतःचा व्यवसाय विकास आराखडा तयार करून अंमलबजावणी करावी,'' असे आवाहन पणनमंत्री जयकुमार रावल यांनी केले.**

कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय पणन परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, आमदार चरणसिंह ठाकूर, दिलीप बनकर, अनुराधा चव्हाण, सहकार आयुक्त दीपक तावरे, कृषी पणन संचालक विकास रसाळ, राज्य कृषी पणन मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, पुणे बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर, सचिव डॉ. राजाराम धोंडकर यांच्यासह राज्यातील बाजार समित्यांचे सभापती, संचालक व सचिव उपस्थित होते.

रावल म्हणाले, ''जागतिक बाजार समितीच्या धर्तीवर राज्याची पणन व्यवस्था स्पर्धात्मक करणे आवश्यक आहे. बाजार समित्यांनी शेतकऱ्यांना शेतमालाचे पैसे देण्याबाबत संरक्षण देणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतमाल संकलन, माफक दरात वाहतूक व्यवस्था, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, गोदाम व शीतगृह उभारणी, निर्यातीसाठी मूलभूत सुविधा द्याव्यात.''

राज्यातील आदिवासी भागासह ६९ तालुक्यांमध्ये नवीन बाजार समित्या निर्माण करण्यात येणार आहेत. समित्यांचे कामकाज लक्षात घेऊन कृषी व्यवसाय आणि आर्थिक व्यवस्थापन, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांच्या नेमणुका कराव्यात. त्यामुळे बाजार समित्यांची गुणवत्ता वाढेल, असेही रावल म्हणाले.



**बाणेर, पुणे :** कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय पणन परिषदेचे उद्घाटन जयकुमार रावल आणि माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते झाले.

### 'आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्केट उभारणार'

**■ मोबाईल ॲपवर आणि बाजार समित्यांच्या आवारात आधुनिक तंत्रज्ञान आणि डिस्प्ले सिस्टीमचा वापर करून देशातील शेतमालाची आवक, बाजारभावाची माहिती सर्व घटकांना उपलब्ध केली पाहिजे. जगातील आधुनिक बाजारपेठांच्या धर्तीवर राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्केट उभारण्याचा सरकारचा विचार आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडून प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे.**

### विकासासाठी १२०० कोटींची मागणी

बाजार समित्यांचा विकास आणि शेतकऱ्यांना सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे एक हजार २०० कोटींच्या निधीची मागणी केली आहे, असे रावल यांनी सांगितले.

### 'समित्या वसुलीसाठी नाही, सेवेकरिता'

''राज्यातील बाजार समित्या वसुलीसाठी नसून, शेतकऱ्यांच्या सेवेकरिता आहेत. सभापती, संचालकांनी पदावर काम करताना शेतकरी आणि अन्य बाजार घटकांच्या हितासाठी काम केले पाहिजे,'' असे पणनमंत्री जयकुमार रावल म्हणाले.

राज्यस्तरीय पणन परिषदेच्या उद्घाटनानंतर रावल यांनी पत्रकारांशी संवाद साधला. रावल म्हणाले, ''कृषी उत्पन्न बाजार समित्यांना बदलत्या काळानुसार बदलावे लागणार आहे. सद्यःस्थितीत उत्पादित मालापैकी ५० टक्के शेतमाल बाजार समित्यांमध्ये येत नाही. त्यामुळे समित्यांनी शेतकऱ्यांना सुविधा देऊन आकर्षित केले पाहिजे. पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फूलबाजारात १९ जणांना बाजार समितीने प्रतीक्षा यादी डावलून परवाना दिल्याचा प्रकार चुकीचा आहे. या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात येईल.''

Samsiddhi
Service Pvt. Ltd.
(SSPL)

# राष्ट्ररूप

समसिध्दी चॅरिटेबल
फाऊंडेशन, पुणे

RNI No. MAHMAR/2023/89884 SDM/SR/PUNE/41 Dt. 06/07/2023

वर्ष १ ● अंक १८० ● सांय दैनिक, पुणे मंगळवार २५ फेब्रुवारी २०२५ ● पाने : १ ● किंमत ३ रुपये

# शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून राज्यातील बाजार समित्या सक्षम करणार : पणन मंत्री जयकुमार रावल



पुणे : बाजार समित्या या कृषि पणन व्यवस्थेचा महत्वाचा घटक आहे. अगदी कोरोनाच्या काळातही सर्व व्यवहार ठप्प असतांनाही, बाजार समित्यांनी शेतमालाची पुरवठा साखळी कार्यक्षमपणे हाताळून सुरळीत राखली. त्याची सरकारने, जागतिक बँकेने व प्रसार माध्यमांनीही दखल घेतली आहे,त्यामुळे राज्यातील बाजार समितीचे महत्व अधोरेखित झाले आहे. महाराष्ट्र हे मोठे कृषी निर्यातदार राज्य आहे. जागतिक बाजार समितीच्या धर्तीवर राज्याची पणन व्यवस्था स्पर्धात्मक करणे आवश्यक असून शेतकऱ्यांना केंद्र मानून राज्याच्या बाजार समित्या सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणार आहे, असे प्रतिपादन पणन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी केले. तसेच परिषदेत मांडलेल्या सकारात्मक सूचना यांच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणार आहेत. त्याचप्रमाणे बाजार समित्यांना अर्थसंकल्पात हक्काचा निधी



उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्यावतीने आयोजित कृषी उत्पन्न बाजार समित्यांची राज्यस्तरीय पणन परिषदेच्यावेळी उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, आमदार चरणसिंह ठाकूर, आ. दिलीप वनकर, आ. अनुराधा चव्हाण, सहकार आयुक्त दीपक तावरे, कृषी पणन संचालक विकास रसाळ, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे तसेच राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक व सचिव आदी उपस्थित होते.

मंत्री रावल पुढे म्हणाले की, शेतमालाच्या उत्पादनाच्या बाबतीत आपण जरी आघाडीवर असलो तरी त्याची सक्षम पणन व्यवस्था निर्माण करण्याच्या अनुषंगाने काम करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाला किफायतशीर भाव मिळण्यासाठी पणन व्यवस्थेला अधिक स्पर्धात्मक करणे आवश्यक आहे. सुयोग्य पणन सुविधांच्या अभावामुळे शेतमालाची काही प्रमाणावर सुगी पश्चात हानी होते. प्रत्यक्षात अवकाळी पाऊस, गारपीट यासारख्या नैसर्गिक आपत्ती, व शेतमालाची अयोग्य वाहतूक व हाताळणीमुळे होणारे नुकसान टाळण्याकरीता प्रयत्न करावे.

राज्यातील बहुतांश बाजार समित्यांच्या मालकीच्या जमीनी गावातील किंवा शहरातील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असून, त्यांचा विकास करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी स्थानिक गरजा लक्षात घेवून व्यवसाय विकास आराखडे तयार करावे. कालबध्द कार्यक्रम राबवून ते अंमलात आणले पाहिजे, राज्यामध्ये एकूण ३०५ कृषि उत्पन्न बाजार समित्या व त्यांचे ६२५ उपबाजार आवार कार्यरत आहेत. राज्यातील काही आदिवासी भागात व राज्यातील ६९ तालुक्यामध्ये नव्याने बाजार समिती नव्याने निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीने अधिकाधिक शेतमाल बाजार समिती आवारात विक्रीसाठी येण्याकरीता शेतकऱ्यांना विविध सोई-सुविधा, शेतकऱ्यांचे संपर्क व प्रबोधन, शेतकऱ्यास शेतमालाचे पैसे देण्याबाबत संरक्षण, शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतमाल संकलन व माफक दरात वाहतूक, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेती विषयक व प्रक्रिया विषयक तंत्रज्ञान याची उपलब्धता व माहिती देणे, अधिनस्त बाजार घटकांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे, बाजार समितीची व्यावसायीक उत्पन्न वाढीसाठी गोदाम व शीतगृह उभारणी, निर्यातीसाठी मुलभूत सुविधा निर्माण करणे, ग्रेडींग, स्टोअरेज, पॅकींग इत्यादींनी प्रोत्साहन देणे स्वतःचा व्यवसाय विकास आराखडा तयार करून त्याची कालबध्द अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

जागतीक पातळीवर अनेक राष्ट्रांनी त्यांच्या अन्नधान्य साठ्यात मध्ये वाढ केल्यामुळे कृषि पणन क्षेत्राचे महत्व अधोरेखीत झाले आहे. कृषि पणन क्षेत्र हे शाश्वत विकासाचे क्षेत्र असल्याने मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक येऊ लागली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर माहिती तंत्रज्ञानाचा वापर, कमोडीटी मार्केटस, फ्युचर व फॉरवर्ड मार्केटींग, ऑनलाईन मार्केटींग, विविध प्रमाणीकरण, पॅकेजींग इत्यादी तरतुदींमुळे आव्हाने निर्माण झालेमुळे उत्पादक शेतकऱ्यांबरोबरच कृषि पणन व्यवस्थेला आधुनिकतेची कास धरणे आवश्यक झालेले आहे. शेतीमालाची विक्री व्यवस्था निर्माण करणे हे बाजार समित्यांच्या स्थापनेच्या वेळचे उद्दीष्ट होते. तथापि सध्याच्या बदलत्या जागतिकीकरण व उदारीकरणाच्या वातावरणात बाजार समित्यांनी त्यांच्या कामकाजात आवश्यक बदल करणे गरजेचे आहे.

कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी भविष्यात अधिकाधिक पारदर्शकता ठेवून व शेतकऱ्यांना आधुनिक सुविधा पुरवून आकर्षित केले पाहीजे. अजूनही बऱ्याच बाजार समित्यांच्या बाजार आवारात पारदर्शक विक्री व्यवहार होत नाहीत.बाजार आवारात विक्रीसाठी आलेल्या शेतमालाचे योग्य वजन, शेतमालाला वाजवी भाव व शेतमाल खरेदीचे चुकारे वेळेत करणे याची सुनियोजित व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. बाजार समितीने बाजार आवारात जास्तीत जास्त शेतमाल विक्रीसाठी येईल यासाठी शेतकऱ्यांशी संपर्क वाढवून त्यांचेसोबत उत्तम समन्वय ठेवणे आवश्यक आहे.

**अमेस्टरडॅम व पॅरिस बाजारपेठांच्या धर्तीवर राज्यात ही आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्केट उभारणार –पणन मंत्री जयकुमार रावल**

मोबाईल अॅप, बाजार आवारातील आधुनिक डिस्प्ले सिस्टीम यांचा वापर करून राज्यातील व देशातील शेतमालाची आवक, बाजारभाव, तसेच इतर आवश्यक माहितीचा रिअल टाईम डेटा सर्व बाजार घटकांना सार्वजनिक रित्या उपलब्ध करून दिला पाहिजे. कृषि पणन व्यवस्थेतील आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत वेगाने काम झाले पाहिजे . त्यादृष्टीने पहिले पाऊल म्हणून राज्याचे मुख्यमंत्री यांचे कडुन मंजुर पणन विभागाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमात राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाची बाजार समिती उभारणे या विषयाचा समावेश करणेत आलेला आहे. या अंतर्गत अल्समीर, अॅमेस्टरडॅम, रुंगीज, पॅरिस बाजार पेठ या आधुनिक बाजारपेठांच्या धर्तीवर राज्यात



आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्केट उभारणीचा राज्य शासनाचा विचार आहे. त्यासाठी आवश्यक सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडून तयार करणेत येत आहेत, असेही मंत्री श्री. रावल म्हणाले.

**शेतकऱ्यांना सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीने काम करावे : कृषीमंत्री अॅड.माणिकराव कोकाटे**

शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासोबतच त्यांच्या शेतमालाला संरक्षण देण्याकरीता विविध सोई-सुविधा उपलब्ध करून देण्याचे कृषी उत्पन्न बाजार समितीने काम करावे, असे प्रतिपादन कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केले.

शेतकऱ्यांना शेतमालाची विक्री केल्यानंतर त्यांना शाश्वती वाटली पाहिजे. शेतकरी विश्वासाने माल विक्री करतात ते पूर्णतः विक्री व्यवस्थेवर अवलंबून असतो. त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. व्यापाऱ्यांची कृषी उत्पन्न बाजार समितीकडे नोंदणी करणे, त्यांच्याकडून आवश्यकतेनुसार काही रक्कम अनामत रक्कम म्हणून जमा करून घेणे, खरेदी-विक्री व्यवहाराची माहिती, कर्जफेडीची क्षमता आदींबाबत पणन विभागाने विचार करावा.

शेतकऱ्यांनी रासायनिक शेती ऐवजी सेंद्रीय शेती करण्यावर भर दिला पाहिजे. कृषी क्षेत्रात विविध उपक्रमशील प्रयोग करण्यात येत होत असून त्याचा शेतकऱ्यांना लाभ होईल यादृष्टीने काम केले पाहिजे. शेतकरी चांगल्या प्रतीच्या शेतमालाचे उत्पादन करीत असतात, त्यांची जनजागृती केली पाहिजे. कृषी उत्पन्न बाजार समितीने राज्यात शेतकरी विक्री केंद्रे निर्माण केले पाहिजे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात दर्शनी भागात मोठ्या आकाराचा एलईडी पडदा लावून त्यावर शेतमालाचे भाव, कृषी विषयक योजनांची माहिती, पर्जन्यमान, हवामान अंदाज आदींबाबत माहिती प्रकाशित केली पाहिजे.

राज्यात विविध ठिकाणी कृषी विभागाच्या जागेबाबत कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने करण्यात येणाऱ्या मागणीबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल. शेतकरी प्रगतशील असून त्यांच्या शेतमालाला भाव मिळवून देण्यासोबतच त्यांच्या मनातील अस्थिरता कमी करण्याकरिता कृषी व पणन विभागाच्या समन्वयाने येत्या काळात नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येईल, असेही अॅड. कोकाटे म्हणाले.

श्री. कदम म्हणाले, राज्यातील बाजार समित्यांच्या विविध विषयांसंदर्भात संवाद साधण्यासाठी येथे बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. राज्यात कृषी उत्पन्न बाजार समीतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पादित मालाला भाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे, असेही श्री. कदम म्हणाले.

श्री. रावल यांच्या हस्ते २० वर्षांपासून अधिक कार्यकाळ पूर्ण केलेल्या सभापतींचा सन्मान करण्यात आले. यावेळी बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीची वाटचाल आणि कामकाजाबाबत चित्रफीत दाखविण्यात आली.

पुण्य नगरी

# शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून बाजार समित्या सक्षम करणार

**पणनमंत्री जयकुमार रावल यांचे प्रतिपादन**



**पुणे : प्रतिनिधी**

बाजार समित्या या कृषी पणन व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. अगदी कोरोनाच्या काळातही सर्व व्यवहार ठप्प असतानाही, बाजार समित्यांनी शेतमालाची पुरवठा साखळी कार्यक्षमपणे हाताळून सुरळीत राखली. त्याची सरकारने, जागतिक बँकेने व प्रसार माध्यमांनीही दखल घेतली आहे, पणन व्यवस्था स्पर्धात्मक करणे आवश्यक असून शेतकऱ्यांना केंद्र मानून राज्याच्या बाजार समित्या सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणार आहे, असे प्रतिपादन पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केले. तसेच परिषदेत मांडलेल्या सकारात्मक सूचना च्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणार आहेत. त्याचप्रमाणे बाजार समित्यांना अर्थसंकल्पात हक्काचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ही त्यांनी सांगितले

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्यावतीने आयोजित कृषी उत्पन्न बाजार समित्यांची राज्यस्तरीय पणन परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, आमदार चरणसिंह ठाकूर, दिलीप बनकर, अनुराधा चव्हाण, सहकार आयुक्त दीपक तावरे, पणन संचालक विकास रसाळ, पणन मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर आदी उपस्थित होते. दरम्यान यावेळी अर्जुनसिंह मोहिते पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

रावल म्हणाले की, शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाला किफायतशीर भाव मिळण्यासाठी पणन व्यवस्थेला अधिक स्पर्धात्मक करणे आवश्यक आहे. सुयोग्य पणन सुविधांच्या अभावामुळे शेतमालाची काही प्रमाणावर सुगी पश्चात हानी होते. प्रत्यक्षात अवकाळी पाऊस, गारपीट यासारख्या नैसर्गिक आपत्ती, व शेतमालाची अशास्त्रीय वाहतूक व हाताळणीमुळे होणारे नुकसान टाळण्याकरीता प्रयत्न करावे.

राज्यातील बहुतांश बाजार समित्यांच्या मालकीच्या जमीनी गावातील किंवा शहरातील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असून, त्यांचा विकास करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी स्थानिक गरजा लक्षात घेवून व्यवसाय विकास आराखडे तयार करावे. कालबध्द कार्यक्रम राबवून ते अंमलात आणले पाहिजे, राज्यामध्ये एकूण ३०५ कृषि उत्पन्न बाजार समित्या व त्यांचे ६२५ उपबाजार आवार कार्यरत आहेत. राज्यातील काही आदिवासी भागात व राज्यातील ६९ तालुक्यांमध्ये नव्याने बाजार समिती नव्याने निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीने अधिकाधिक शेतमाल बाजार समिती आवारात विक्रीसाठी येण्याकरीता शेतकऱ्यांना विविध सोई-सुविधा, शेतकऱ्यांचे संपर्क व प्रबोधन, शेतकऱ्यास शेतमालाचे पैसे देण्याबाबत संरक्षण, शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन शेतमाल संकलन व माफक दरात वाहतूक, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेती विषयक व प्रक्रिया विषयक तंत्रज्ञान याची उपलब्धता व माहिती देणे, अधिनस्त बाजार घटकांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे, बाजार समितीची व्यावसायीक उत्पन्न वाढीसाठी गोदाम व शीतगृह उभारणी, निर्यातीसाठी मुलभूत सुविधा निर्माण करणे, ग्रेडींग, स्टोअरेज, पॅकींग इत्यादींनी प्रोत्साहन देणे स्वतःचा व्यवसाय विकास आराखडा तयार करुन त्याची कालबध्द अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तसेच अमेस्टरडॅम व पॅरिस बाजारपेठांच्या धर्तीवर राज्यात ही आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्केट उभारणार असल्याचेही रावल म्हणाले. राज्याचे मुख्यमंत्री यांचे कडुन मंजुर पणन विभागाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमात राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाची बाजार समिती उभारणे या विषयाचा समावेश करणेत आलेला आहे. या अंतर्गत अल्समीर, अमेस्टरडॅम, रुगींश, पॅरिस बाजार पेठ या आधुनिक बाजारपेठांच्या धर्तीवर राज्यात आंतरराष्ट्रीय दजार्चे मार्केट उभारणेचा राज्य शासनाचा विचार आहे. त्यासाठी आवश्यक सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडून तयार करणेत येत असल्याचे मंत्री रावल म्हणाले.

कदम म्हणाले, राज्यातील बाजार समित्यांच्या विविध विषयांसंदर्भात संवाद साधण्यासाठी येथे बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. राज्यात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पादित मालाला भाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विनायक कोकरे यांनी केले.

## शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध करण्यासाठी काम करा : कोकाटे

शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासोबतच त्यांच्या शेतमालाला संरक्षण देण्याकरीता विविध सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याचे कृषी उत्पन्न बाजार समितीने काम करावे, असे प्रतिपादन कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केले. शेतकऱ्यांना शेतमालाची विक्री केल्यानंतर त्यांना शाश्वती वाटली पाहिजे. शेतकरी विश्वासाने माल विक्री करतात ते पूर्णतः विक्री व्यवस्थेवर अवलंबून असतो. त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. याकरीता व्यापाऱ्यांची कृषी उत्पन्न बाजार समितीकडे नोंदणी करणे, त्यांच्याकडून आवश्यकतेनुसार काही रक्कम अनामत रक्कम म्हणून जमा करुन घेणे, खरेदी-विक्री व्यवहाराची माहिती, कर्जफेडीची क्षमता आदीबाबत पणन विभागाने विचार करावा.

पुण्य नगरी

# बाजार समिती वसुलीची नाही, तर जबाबदारीची जागा

## रावल यांच्याकडून बाजार समितीची खरडपट्टी

**पुणे** : बाजार समित्यांमधील संचालकपद हे वसुलीचे नाही तर अधिकार आणि जबाबदारीचे आहे. संचालकपदावर काम करताना शेतकरी व अन्य बाजार घटकांच्या हितासाठी काम केले पाहिजे, अशा शब्दात राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी बाजार समितीची खरडपट्टी काढली. पुणे बाजार समितीतील काही संचालक निवडणुकीमधील खर्च झाला आहे, तो वसूल झाला पाहिजे, असे बोलत असतात, त्याच अनुषंगाने पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना रावल बोलत होते.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आयोजित कृषी उत्पन्न बाजार समित्यांची राज्यस्तरीय पणन परिषदेच्या उद्घाटनानंतर रावल बोलत होते. ते पुढे म्हणाले, कृषी उत्पन्न बाजार समित्यांना काळानुसार बदलावे लागणार आहे. सद्यस्थितीत उत्पादित होणाऱ्या मालापैकी ५० टक्के देखील शेतमाल हा बाजार समित्यांमध्ये येत नाही. शेतमालास बाजारभाव कमी असल्यास तो शीतगृहांमध्ये ठेवण्यासाठीची सुविधा बाजार समित्यांनी उपलब्ध करून दिली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

### फूलबाजारातील परवान्यांची चौकशी लावणार

**पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फूलबाजारामध्ये १९ जणांना बाजार समितीने प्रतीक्षा यादी डावलून परवाने दिल्याचा प्रकार चुकीचा आहे. ते प्रतीक्षा यादीत होते, त्यांनाच नियमानुसार परवाने मिळायला हवे होते. या प्रकरणाची चौकशी केली जाईल आणि दोषींवर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा मंत्री जयकुमार रावल यांनी दिला.**

Pune Edition
Feb 25, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# बाजार समित्यांनी पारदर्शक व्यवहार करावा

## पणनमंत्री : आदिवासी भागात ६९ तालुक्यांमध्ये बाजार समित्या उभारणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**राज्याच्या कृषी उत्पन्न बाजार समित्या सक्षम करण्यासाठी अर्थसंकल्पात १२०० कोटींची आर्थिक तरतूद करण्याची मागणी पणन विभागाने केली आहे. राज्यातील आदिवासी भागात ६९ तालुक्यांमध्ये नव्याने बाजार समित्या निर्माण करण्याचा निर्णय झाला आहे. अजूनही बाजार समित्यांच्या आवारात पारदर्शक विक्री व्यवहार होत नाहीत. त्यासाठी समित्यांनी शेतकरी केंद्रबिंदू मानून पारदर्शक व्यवहार करावा, असा महत्त्वपूर्ण सल्ला पणनमंत्री आणि महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी दिला.**



राज्यस्तरीय पणन परिषदेचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करताना कृषिमंत्री माणिकराव कोकाटे. समवेत पणनमंत्री जयकुमार रावल व अन्य मान्यवर.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांची राज्यस्तरीय पणन परिषद सोमवारी (दि.२४) झाली. त्या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी व्यासपीठावर आ. चरणसिंह ठाकूर, आ. दिलीप बनकर, आ. अनुराधा चव्हाण, सहकार आयुक्त दीपक तावरे, पणन संचालक विकास रसाळ, बाजार समिती सहकारी संघाचे उपसभापती संतोष सोमवंशी, पणन मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे तसेच राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक व सचिव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री रावल पुढे म्हणाले, राज्यामध्ये एकूण ३०५ कृषी उत्पन्न बाजार समित्या व त्यांचे ६२५ उपबाजार आवार कार्यरत आहेत. शासनाच्या शंभर दिवसांच्या कार्यक्रमात राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाची बाजार समिती उभारण्याचा विषय आहे. त्यामध्ये ॲमस्टरडॅम- अल्समेर आणि पॅरिसमधील रुंगीस या सर्वांत मोठ्या आधुनिक बाजाराच्या धर्तीवर राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचा बाजार उभारण्याबाबतचा आवश्यक सविस्तर प्रकल्प अहवाल पणन मंडळाकडून तयार करण्यात येत आहे.

या वेळी बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यशस्वी वाटचाल, नव्या प्रयोगांबाबतची चित्रफीत दाखविण्यात आली. प्रास्ताविक मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले, तर पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी आभार मानले.

### अनामत रक्कम घ्या : कृषिमंत्री

बाजार आवाराऐवजी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर होणाऱ्या शेतमालाच्या खरेदीत व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची लूटमार होते. विशेषत: द्राक्षांच्या व्यापारावर विश्वासावर होतो. मात्र, बांधावरील सौद्यांमध्ये व्यापाऱ्यांकडून शेतकरी फसतात. त्यामुळे बांधावरील खरेदीत संबंधित व्यापाऱ्यांची बाजार समित्यांनी अनामत रक्कम घेण्यासह खरेदी-विक्री व्यवहाराची माहिती ठेवणे, त्यांची रक्कम भरण्याची क्षमता तपासणे आणि नोंदणी करणे बंधनकारक करावे, असे मत कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केली.

Pune Edition
Feb 25, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com




https://www.dailynavinsandhya.com

दैनिक नवीन संध्या

RNI No.MAHMAR/2010/36460
DEC. No. SDM/SR/PUNE/87/2019




वर्ष १५ ✿ अंक ७५ दैनिक ✿ पुणे, मंगळवार २५ फेब्रुवारी २०२५ ✿ किंमत ३ रुपये ✿ पाने : १

# शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून राज्यातील बाजार समित्या सक्षम करणार-पणन मंत्री जयकुमार रावल

## बाजार समित्यांना अर्थसंकल्पात हक्काचा निधी उपलब्ध देण्यासाठी प्रयत्न करणार

## पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या उपस्थितीत कृषी उत्पन्न बाजार समित्यांची राज्यस्तरीय पणन परिषद पुण्यात संपन्न

पुणे : बाजार समित्या या कृषि पणन व्यवस्थेचा महत्वाचा घटक आहे. अगदी कोरोनाच्या काळातही सर्व व्यवहार ठप्प असतांनाही, बाजार समित्यांनी शेतमालाचा पुरवठा साखळी कार्यक्षमपणे हाताळून सुरळीत राखली. त्याची सरकारने, जागतिक बँकेने व प्रसार माध्यमांनीही दखल घेतली आहे,त्यामुळे राज्यातील बाजार समितीचे महत्व अधोरेखित झाले आहे. महाराष्ट्र हे मोठे कृषी निर्यातदार राज्य आहे जागतिक बाजार समितीच्या धर्तीवर राज्याची पणन व्यवस्था स्पर्धात्मक करणे आवश्यक असून शेतकऱ्यांना केंद्र मानून राज्याच्या बाजार समित्या सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणार आहे, असे प्रतिपादन पणन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी केले. तसेच परिषदेत मांडलेल्या सकारात्मक सूचना त्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणार आहेत. त्याचप्रमाणे बाजार समित्यांना अर्थसंकल्पात हक्काचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ही त्यांनी सांगितले.



महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्यावतीने आयोजित कृषी उत्पन्न बाजार समित्यांची राज्यस्तरीय पणन परिषदेच्यावेळी उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, आमदार चरणसिंह ठाकूर, आ. दिलीप बनकर, आ. अनुराधा चव्हाण, सहकार आयुक्त दीपक तावरे, कृषी पणन संचालक विकास रसाळ, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे तसेच राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक व सचिव आदी उपस्थित होते.

मंत्री रावल पुढे म्हणाले की, शेतमालाच्या उत्पादनाच्या बाबतीत आपण जरी आघाडीवर असलो तरी त्याची सक्षम पणन व्यवस्था निर्माण करण्याच्या अनुषंगाने काम करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाला किफायतशीर भाव मिळण्यासाठी पणन व्यवस्थेला अधिक स्पर्धात्मक करणे आवश्यक आहे. सुयोग्य पणन सुविधांच्या अभावामुळे शेतमालाची काही प्रमाणात सुगी पश्चात हानी होते. प्रत्यक्षात अवकाळी पाऊस, गारपीट यासारख्या नैसर्गिक आपत्ती, व शेतमालाची अशास्त्रीय वाहतूक व हाताळणीमुळे होणारे नुकसान टाळण्याकरीता प्रयत्न करावे.

राज्यातील बहुतांश बाजार समित्यांच्या मालकीच्या जमीनी गावातील किंवा शहरातील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असून, त्यांचा विकास करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी स्थानिक गरजा लक्षात घेवून व्यवसाय विकास आराखडे तयार करावे. कालबध्द कार्यक्रम राबवून ते अंमलात आणले पाहिजे, राज्यामध्ये एकूण ३०५ कृषि उत्पन्न बाजार समित्या व त्यांचे ६२५ उपबाजार आवार कार्यरत आहेत. राज्यातील काही आदिवासी भागात व राज्यातील ६९ तालुक्यांमध्ये नसल्याने बाजार समिती नव्याने निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीने अधिकाधिक शेतमाल बाजार समिती आवारात विक्रीसाठी येण्याकरीता शेतकऱ्यांना विविध सोई-सुविधा, शेतकऱ्यांचे संपर्क व प्रबोधन, शेतकऱ्यास शेतमालाचे पैसे देण्याबाबत संरक्षण, शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन शेतमाल संकलन व माफक दरात वाहतूक, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेती विषयक व प्रक्रिया विषयक तंत्रज्ञान याची उपलब्धता व माहिती देणे, अधिनस्त बाजार घटकांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे, बाजार समितीची व्यावसायीक उत्पन्न वाढीसाठी गोदाम व शीतगृह उभारणी, निर्यातीसाठी मुलभूत सुविधा निर्माण करणे, ग्रेडींग, स्टोअरेज, पॅकींग इत्यादींनी प्रोत्साहन देणे स्थानिक व्यवसाय विकास आराखडा तयार करून त्याची कालबध्द अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

जागतिक पातळीवर अनेक राष्ट्रांनी त्यांच्या अन्नधान्य साठ्यात मध्ये वाढ केल्यामुळे कृषि पणन क्षेत्राचे महत्व अधोरेखित झाले आहे. कृषि पणन क्षेत्र हे शाश्वत विकासाचे क्षेत्र असल्याने मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक येऊ लागली आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर माहिती तंत्रज्ञानाचा वापर, कमोडीटी मार्केटस, फ्युचर व फॉरवर्ड मार्केटींग, ऑनलाईन मार्केटींग, विविध प्रमाणीकरण, पॅकेजींग इत्यादी तरतुदींमुळे आव्हाने निर्माण झालेमुळे उत्पादक शेतकऱ्यांबरोबरच कृषि पणन व्यवस्थेला आधुनिकतेची कास धरणे आवश्यक झालेले आहे. शेतीमालाची विक्री व्यवस्था निर्माण करणे हे बाजार समित्यांच्या स्थापनेच्या वेळचे उद्दीष्ट होते. तथापि सध्याच्या बदलत्या जागतिकीकरण व उदारीकरणाच्या वातावरणात बाजार समित्यांनी त्यांच्या कामकाजात आवश्यक बदल करणे गरजेचे आहे.

कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी भविष्यात अधिकाधिक पारदर्शकता ठेवून व शेतकऱ्यांना आधुनिक सुविधा पुरवून आकर्षित केले पाहीजे. अजूनही बऱ्याच बाजार समित्यांच्या बाजार आवारांत पारदर्शक विक्री व्यवहार होत नाहीत.बाजार आवारात विक्रीसाठी आलेल्या शेतमालाचे योग्य वजन, शेतमालाला वाजवी भाव व शेतमाल खरेदीचे चुकारे वेळेत करणे याची सुनियोजित व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. बाजार समितीने बाजार आवारात जास्तीत जास्त शेतमाल विक्रीसाठी येईल यासाठी शेतकऱ्यांशी संपर्क वाढवून त्यांचेसोबत उत्तम समन्वय ठेवणे आवश्यक आहे.

**अॅमेस्टरडॅम व पॅरिस बाजारपेठांच्या धर्तीवर राज्यात ही आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्केट उभारणार –पणन मंत्री जयकुमार रावल**

मोबाईल ॲप, बाजार आवारातील आधुनिक डिस्प्ले सिस्टीम यांचा वापर करून राज्यातील व देशातील शेतमालाची आवक, बाजारभाव, तसेच इतर आवश्यक माहितीचा रिअल टाईम डेटा सर्व बाजार घटकांना सार्वजनिक रित्या उपलब्ध करून दिला पाहिजे. कृषि पणन व्यवस्थेतील आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत वेगाने काम झाले पाहिजे . त्यादृष्टीने पहिले पाऊल म्हणून राज्याचे मुख्यमंत्री यांचे कडुन मंजुर पणन विभागाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमात राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाची बाजार समिती उभारणे या विषयाचा समावेश करणेत आलेला आहे. या अंतर्गत अल्समीर, अॅमस्टरडॅम, रूंगीश, पॅरिस बाजार पेठ या आधुनिक बाजारपेठांच्या धर्तीवर राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्केट उभारणेचा राज्य शासनाचा विचार आहे. त्यासाठी आवश्यक सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडुन तयार करणेत येत आहेत, असेही मंत्री श्री. रावल म्हणाले.

**शेतकऱ्यांना सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीने काम करावे : कृषीमंत्री अॅड.माणिकराव कोकाटे**

शेतकऱ्यांची नियमित दळणवळणाबरोबरच त्यांच्या शेतमालाला संरक्षण देण्याकरीता विविध सोई-सुविधा उपलब्ध करून देण्याचे कृषी उत्पन्न बाजार समितीने काम करावे, असे प्रतिपादन कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केले.

शेतकऱ्यांना शेतमालाची विक्री केल्यानंतर त्यांना शाश्वती वाटली पाहिजे. शेतकरी विश्वासाने माल विक्री करतात ते पूर्णतः विक्री व्यवस्थेवर अवलंबून असतो.



त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

याकरीता व्यापाऱ्यांची कृषी उत्पन्न बाजार समितीकडे नोंदणी करणे, त्यांच्याकडून आवश्यकतेनुसार काही रक्कम अनामत रक्कम म्हणून जमा करून घेणे, खरेदी-विक्री व्यवहाराची माहिती, कर्तफेडीची क्षमता आदीबाबत पणन विभागाने विचार करावा.

शेतकऱ्यांनी रासायनिक शेती ऐवजी सेंद्रीय शेती करण्यावर भर दिला पाहिजे. कृषी क्षेत्रात विविध उपक्रमशील प्रयोग करण्यात येत होत असून त्याचा शेतकऱ्यांना लाभ होईल यादृष्टीने काम केले पाहिजे. शेतकरी चांगल्या प्रतीच्या शेतमालाचे उत्पादन करीत असतात, त्यांची जनजागृती केली पाहिजे. कृषी उत्पन्न बाजार समितीने राज्यात शेतकरी विक्री केंद्र निर्माण केले पाहिजे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात दर्शनी भागात मोठ्या आकाराचा एलईडी पडदा लावून त्यावर शेतमालाचे भाव, कृषी विषयक योजनांची माहिती, पर्जन्यमान, हवामान अंदाज अद्ययावत माहिती प्रकाशित केली पाहिजे.

राज्यात विविध ठिकाणी कृषी विभागाच्या जागेबाबत कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्यावतीने करण्यात येणाऱ्या मागणीबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल. शेतकरी प्रगतशील असून त्यांच्या शेतमालाला भाव मिळवून देण्यासोबतच त्यांच्या मनातील अविश्वास कमी करण्याकरीता कृषी व पणन विभागाच्या समन्वयाने येत्या काळात महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येईल, असेही अॅड. कोकाटे म्हणाले.

श्री. कदम म्हणाले, राज्यातील बाजार समित्यांच्या विविध विषयांसंदर्भात संवाद साधण्यासाठी येथे बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. राज्यात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पादित मालाला भाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे, असेही श्री. कदम म्हणाले.

श्री. रावल यांच्या हस्ते २० वर्षांपासून अधिक कार्यकाळ पूर्ण केलेल्या सभापतींचा सन्मान करण्यात आले. यावेळी बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीची वाटचाल आणि कामकाजाबाबत चित्रफीत दाखविण्यात आली.

Maharashtra Times, 25/02/2025

# शेतकऱ्यांना चार पैसे मिळावेत

## नागपुरातून पुण्यात संत्री महोत्सवासाठी आलेल्या शेतकऱ्यांची अपेक्षा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

‘ग्राहकांना रास्त दरांत अस्सल नागपुरी आणि अमरावतीची संत्री मिळावीत म्हणून अनेक शेतकरी संत्री महोत्सवात सहभागी होण्यासाठी पुण्यात आले आहेत. वाहतूक आणि राहण्याचा खर्च खूप आहे. ग्राहकांनी प्रतिसाद दिला तर संत्री विकली जातील आणि शेतकऱ्यांना चार पैसे मिळतील; तसेच महोत्सवाचा उद्देशही सफल होईल...’ नागपूर जिल्ह्यातील संत्री उत्पादक शेतकरी अनिल बांद्रे सांगत होते.

उत्पादक ते ग्राहक थेट विक्री धोरणानुसार राज्य कृषी पणन मंडळातर्फे कोथरूड येथील गांधी भवनाजवळील आठवडा बाजार केंद्रात ‘संत्री महोत्सव’ आयोजित करण्यात आला आहे. हा महोत्सव उद्या, बुधवारपर्यंत असेल. या महोत्सवात २५ दालनांमध्ये थेट शेतकऱ्यांकडून नागपूर आणि अमरावती जिल्ह्यातील संत्री खरेदी करता येणार आहे.

> **अस्सल नागपुरी आणि अमरावती येथील संत्री चाखण्यासाठी ग्राहकांनी या महोत्सवाला भेट द्यावी. बाजारपेठेपेक्षा कमी दरांत आम्ही संत्री उपलब्ध करून दिली आहेत.**
>
> **– अनिल बांद्रे,** नागपूर जिल्ह्यातील शेतकरी



नागपूर येथून आलेले संत्री उत्पादक शेतकरी महोत्सवात सहभागी झाले आहेत.

### संत्री रस, बर्फी उपलब्ध

संत्री महोत्सवात नागपूर व अमरावती भागातील पन्नास शेतकऱ्यांनी भाग घेतला आहे. अंबियाबहर आता संपल्याने केवळ मृग बहरातील चवीला गोड अशी २५ टन संत्री या महोत्सवात विक्रीसाठी उपलब्ध आहे. ही संत्री पंधरा ते वीस दिवस टिकतात. महोत्सवात संत्र्याचा चवदार ताजा रस, संत्रा बर्फी व इतर संत्रा उत्पादने ग्राहकांना थेट उत्पादकांकडून उपलब्ध झाली आहेत.

नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यातील मन्नतखेडी येथून आलेले अनिल बांद्रे आणि त्यांचे सहकारी सांगतात, ‘आम्ही दोन हजार किलो म्हणजे वीस क्विंटल संत्री घेऊन आलो आहोत. सध्या सगळ्या दालनांमधून रोज पाचशे किलो विक्री होत आहे. सत्तर ते शंभर रुपये किलो दराने संत्री उपलब्ध आहे. बाजारापेक्षा हा दर नक्कीच कमी आहे. त्याचा फायदा ग्राहकांना होत आहे. मात्र, ग्राहकांनी खरेदीस चांगला प्रतिसाद दिल्यास संत्री उत्पादक शेतकऱ्यांच्याही हाती चार पैसे येतील. शेतमाल पुण्यात आणून कमी दरांत विकणे, येथे राहणे आणि रोजचा खर्च जास्त आहे.’

‘मंडळातर्फे दर वर्षी ‘उत्पादक ते ग्राहक थेट विक्री’ या संकल्पनेनुसार विविध महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा, या उद्देशाने ‘संत्री महोत्सवा’चे आयोजन करण्यात आले आहे. विदर्भातील उच्च प्रतीची नागपुरी व अमरावतीची संत्री आणि इतर उत्पादित पदार्थांच्या खरेदीसाठी नागरिकांनी महोत्सवाला भेट द्यावी,’ असे आवाहन ‘राज्य कृषी पणन मंडळा’चे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले आहे. ग्रामीण भागातील शेतकरी आणि उत्पादकांना या स्वरूपाच्या महोत्सवातून शहरात व्यापाराची संधी मिळत आहे, असेही संयोजकांनी म्हटले आहे.

Maharashtra Times , 25/02/2025

# शेतकऱ्यांची अस्वस्थता व्यापारी, बाजार समित्यांमुळे

## दमदाटी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर नियंत्रण आणा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'केवळ गाळे बांधून विक्री करणे हे कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे काम नाही. अल्पशेतमाल असलेल्या शेतकऱ्यांना विक्री करण्यासाठी जागा उपलब्ध होत नाही. शेतकऱ्यांना काय सुविधा देतो, हा विचार समित्यांनी केला पाहिजे. शेतकऱ्यांच्या अस्वस्थतेला व्यापारी आणि बाजार समित्या जबाबदार आहेत. शेतकऱ्यांना दमदाटी करणाऱ्या व्यापाऱ्यांची नोंद करा आणि त्यांच्यावर नियंत्रण आणा,' अशा शब्दांत कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी सोमवारी बाजार समित्यांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत व्यापाऱ्यांची खरडपट्टी काढली.

राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने आयोजित कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय पणन परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. पणनमंत्री आणि मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल, आमदार चरणसिंह ठाकूर, दिलीप बनकर, अनुराधा चव्हाण, सहकार आयुक्त दीपक तावरे, कृषी पणन संचालक विकास रसाळ, पणन मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे उपस्थित होते.

'कृषी आणि पणन खाते एकमेकाला सहकार्य करणार नाही तोपर्यंत शेतमाल व्यवस्थापनात सुधारणा होणार नाही. विक्री व्यवस्था योग्य नसल्याने न्याय मिळत नसल्याची तक्रार शेतकरी करतात. शेतकरी पूर्णपणे बाजार समित्यांवर अवलंबून आहे. तो मोठ्या आशेने बाजारांत शेतमाल आणतो. दर पडला, तर तो माल रस्त्यावर फेकून सरकारविरोधात रोष व्यक्त करतो. कष्टाने पिकवलेल्या मालाची कोणी कवडीमोल दराने मागणी करीत असेल, तर त्याचे दुःख आपण जाणणार की नाही,' असा खरमरीत सवाल कोकाटे यांनी केला.

'दुसरीकडे शेतमाल दिला, तर आधीचे पैसे मिळणार नाहीत, अशी दमदाटी करून सगळा शेतमाल आपल्यालाच कसा मिळेल आणि धंदा कसा वाढेल, यासाठी प्रयत्न करणाऱ्या व्यापाऱ्यांवर नियंत्रण आणले पाहिजे. सर्व व्यापाऱ्यांची नोंदणी सक्तीची करा. बांधावर शेतमाल विकत घेणारा व्यापारीही यातून सुटू नये, अशी व्यवस्था करा,' याकडे कोकाटे यांनी रावल यांचे लक्ष वेधले.

'समित्यांमध्ये माहितीदर्शक फलक, बी-बियाणे, खते यांचे वितरण आणि शेतमालाची विक्री अशी शेतकऱ्याला सुरक्षित वाटणारी व्यवस्था निर्माण करा. कृषी, पणन, मत्स्य, सहकार ही खाती एकच आहेत; पण आता वाटण्या झाल्या आहेत. लोकांचे प्रश्न सोडवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे,' अशी सूचना त्यांनी केली.



कृषिमंत्री माणिकराव कोकाटे.

### 'मुख्यमंत्र्यांनी आम्हाला दम दिलाय'

'तुमच्या कोणाच्या जाण्यामुळे सरकारवर परिणाम होणार नाही. मस्ती कराल, तर घरी जावे लागेल. सर्वांकडून व्यवस्थित काम झाले पाहिजे, असा दम मुख्यमंत्र्यांनी पहिल्याच दिवशी दिला आहे. आमचे 'पीएस', 'ओएस' तेच ठरवतात. आमच्या हातात काही राहिले नाही,' अशी कबुली माणिकराव कोकाटे यांनी दिली.

### ■ आंतरराष्ट्रीय बाजारपेठ

'जागतिक बाजार समित्यांप्रमाणे राज्याची पणन व्यवस्था स्पर्धात्मक करणे आवश्यक आहे. राज्यात ३०५ कृषी उत्पन्न बाजार समित्या व त्यांचे ६२५ उपबाजार आवार कार्यरत आहेत. राज्यातील काही आदिवासी भागांत व राज्यातील ६९ तालुक्यांमध्ये नव्याने बाजार समिती सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ॲमस्टरडॅम आणि पॅरिस येथील बाजारपेठेप्रमाणे वाशी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाची बाजारपेठ विकसित करण्यात येणार आहे,' असे जयकुमार रावल यांनी सांगितले.

लोकमत

# 'बाजार समित्या वसुलीसाठी नाहीत'

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** निवडणुकीत खर्च झाला आहे, तो वसूल झाला पाहिजे असे पुणे बाजार समितीतील काही संचालक सांगतात. मात्र, बाजार समित्या या वसुलीसाठी नसून तर जबाबदारीच्या आहेत. संचालक पदावर काम करताना शेतकरी व अन्य बाजार घटकांच्या हितासाठी काम केले पाहिजे, असे खडे बोल पणनमंत्री जयकुमार रावल यांनी या संचालकांना सुनावले.

राज्यस्तरीय पणन परिषदेनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. रावल म्हणाले, "कृषी उत्पन्न बाजार समित्यांना बदलत्या काळानुसार बदलावे लागणार आहे. तसेच कायद्यामध्येही बदल करावा लागणार आहे. बाजार समित्यांनी शेतकऱ्यांना सर्व सुविधा देऊन आकर्षित केले पाहिजे.

सद्यस्थितीत उत्पादित होणाऱ्या मालापैकी ५० टक्केदेखील शेतमाल बाजार समित्यांमध्ये येत नाही. शेतमालास बाजारभाव कमी असल्यास तो शीतगृहांमध्ये ठेवण्यासाठीची सुविधा बाजार समित्यांनी शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली पाहिजे.''

## फुलबाजारातील परवान्यांची चौकशी करणार

**पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फुलबाजारामध्ये १९ जणांना बाजार समितीने प्रतीक्षा यादी डावलून परवाने दिल्याचा प्रकार घडल्याबाबत विचारले असता, हे चुकीचे असून प्रतीक्षा यादीतील अर्जदारांना नियमानुसार परवाने मिळायला हवे होते. या प्रकरणाची चौकशी केली जाईल आणि दोषींवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा रावल यांनी दिला.**

लोकमत

# शेतकरी प्रश्नांना बाजार समित्याच जबाबदार

## कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांची व्यापाऱ्यांवरदेखील टीका

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : एखाद्या पिकाची लागवड केल्यानंतर त्यातून शेतकऱ्याला हमखास भाव मिळेल याची शाश्वती राहिली नसल्याने शेतकरी शेतमाल रस्त्यावर फेकून देतात. सरकारवर रोषही व्यक्त करतात. त्यात शेतकऱ्यांचा दोष नसून बाजारातील अस्थिरता कारणीभूत आहे. ही अस्थिरता दूर झाली पाहिजे. याला केवळ व्यापारी आणि बाजार समिती जबाबदार असल्याची घणाघाती टीका कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केली. त्यासाठी बाजार समितीमधील व्यापाऱ्यांची नोंदणी बंधनकारक करावी, असेही ते म्हणाले.

पणन विभागातर्फे आयोजित राज्यातील बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय परिषदेत ते बोलत होते. यावेळी पणनमंत्री जयकुमार रावल, आमदार दिलीप बनकर, अनुराधा चव्हाण, माजी खासदार देवीदास पिंगळे, सहकार आयुक्त दीपक तावरे, पणन संचालक विकास रसाळ, पुणे बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर, राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम उपस्थित होते.

कृषी विभागाचा आत्मा बाजार समित्या आहेत. शेतकरी विक्री व्यवस्थेवर अवलंबून असल्याने ती नीट न असल्यास शेतकऱ्यांच्या जीवनात काय वाईट दिवस येतात, त्याची कल्पना न केलेली बरी. मागणी व पुरवठ्यातील तफावतीमुळे भाव पडतात आणि शेतकरी अस्थिर होतो.

बांधावरील खरेदीत व्यापाऱ्यांवर कोणतेही बंधन नाही. त्यामुळे शेतकरी लुटला जात असून, सर्व व्यापाऱ्यांना बाजार समितीमध्ये नोंदणी बंधनकारक करावी, असेही कोकाटे म्हणाले. व्यापारी मोकळा कसा सुटू शकतो, शेतकऱ्यांची फसवणूक कशी करू शकतो, असा सवाल करत व्यापाऱ्यांनी बाजार समितीमध्ये अनामत रक्कम जमा करावी, असे त्यांनी सांगितले. व्यापाऱ्यांनी किती माल विकला, किती पैसे परत दिले, किती माल शिल्लक आहे याची तपासणी देखील बाजार समितीने करावी. हे केल्याशिवाय व्यापारी सरळ होणार नाहीत, असेही ते म्हणाले. व्यापाऱ्यांवर बंधने आणणे आवश्यक असून, त्याशिवाय शेतकरी स्थिर होऊ शकणार नाही, असेही ते म्हणाले.




" अजूनही काही बाजार समित्यांची जागा पडून आहे. त्याचा वापर होत नाही. स्थानिक गरजा लक्षात घेऊन तेथे व्यवसाय विकास नियोजन तयार करणे गरजेचे आहे. बाजार समित्यांनी मोठे होऊन शेतकरी आपल्याकडे येतील याची व्यवस्था करावी. शेतकऱ्यांना सुविधा द्याव्यात. सरकारी गोष्टींवर अवलंबून न राहता समित्यांनी स्वतःची व्यवस्था उभी करणे गरजेचे आहे.

**जयकुमार रावल**, पणनमंत्री

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करू

१ राज्यातील बाजार समित्या सरकारी जागांवर उभ्या आहेत. मात्र, काही आमदार कृषी विभागाची जागा बाजार समित्यांना द्यावी, अशी मागणी करत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न प्रलंबित आहेत.

२ यासंदर्भात मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करून करारावर काही जागा देता येणे शक्य आहे का, याची चाचपणी करू, असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले. मात्र, बाजार समिती यांनी केवळ गाळे बांधून त्याची विक्री करू नये. शेतकऱ्यांना काय सुविधा देता येतात हे पाहणे गरजेचे आहे. त्याशिवाय शेतकरी व बाजार समितीमध्ये वेगळे नाते निर्माण होऊ शकणार नाही.



# 'शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून राज्यातील बाजार समित्या सक्षम करणार'

**पुणे :** बाजार समित्या या कृषि पणन व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. अगदी कोरोनाच्या काळातही सर्व व्यवहार ठप्प असतानाही बाजार समित्यांनी शेतमालाची पुरवठा साखळी कर्यक्षमपणे हाताळून सुरळीत राखली. त्याची सरकारने जागतिक बँकेने व प्रसार माध्यमांनीही दखल घेतली आहे. त्यामुळे राज्यातील बाजार समित्यांचे महत्त्व आधोरेखित झाले आहे. महाराष्ट्र हे मोठे कृषी निर्यातदार राज्य आहे. जागतिक बाजार समितीच्या धर्तीवर राज्याची पणन व्यवस्था स्पर्धात्मक करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना केंद्र बिंदू मानून राज्याच्या बाजार समित्या सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन पणनमंत्री तथा राज्य कृषी पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने आयोजित कृषी उत्पन्न बाजार समित्यांची राज्यस्तरीय पणन परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.



यावेळी राज्यचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, आमदार चरणसिंह ठाकूर, कृषी पणन संचालक विकास रसाळ, व्यवस्थापकीय संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्यासह राज्यांतील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक व सचिव उपस्थित होते.

पणनमंत्री रावल पुढे म्हणाले की, या परिषदेत मांडलेल्या सकारात्मक सूचना संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणार आहेत. त्याचप्रमाणे बाजार समित्यांनी अर्थसंकल्पात हक्काचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. शेतमालाच्या उत्पादनाच्या बाबतीत आपण जरी आघाडीवर असलो तरी त्याची पणन व्यवस्था निर्माण करणाच्या अनुषंगाने काम करण्याची गरज आहे. शेतमालाला किफायतशीर भाव मिळण्यासाठी पणन व्यवस्थेला अधिक स्पर्धात्मक करणे आवश्यक आहे. पणन सुविधांच्या अभावामुळे शेतमालाची काही प्रमाणात सुगी पश्चात हानी होते. असे सांगून पणनमंत्री रावल म्हणाले, राज्यातील बहुतांशी बाजार समित्यांच्या मालकीच्या जमिनी गावातील अथवा शहराच्या मोक्याच्या ठिकाणी असून त्यांचा विकास करण्यासाठी बाजार समित्यांनी आराखडा तयार करावा राज्यात एकूण ३०५ कृषी उत्पन्न बाजार समित्या व त्यांचे ६२५ उपबाजार आवार कार्यरत आहेत. राज्यातील आदिवासी भागात तसेच अन्यत्र ६९ तालुक्यांमध्ये बाजार समिती नव्याने स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शेतमालाची विक्री व्यवस्था निर्माण करणे हे बाजार समित्यांच्या स्थापनेच्या वेळचे उदिष्ट होते. तथापी सध्याच्या बदलत्या जागतिकीकरण व उदारी करणाच्या वातावरणात बाजार समित्यांनी त्यांच्या काम काजात बदल करणे आवश्यक आहे. बाजार समित्यांनी अधिकाधिक पारदर्शकता ठेवून शेतकऱ्यांना आधुनिक सुविधा पुरवून आकर्षित केले आहे. बाजार समित्यांनी अधिका-धिक पारदर्शकता ठेवून शेतकऱ्यांना आधुनिक सुविधा पुरवून आकर्षित केले पाहिजे. बाजार समित्यांच्या आवारात पारदर्शक विक्री व्यवहार होत नाहीत त्याबाबत दक्षता घेणे गरजेचे आहे.

अ‍ॅमस्टरडॅम व पॅरिस बाजार पेठांच्या धर्तीवर राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्केट उभारण्याची घोषणा पणनमंत्री जयकुमार रावल यांनी केली. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे म्हणाले, शेतकऱ्यांना सोची-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बाजार समित्यांनी काम करावे. शेतकऱ्यांची गैरसोय टाळावी. शेतकऱ्यांनी सुद्धा रासायनिक शेती ऐवजी सेंद्रीय शेती करण्यावर भर द्यावा. बाजार समित्यांनी राज्यात शेतकरी विक्री केंद्र निर्माण केली पाहिजे. राज्यातील शेतकरी प्रगतशील असून त्याच्या शेतमालाला भाव मिळवून देण्यासोबत त्यांच्या मनातील अस्थिरता कमी करण्यासाठी कृषी व पणन विभागाच्या समन्वयाने येत्या काळात नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येईल.

पणनचे व्यवस्थापकीय संचालक संजय कदम म्हणाले, राज्यातील बाजार समित्यांच्या विविध विषयासंदर्भात संवाद साधण्यासाठी येथे बाजार समित्यांचे राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

पणनमंत्री रावल यांच्या हस्ते २० वर्षाहून अधिक कार्यकाळ पूर्ण केलेल्या सभापतींच्या सन्मान करण्यात आला. यावेळी बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीची वाटचाल आणि कामकाजाबाबतची चित्रफित दाखविण्यात आली.

# पारदर्शकतेअभावी बाजार समित्या बंद पडतील

## बाजार समित्यांच्या परिषदेत पणनमंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केली भीती

**अॅग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : बाजार समित्यांची स्थापना होऊन ५० वर्षांचा काळ लोटला, तरीही अद्याप इथे पारदर्शी व्यवहार होत नाही. बाजार समित्यांमध्ये आवक आणि उलाढाल कमी होत आहे. चुकारे, वजने नीट होत नाहीत. हे चिंताजनक असून, असेच कामकाज सुरू राहिले तर बाजार समित्या बंद पडतील, अशा शब्दात भविष्यातील धोक्यावर पणनमंत्री जयकुमार रावल यांनी कानपिचक्या दिल्या.

राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने सोमवारी (ता.२४) आयोजित कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय पणन परिषदेमध्ये मंत्री रावल बोलत होते. या वेळी कृषिमंत्री माणिक कोकाटे, सहकार आयुक्त दीपक तावरे, पणन संचालक विकास रसाळ, राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, फुलंब्रीच्या आमदार अनुराधा चव्हाण,

पान २ वर »

### 'सभापती, आमदार खासदारांच्या कार्यकर्त्यांची भरती नको'



जयकुमार रावल

अनेक बाजार समित्यांमध्ये अकुशल, कमी शिकलेल्या सभापती, आमदार खासदारांच्या कार्यकर्त्यांची अतिरिक्त भरती केलेली दिसत आहे. यामुळे ९७ टक्के महसूल हा वेतनावर जात आहे. हे भूषणावह नाही. यापुढे कर्मचारी भरती ही उच्चशिक्षित कृषी पदवीधर, एमबीए, प्रक्रिया उद्योग अशा कर्मचाऱ्यांची करा. यावर पणन संचालकांनी लक्ष घालावे अशा सूचना पणनमंत्री रावल यांनी दिल्या.

Pune, Main
25/02/2025 Page No. 3



पुणे : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने सोमवारी (ता. २४) आयोजित कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय पणन परिषदेचे उद्घाटन कृषिमंत्री माणिक कोकाटे यांच्या हस्ते झाले. या वेळी पणन मंत्री जयकुमार रावल यांच्यासह उपस्थित मान्यवर.

# 'पारदर्शकतेअभावी बाजार समित्या बंद पडतील'

» पान १ वरून

नाशिकचे आमदार दिलीप बनकर, आमदार चरणसिंह ठाकूर, माजी खासदार देविदास पिंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

पणनमंत्री रावल म्हणाले, ''काढणीपश्चात तंत्रज्ञान आणि हाताळणी अभावी देशात दर वर्षी दीड लाख कोटी रुपयांच्या शेतीमालाचे नुकसान होत आहे. हे राष्ट्रीय मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी दर्जेदार बाजार व्यवस्थेची गरज आहे. राज्यात एकूण सुमारे दीड लाख कोटी रुपयांच्या शेतीमालाचे उत्पादन होते. मात्र फक्त ७५ हजार कोटी रुपयांच्या शेतीमालाचीच विक्री फक्त बाजार समित्यांमध्ये होते. उर्वरित ७५ हजार कोटी रुपयांचा शेतमाल जातो कुठे असा प्रश्न उपस्थित केला. तसेच बाजार समित्यांच्या सभापती आणि संचालक ही पदे केवळ शोभेची नसून, स्पर्धेच्या युगात जास्तीत जास्त शेतीमाल बाजार समित्यांमध्ये आणण्यासाठी सभापती, संचालकांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रबोधन करून, शेतीमाल संकलन करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासाठी शेतकऱ्यांना संरक्षण देखील देण्याची गरज आहे. बाजार समित्यांची स्थापना होऊन ५० वर्षांचा काळ लोटला, तरीही अद्याप बाजार समित्यांमध्ये पारदर्शी व्यवहार होत नाही. हे चिंताजनक असून, असेच कामकाज सुरू राहिले तर बाजार समित्या बंद पडतील, असा इशाराही दिला.

सर्व बाजार समित्यांनी स्वतःचा व्यवसाय विकास आराखडा करण्याची गरज आहे. या आराखड्यातून आंतरराष्ट्रीय गुंतवणूक बाजार समित्यांमध्ये कशी होईल, याद्वारे वेअर हाउसिंग, ऑनलाइन मार्केटिंग, शीतगृहे यांसारख्या सुविधांचा देखील विचार करण्याची गरज असल्याचे मंत्री रावल म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय कदम यांनी केले, तर आभार विनायक कोकरे यांनी मानले.

बाजार समित्यांना पर्याय म्हणून खासगी बाजार समित्या, थेट पणन आदी सुधारणा केल्या. या सुधारणा फायद्याच्या नसल्याचे देखील मंत्री रावल म्हणाले. या व्यवस्था फायद्याच्या ठरल्या नसल्याचे बाजार समित्यांची जबाबदारी वाढली आहे. यासाठी बाजार समित्यांनी स्वतः शेतीमाल संकलनासाठी बांधावर गेले पाहिजे. राज्यात ७५ वर्षांनंतरही ५० तालुक्यांमध्ये समित्या नाहीत. या समित्या उभारणीसाठी शासन प्रयत्न करणार आहे.

शेतीमालाची आवक वाढली की इथे दर पाडले जातात. मला खरे-खोटे माहिती नाही, पण चीनला शेतीमालाची आवक वाढली की आपल्या इथे दर पाडले जातात. हे योग्य नसल्याचे सांगत मंत्री रावल यांनी व्यापाऱ्यांबद्दल नाराजी व्यक्त केली.

Pune, Main
25/02/2025 Page No. 4

मुंबई तरुण भारत
Main Edition | 2025-02-24 | Page- 3
epaper.mahamtb.con

# बाजार समित्यांची आज राज्यस्तरीय परिषद

**मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी**

राज्यातील बाजार समित्यांच्या विविध विषयांसंदर्भात संवाद साधण्यासाठी सोमवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी पुणे येथे बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पणनमंत्री तथा 'महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळा'चे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी दिली. या परिषदेत राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक व सचिव सहभागी होणार आहेत.

'महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ', पुणे मार्फत आयोजित ही परिषद पुण्याच्या बाणेरमधील बंटारा भवन येथे होणार असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन होईल. तर पणन व राजशिष्टाचारमंत्री जयकुमार रावल यांच्यासह कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे आदी या परिषदेस उपस्थित राहणार असल्याची माहिती मंत्री रावल यांनी दिली.

राज्यातील ३०५ बाजार समित्या व त्यांचे ६२३ उपबाजारांच्या माध्यमातून राज्यात उत्पादित शेतमालाची सुरळीत विक्री व्यवस्था विकसित करण्याचे कामकाज गेल्या ४० वर्षांपासून सुरू आहे. राज्यातील बाजार समित्यांच्या कामकाजात कालानुरूप बदल घडविणे, शेतमालाच्या विपणनामध्ये आधुनिक बाबींचा अंगीकार करणे, शेतकरी व इतर सर्व बाजार घटकांना द्यायच्या सोई-सुविधा, त्यात येणाऱ्या अडचणी व त्यावर करायच्या उपाय योजना आदी विषयांसंदर्भात या परिषदेमध्ये चर्चा केली जाणार आहे.

राज्यात कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणाबरोबरच सुसूत्रता आणि समन्वयता आणण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय नियोजनाचे कामकाजही करण्यात येत आहे. 'कृषी पणन मंडळा'ने कृषी पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण, सुधारणा आणण्याबरोबरच राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प राबविणे, योजना राबविणे, नवीन कार्यक्रम आखणे याचबरोबर शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या संस्थांच्या विकासासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्यात येत आहेत. राज्यातील बाजार समित्यांचे पदाधिकारी, अधिकारी-कर्मचारी यांच्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहेत. तसेच, राज्यात कृषी मालासाठी निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करून त्यांच्यामार्फत निर्यातवृद्धी करण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून या परिषदेचे आयोजन करण्यात येत असल्याचे मंत्री रावल यांनी सांगितले.

या परिषदेमध्ये राज्यातील बाजार समित्यांचे आधुनिकीकरण, बाजार समितीनिहाय विकास आराखडा, बाजार समित्यांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात येणाऱ्या अडीअडचणी व उत्पन्न वाढीसाठी करायच्या उपाययोजना आदींबाबत चर्चा अपेक्षित असल्याची माहिती 'महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळा'चे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

Sanjwarta, 24/02/2024

# राज्यातील सर्व बाजार समित्यांचे राज्यस्तरीय परिषदेचे पुणे येथे आयोजन

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे मार्फत राज्यातील ३०५ बाजार समित्या व त्यांचे ६२३ उप बाजारांचेमाध्यमातून राज्यात उत्पादित शेतमालाची सुरळीत विक्री व्यवस्था विकसीत करण्याचे कामकाज गेल्या ४० वर्षापासून सुरु आहे. हे करीत असताना राज्यात कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणाबरोबरच सुसूत्रता आणि समन्वयता आणण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय नियोजनाचे कामकाजही करण्यात येत आहे. कृषि पणन मंडळाने कृषी पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण, सुधारणा आणण्याबरोबरच राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प राबविणे, योजना राबविणे, नवीन कार्यक्रम आखणे तसेच शेतकरी आणि शेतक-यांच्या संस्थांच्या विकासासाठी नियोजनबध्द प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याचबरोबर राज्यातील बाजार समित्यांचे पदाधिकारी, अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहेत. तसेच राज्यात कृषि मालाच्या निर्यातीसाठी निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करुन त्यांचेमार्फत निर्यातवृध्दी करण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत.

हे कामकाज करीत असताना, कृषि पणन मंडळाने पणन विकासासाठी आजपर्यंत केलेले कामकाज, राज्यातील बाजार समित्यांचे कामकाजात करावयाचे कालानुरूप बदल, शेतमालाच्या विपणनामध्ये अंगीकारावयाच्या आधुनिक बाबी, शेतकरी व इतर सर्व बाजार घटकांना द्यावयाच्या सोई-सुविधा, त्यात येणा-या अडचणी व त्यावर करावयाच्या उपाय योजना इत्यादी विषयाचे अनुषंगाने संवाद साधण्यासाठी मा.ना.श्री. जयकुमार रावल, मंत्री ( पणन व राजशिष्टाचार) महाराष्ट्र राज्य, तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांनी राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक व सचिव यांची दि. २४/०२/२०२५ रोजी पुणे येथे (स्थळ - बंटारा भवन, सव्हे क्र.१०४/१-पार्ट, मर्सिडीज शोरूम जवळ, मुंबई-बेंगलोर हायवे, बाणेर, पुणे - ४५ ) राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार सदर परिषदेचे आयोजन करण्यात येत आहे.

या राज्यस्तरीय परिषदेचे उद्घाटक म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना.श्री. अजित पवार हे राहणार असुन, प्रमुख उपस्थितीमध्ये मा. ना. श्री. जयकुमार रावल, मंत्री, पणन व राजशिष्टाचार तथा अध्यक्ष महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे, मा. ना. श्री. माणिकराव कोकाटे, मंत्री, कृषि विभाग, तसेच मा. श्री. प्रविण दराडे (भा.प्र.से.), प्रधान सचिव, सहकार व पणन, महाराष्ट्र राज्य व इतर मान्यवरांचे उपस्थितीत सदर पणन परिषद संपन्न होणार आहे. तसेच या परिषदेस राज्यातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक, सचिव यांना निमंत्रीत केलेले आहे.

सदर परिषदेमध्ये राज्यातील बाजार समित्यांचे आधुनिकीकरण, बाजार समितीनिहाय विकास आराखडा, बाजार समित्यांना त्यांचे दैनंदिन कामकाजात येणा-या अडीअडचणी व उत्पन्न वाढीसाठी करावयाच्या उपाययोजना इत्यादीबाबत चर्चा अपेक्षित असल्याची माहिती श्री. संजय कदम, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांनी दिली. सदर परिषदेस राज्यातील सर्व निमंत्रीत बाजार समित्यांचे पदाधिकारी, अधिकारी तसेच शासकीय अधिकारी उपस्थित रहाणार आहेत.

Punyanagari, 24/02/2025

# पुण्यात आज बाजार समित्यांची राज्यस्तरीय परिषद : जयकुमार रावल

**मुंबई** : राज्यातील बाजार समित्यांच्या विविध विषयांसंदर्भात संवाद साधण्यासाठी सोमवार, २४ फेब्रुवारी रोजी पुणे येथे बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पणन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी दिली. या परिषदेत राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक व सचिव सहभागी होणार आहेत.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणेमार्फत आयोजित ही परिषद पुण्याच्या बाणेरमधील बंटारा भवन येथे होणार असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन होईल. तर पणन मंत्री रावल यांच्यासह कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे आदी या परिषदेस उपस्थित राहतील.

राज्यातील ३०५ बाजार समित्या व त्यांचे ६२३ उपबाजारांच्या माध्यमातून राज्यात उत्पादित शेतमालाची सुरळीत विक्री व्यवस्था विकसित करण्याचे कामकाज गेल्या ४० वर्षांपासून सुरू आहे. राज्यातील बाजार समित्यांच्या कामकाजात कालानुरूप बदल घडविणे, घटकांना द्यावयाच्या सोयी-सुविधा, त्यात येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाच्या उपाययोजना आदी विषयांसंदर्भात या परिषदेमध्ये चर्चा केली जाणार आहे. या परिषदेमध्ये राज्यातील बाजार समित्यांचे आधुनिकीकरण, बाजार समितीनिहाय विकास आराखडा, बाजार समित्यांच्या अडीअडचणी व उत्पन्नवाढीसाठी करावयाच्या उपाययोजना आदींबाबत चर्चा अपेक्षित आहे.

## निर्यातवृद्धीसाठी कोल्ड स्टोरेज उभारणार

१ राज्यात कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणाबरोबरच सुसूत्रता आणि समन्वयता आणण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय नियोजनाचे कामकाजही करण्यात येत आहे.

२ कृषी पणन मंडळाने कृषी पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण, सुधारणा आणण्याबरोबरच राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प राबविणे, योजना राबविणे, नवीन कार्यक्रम आखणे याचबरोबर शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या संस्थांच्या विकासासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्यात येत आहेत.

३ राज्यातील बाजार समित्यांचे पदाधिकारी, अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहेत.

४ राज्यात कृषी मालासाठी निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करून त्यांच्यामार्फत निर्यातवृद्धी करण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न करण्यात येत आहेत.

५ याचाच एक भाग म्हणून या परिषदेचे आयोजन करण्यात येत असल्याचे मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

# पारदर्शी व्यवहार, शेतकऱ्यांना न्याय द्या

## राज्यव्यापी परिषदेच्या निमित्ताने बाजार घटकांच्या सरकारकडून अपेक्षा



गणेश कोरे : ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : शेतीमाल खरेदी विक्रीसाठी महत्त्वाची व्यवस्था असलेल्या बाजार समित्या कार्यपद्धती आणि पणन कायद्यामध्ये आमूलाग्र बदलांची अपेक्षा शेतकरी, अडते, व्यापारी, बाजार घटक आणि अभ्यासकांनी बाजार समितीच्या राज्यव्यापी परिषदेच्या निमित्ताने व्यक्त केली आहे. बाजार समित्यांमध्ये पारदर्शी व्यवहार, सुरक्षितता, विविध करआकारणीमध्ये बदल आणि पणन कायद्यात सुसंगत बदल आणि शेतकऱ्यांचे कत्तलखाने ही ओळख पुसावी, अशा अपेक्षा व्यक्त केल्या आहेत.

राज्य बाजार समिती संघाचे अध्यक्ष बाळासाहेब नहाटा यांनी परिषदेच्या निमित्ताने विविध अपेक्षा सरकारकडे व्यक्त केल्या आहेत. ते म्हणाले, ''पणन कायदा अस्तित्वात आल्यापासून बाजार शुल्क ७५ पैसे ते १ रुपया एवढेच आहे. बाजार आवारात जास्तीत जास्त शेतीमाल यावा, उलाढाल वाढावी यासाठी हे शुल्क २५ पैसे करण्याचा अधिकार बाजार समित्यांना देण्यात यावा. तसेच बांधकाम परवानगीच्या १२(१) परवानगीच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात यावे. अभ्यास दौऱ्यांसाठीच्या खर्चाच्या मर्यादेत वाढ करण्यात यावी. आमदार, खासदार निधी विकास कामांना वापरासाठी मिळावा. सचिव नियुक्तीसाठी स्वतंत्र पॅनेल हवे. दांगट समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी. वीजबिल घरगुती दराने आकारणी व्हावी. नगर आणि महानगरपालिकांच्या करांची माफी मिळावी.''

### शेतकऱ्यांचे कत्तलखाने ही ओळख पुसावी : रामभाऊ वाळुंज

शेतकरी संघटनेचे संस्थापक दिवंगत शरद जोशी यांनी बाजार समित्या या राजकारणाचे अड्डे आणि शेतकऱ्यांचे कत्तलखाने झाले असल्याचे वास्तव मांडले होते. ते अजूनही तसेच असून, ही ओळख बाजार समित्यांनी पुसून बाजार समित्या शेतकऱ्यांसाठी वरदान ठराव्यात. यामधून शेतकऱ्यांना पारदर्शी व्यवहार, रास्त दर, प्रत्येक माल विक्रीच्या अधिकृत पावत्या, गरजेच्या सुविधा, वजन काटे यावर बाजार समितीत्यांचे नियंत्रण हवे. तसेच शीतगृहे आणि प्रक्रिया उद्योग उभारावेत, अशा अपेक्षा बाजार समिती प्रश्नाचे अभ्यासक आणि प्रगतशील शेतकरी रामभाऊ वाळुंज (खानापूर, ता. जुन्नर) यांनी व्यक्त केली.

### पणन कायद्यात बदल व्हावेत : ॲड. लडकत

कृषी पणनवर्धिणीचे ॲड. नरेंद्र लडकत म्हणाले, ''राज्यात ३५८ तालुके आहेत व फक्त ३०५ बाजार समित्या आहेत. याचा अर्थ आजही अनेक तालुक्यांना स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समिती नाहीत. अशा अनेक बाजार समिती आहे, की ज्यांना शेतीमाल खरेदी विक्रीसाठी आवश्यक त्या सोयीसुविधा असलेले बाजार आवार नाहीत. असे असतानाही २०२२ मध्ये तत्कालीन सरकारने कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये बिगर शेतीमालाच्या विपणनास परवानगी दिलेली आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांसाठी त्यांच्या शेतीमालाच्या खरेदी-विक्रीसाठी आज स्वतंत्र बाजारपेठ कायद्याने अस्तित्वात नाही.''

### बाजार समित्यांमध्ये शेतकरी पोरका : ॲड. पांडे

केवळ शासकीय अनुदान, निधी, सवलती घेण्यापुरते बाजार समित्या शेतकऱ्यांच्या साठी असा आव आणला जातो मात्र प्रत्यक्षात या बाजार समित्यांच्या आवारात शेतकरी पोरका असतो. आडतदारांच्या गाळ्या पुढे त्यांचेच नेमलेले डमी लोक किरकोळ शेतीमाल विक्री करतात. या सर्व बाबींचा बाजार समित्यांनी परिषदेच्या निमित्ताने गांभियनि विचार करण्याची अपेक्षा सहकार आणि पणन अभ्यासक ॲड. योगेश पांडे यांनी व्यक्त केली. पुणे बाजार समितीमधील भुसार विभागातील आडतदार राजेश शहा म्हणाले, ''पुणे बाजार समिती पुरत बोलायचे झाले तर, ५० वर्षांपूर्वी उभारलेला बाजार आवार आणि इमारती आता कमी पडत आहेत.''

Marashtra Times, 23/02/2025

# बाजार समित्यांची उद्या राज्यस्तरीय परिषद

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन**

म. टा. प्रतिनिधी, पुणे



अजित पवार

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती आदींसोबत बाजार समितीचे कामकाज आणि त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी येत्या सोमवारी (२४ फेब्रुवारी) बाणेर येथील बंटारा भवन येथे राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार आहे.

परिषदेला पणनमंत्री जयकुमार रावल, कृषिमंत्री अॅड. माणिकराव कोकाटे, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक, सचिव उपस्थित राहणार आहेत. मंडळाने पणन विकासासाठी आतापर्यंत केलेले कामकाज, राज्यातील बाजार समित्यांचे कामकाजात करावयाचे कालानुरूप बदल, शेतमालाच्या विपणनामध्ये अंगीकारावयाच्या आधुनिक बाबी, शेतकरी आणि इतर सर्व बाजार घटकांना द्यावयाच्या सोयी-सुविधा, त्यात येणाऱ्या अडचणी व त्यावर करायच्या उपाययोजना; तसेच राज्यातील बाजार समित्यांचे आधुनिकीकरण, बाजार समितीनिहाय विकास आराखडा, बाजार समित्यांना त्यांचे दैनंदिन कामकाजात येणाऱ्या अडीअडचणी व उत्पन्नवाढीसाठी करावयाच्या उपाययोजना आदी विषयांवर परिषदेत चर्चा करण्यात येणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली आहे.

मुंबई तरुण भारत

Pune Edition | 2025-02-22 | Page- 3
epaper.mahamtb.con

# बाजार समित्यांची राज्यस्तरीय परिषद

**पुणे, दि. २१ : प्रतिनिधी**

राज्यातील बाजार समित्यांचे कामकाजात करावयाचे कालानुरूप बदल, शेतमालाच्या विपणनामध्ये अंगीकारावयाच्या आधुनिक बाबी, शेतकरी व इतर सर्व बाजार घटकांना द्यावयाच्या सोयीसुविधा, त्यात येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाच्या उपाययोजना इत्यादी विषयांचे अनुषंगाने संवाद साधण्यासाठी पुण्यात येत्या सोमवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन केले जाणार आहे.

बाणेर येथील बंटारा भवनात होणाऱ्या या परिषदेचे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार करणार असल्याची माहिती कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून पणनमंत्री ना. जयकुमार रावल, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, सहकार व पणनचे प्रधान सचिव प्रविण दराडे आणि अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## सोमवारी पुण्यात आयोजन

कृषि पणन मंडळाने कृषी पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण, सुधारणा आणण्याबरोबरच राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प राबविणे, योजना राबविणे, नवीन कार्यक्रम आखणे याअनुषंगाने संवाद साधण्यासाठी ही परिषद होत आहे.

यात राज्यातील बाजार समित्यांचे आधुनिकीकरण, बाजार समितीनिहाय विकास आराखडा, बाजार समित्यांना त्यांचे दैनंदिन कामकाजात येणाऱ्या अडीअडचणी व उत्पन्नवाढीसाठी करावयाच्या उपाययोजना इत्यादीबाबत चर्चा अपेक्षित असल्याची माहिती कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. या परिषदेस राज्यातील सर्व निमंत्रित बाजार समित्यांचे पदाधिकारी, अधिकारी तसेच शासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

Powered by Bharati Web

Sakal, 22/02/2025

# कृषी निर्यातीत अभूतपूर्व वाढ

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताच्या कृषी निर्यातीला अभूतपूर्व गती मिळून तिचा मोठा विस्तार झाला आहे. त्यामुळेच आता देशातली अनेक उत्पादने पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोचू लागली आहेत. महत्त्वाचे म्हणजे हा ऐतिहासिक विस्तार केवळ व्यापारापुरता मर्यादित नाही, तर शेतकऱ्यांचे सक्षमीकरण, ग्रामीण भागातील उत्पन्नात वाढ आणि भारताच्या समृद्ध कृषी परंपरेला जागतिक पातळीवर स्थान मिळवून देणे ही आणि अशी अनेक ध्येय उद्दिष्टेही केंद्र सरकारने या विस्ताराच्या प्रक्रियेत गाठली आहेत याची दखलही घ्यावी लागेल. महत्त्वाचे म्हणजे अशाप्रकारची ही पहिली वहिली निर्यात म्हणजे आत्मनिर्भर भारत हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारचा दृष्टिकोन भारतातील शेतकऱ्यांसाठी कशा प्रकारे नव्या संधी निर्माण करत आहे, हे ठळकपणे अधोरेखित करणारी निर्यात असल्याचे निश्चितच म्हणता येईल.

## पोलंडला अंजीर रसाची निर्यात



भारताची भौगोलिक निर्देशांक (GI) मानांकन प्राप्त पुरंदर अंजीर आता युरोपीय बाजारपेठेत निर्यात होऊ लागली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारच्या प्रयत्नांमुळे २०२४ मध्ये भारताने पहिल्यांदाच प्राशनासाठी तयार असलेल्या (Ready-to-Drink) असलेल्या पुरंदर अंजीर रसाची पोलंडला निर्यात केली होती. महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील पुरंदर अंजीर हे त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण चवीसाठी आणि वैशिष्ट्यपूर्ण रचनात्मक गुणधर्मांसाठी प्रसिद्ध आहेत.

## ड्रॅगन फळाची निर्यात



आपल्या फळ निर्यातीत वैविध्यता आणण्यासाठीच्या प्रयत्नांअंतर्गत भारताने २०२१ मध्ये तंतू संपन्न आणि जीवनसत्त्वयुक्त ड्रॅगन या फळाची पहिल्यांदाच लंडन आणि बहारीन इथे निर्यात केली. स्थानिक पातळीवर हे फळ कमलम या नावानेही ओळखले जाते. महत्त्वाचे म्हणजे लंडनला निर्यात केलेला या फळाचा साठा गुजरातच्या कच्छ भागातील शेतकऱ्यांनी उत्पादित केला होता, तर बहारीनला निर्यात झालेला फळांचा साठा पश्चिम मिदनापूर (पश्चिम बंगाल) इथल्या शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला होता.

## अमेरिकेला डाळिंबाची निर्यात



अमेरिकेतील बाजारपेठांमधील आपले अस्तित्व विस्तारण्याच्या दृष्टीने भारताने टाकलेले मोठे पाऊल म्हणजे २०२३ मध्ये भारताने अमेरिकेला प्रायोगिक तत्त्वावर हवाई मार्गाने केलेली पहिली वहिली डाळिंबाची निर्यात. त्यावेळी भारताने महाराष्ट्रातील भगवा या जातीची डाळिंबांची अमेरिकेला निर्यात केली होती. या फळाच्या होणाऱ्या एकूण निर्यातीपैकी ५० टक्के निर्यात ही महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातून केली जाते.

## लेटेकू फळाची दुबईला निर्यात



केंद्र सरकारने २०२१ मध्ये आसाममधील लेटेकू या नावाने ओळखल्या जाणाऱ्या बर्मीज द्राक्षांची पहिल्यांदाच दुबईला निर्यात केली. एका अर्थाने या निर्यातीने आसाममधील या वैशिष्ट्यपूर्ण फळाला जागतिक पातळीवर स्थान मिळवून दिले, आणि ही निर्यात आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या अनुषंगाने ईशान्य भारताची क्षमता अधोरेखित करणारी ठरली.

## फणसाची जर्मनीला निर्यात




भारताने २०२१ मध्ये पहिल्यांदाच त्रिपुरातील ताज्या फणसाची जर्मनीला निर्यात केली आणि तिथल्या नागरिकांना या फळाची अनोखी चव चाखण्याची संधीही दिली. त्रिपुरातील फणसांचा साठा जर्मनीला हवाई मार्गाने निर्यात केला गेला होता. आगरताळा इथून केल्या गेलेल्या या निर्यातीअंतर्गत सुमारे एक मेट्रिक टन इतका फणसाचा साठा निर्यात केला गेला.

## राजा मिर्चाची लंडनला निर्यात



ईशान्य भारतातील भौगोलिक निर्देशांक (GI) मानांकन प्राप्त उत्पादनांच्या निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने भारताने २०२१ मध्ये मिरची उत्पादनाचा राजा अर्थात किंग चिली म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नागालँडमधील राजा मिर्चा या मिरचीची लंडनला निर्यात केली. गुहावटीवरून हवाई मार्गाने हा मिरचीचा साठा लंडनला निर्यात केला गेला होता. हे उत्पादन नाशवंत असल्याने त्याची निर्यात करणे आव्हानात्मक होते, पण भारताने त्यावरही मात करत ही निर्यात यशस्वी करून दाखवली.

## 'रेड राइस'ची निर्यात



भारताने जगाला तांदूळ उत्पादन निर्यात क्षमताही जगाला दाखवून दिली. तांदूळ निर्यात क्षमता वाढवण्याच्या उद्देशाने भारताने २०२१ मध्ये पहिल्यांदाच अमेरिकेत लाल तांदळाची (red rice) निर्यात केली होती. या लाल तांदळात लोहाचे विपुल प्रमाण आढळते. आसामच्या ब्रह्मपुत्रा खोऱ्यातील रसायनांचा वापर न करता या लाल तांदळाच्या पिकाचे उत्पादन घेतले जाते. स्थानिक पातळीवर भाताच्या या जातील बाओ धान (Bao-Dhaan) म्हणूनही ओळखले जाते.

## अननसांची दुबईला निर्यात



केरळमधील भौगोलिक निर्देशांक (GI) मानांकन प्राप्त वाळाकुलम या जातीच्या अननसाची पहिल्यांदाच २०२२ मध्ये संयुक्त अरब अमिरातीतील दुबई आणि शारजा इथे निर्यात केली. प्रामुख्याने केरळमधल्या वाळाकुलम आणि एर्नाकुलम इथे या अननसांचे उत्पादन घेतले जाते. केंद्राच्या प्रयत्नांतून सुरू झालेल्या या निर्यातीमुळे या अननसाचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना अधिकचे उत्पन्न मिळेल.

Sakal, 22/02/2025

# राज्यस्तरीय पणन परिषदेचे सोमवारी बाणेरमध्ये आयोजन

मार्केट यार्ड, ता. २१ : राज्यातील बाजार समित्यांच्या अडचणी, कामकाजात करावयाचे कालानुरूप बदल, शेतमालाच्या विपणनामध्ये अंगीकारायच्या आधुनिक बाबी, यांसह विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी राज्य कृषी पणन मंडळाकडून राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन केले आहे. ही परिषद सोमवारी (ता. २४) बंटारा भवन, मर्सिडीज शोरूमजवळ, मुंबई-बंगळूर महामार्ग, बाणेर येथे होईल.

परिषदेचे उद्घाटन सकाळी १० वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होईल. पणनमंत्री जयकुमार रावल, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, सहकार आणि पणनचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यावेळी राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक, सचिव यांना निमंत्रित केले आहे, अशी माहिती राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

पुण्य नगरी

# बाजार समित्यांची सोमवारी परिषद

**पुणे** : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती आदींसोबत बाजार समितीच्या कामकाज व सुधारणा करण्याच्या अनुषंगाने येत्या सोमवारी (दि. २४) बाणेर बंटारा भवन येथे राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन केले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन होणार आहे. पणनमंत्री जयकुमार रावल, कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, प्रधान सचिव प्रविण दराडे, बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक उपस्थित राहणार आहेत.

Pune Edition
Feb 22, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# कोथरूड येथे संत्रा महोत्सवाची सुरुवात



**। पुणे : प्रतिनिधी**

कोथरूड पुणे येथील गांधी भवनात कृषि पणन मंडळाने आयोजीत केलेल्या संत्रा महोत्सव २०२५ ची संत्रा उत्पादक शेतकरी व संत्रा खरेदीदार ग्राहक यांच्या हस्ते महोत्सवाची फित कापून सुरुवात करण्यात आली.

संत्रा महोत्सवात नागपूर व अमरावती भागातील एकुण ५० शेतकऱ्यांनी सहभाग घेतला असुन, संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी मृग बहारातील साधारणपणे २५ टन संत्रा विक्रीसाठी उपलब्ध केला आहे. महोत्सवात साधारणपणे साईजनुसार रू. ८० ते रु. १०० प्रति किलो दर उत्पादक आकारत आहेत. संत्रा हा मृग बहारातील असुन, चवीला गोड आहे. महोत्सवात संत्र्या सोबत फ्रेश ज्युस व इतर उत्पादने महोत्सवातील २५ स्टॉलवर उपलब्ध असल्याने, त्याचे खरेदीवेळी ग्राहकांनी समाधान व्यक्त केले आहे.

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दरवर्षी उत्पादक ते ग्राहक थेट विक्री संकल्पने अंतर्गत आंबा, संत्रा, द्राक्षे, काजु, गुळ, बेदाणा, मिलेट्स अशा विविध महोत्सवांचे आयोजन करण्यात येते.

विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा हा उद्देश या महोत्सवाच्या आयोजनामागे असतो. कृषि पणन मंडळामार्फत दरवर्षी आयोजीत करण्यात येणाऱ्या विविध महोत्सवाचा प्रतिसाद पाहता, विदर्भातील शेतकऱ्यांसाठी गांधी भवन, कोथरूड येथे संत्रा महोत्सवाचे आयोजन केले आहे. हा महोत्सव २६ फेब्रुवारी पर्यंत सुरु राहणार असून पुणेकरांनी घ्यावा, असे आवाहन कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले आहे.

Pune Edition
Feb 22, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# बाजार समित्यांची परिषद सोमवारी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या सूचनेनुसार महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या पुढाकाराने कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन येत्या सोमवारी (दि.२४) येथे करण्यात आले आहे. बाजार समित्यांच्या कामकाजात करावयाचे काळानुरूप बदल, मार्केटिंगमध्ये अंगिकारावयाच्या आधुनिक बाबी, शेतकऱ्यांसह बाजार घटकांना द्यावयाच्या सोयी-सुविधा व अडचणींवर ऊहापोह होऊन उत्पन्न वाढीच्या उपाययोजनांसाठी ही परिषद महत्त्वाची ठरणार आहे.

▪ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन

या परिषदेचे उद्घाटन सकाळी १० वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. या परिषदेसाठी पणन व राजशिष्टाचारमंत्री व पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे आदींसह राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक, सचिव उपस्थित राहणार असल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

मुंबई- बंगलोर हमरस्त्यावर बाणेर येथील बंटारा भवनात (मर्सडीज शोरूम जवळ) ही परिषद होणार आहे. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत राज्यात कृषी मालाच्या निर्यातीसाठी निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. त्यामार्फत शेतमाल निर्यातवृद्धी सातत्याने विविध स्तरांवर प्रयत्न करण्यात आल्याने त्याचा फायदा राज्याच्या शेतमाल निर्यातवाढीस झाला आहे. राज्यातील ३०५ कृषी उत्पन्न बाजार समित्या व त्यांचे ६२३ उपबाजारांच्या माध्यमातून राज्यात उत्पादित शेतमालाची सुरळीत विक्री व्यवस्था विकसित करण्याचे कामकाज गेल्या ४० वर्षांपासून सुरू आहे.

Pune Gramin Edition
Feb 22, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

Maharashtra Times, 22/02/2025

# नागपूर, अमरावतीची संत्री पुण्यात दाखल

## कोथरूडमधील गांधी भवनात संत्री महोत्सव



म. टा. प्रतिनिधी, पुणे

उत्पादक ते ग्राहक थेट विक्री धोरणानुसार राज्य कृषी पणन मंडळातर्फे आयोजित संत्री महोत्सवाचे उद्‌घाटन शेतकरी आणि ग्राहक यांच्या हस्ते गुरुवारी झाले. कोथरूड येथील गांधी भवन येथे २६ फेब्रुवारीपर्यंत हा महोत्सव सुरू राहणार असून, थेट शेतकऱ्यांकडून संत्री खरेदी करता येणार आहेत.

**उत्पादक ते ग्राहक थेट विक्री**

मंडळातर्फे दर वर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेनुसार विविध महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा, या उद्देशाने संत्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

**पन्नास शेतकऱ्यांचा सहभाग**

संत्री महोत्सवात नागपूर व अमरावती भागातील पन्नास शेतकऱ्यांनी भाग घेतला आहे. मृग बहरातील २५ टन संत्री या महोत्सवात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. मृग बहरातील चवीला गोड अशी संत्री ८० ते शंभर रुपये प्रतिकिलो दराने येथे मिळणार आहेत. बाजारभावापेक्षा हा दर कमी आहे, अशी माहिती 'राज्य कृषी पणन मंडळा'चे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

**संत्र्याची इतरही उत्पादने**

महोत्सवात संत्र्याचा चवदार ताजा रस, संत्रा बर्फी व इतर संत्रा उत्पादने ग्राहकांना थेट उत्पादकांकडून उपलब्ध होणार आहेत. विदर्भातील उच्च प्रतीची नागपुरी संत्री आणि इतर उत्पादित पदार्थांच्या खरेदीसाठी नागरिकांनी महोत्सवाला भेट द्यावी, असे आवाहन कदम यांनी केले आहे.

लोकमत

# राज्यातील बाजार समित्यांची सोमवारी होणार परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्यातील बाजार समित्यांचे आधुनिकीकरण, त्यांचा विकास आराखडा, कामकाजात करण्यात येणारे बदल, त्यांच्या अडचणी, शेतमालाच्या विपणनात अंगीकारावयाच्या आधुनिक बाबी, शेतकरी व इतर सर्व बाजार घटकांना द्यावयाच्या सोयीसुविधा, त्यात येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाययोजना याबाबत चर्चा करण्यासाठी सोमवारी (दि. २४) राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन केले आहे. पणनमंत्री तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांच्या निर्देशाप्रमाणे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती आदींसोबत यात चर्चा केली जाणार आहे. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन होणार आहे. पणनमंत्री रावल, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक, सचिव उपस्थित राहतील.

Pune Main
Page No. 12 Feb 22, 2025
Powered by: erelego.com

Kesari, 22/02/2025

# राज्यांतील बाजार समित्यांचे २४ फेब्रुवारीला राज्यस्तरीय परिषद

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे सभापती-उपसभापती आदीसोबत बाजार समित्याच्या कामकज व त्यामध्ये सुधारण करण्याच्या अनुषंगाने २४ फेब्रुवारी २०२५ रोजी बाणेर येथील बंटारा भवन येथे राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. बाजार समित्यांच्या राज्य परिषदेचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, पणनमंत्री जयकुमार रावल, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे यांच्यासह सर्व बाजार समित्यांचे सभापती-उपसभापती संचालक सचिव उपस्थित राहणार आहे. या परिषदेत पणन विकासासाठी आजपर्यंत केलेले कामकाज राज्यातील बाजार समित्यांचे कामकाजात करावयाचे कालानुरूप बदल, शेतमालाच्या विपणनामध्ये अंगिकारावयाच्या आधुनिक बाबी, शेतकरी व इतर सर्व बाजार घटकांना द्यावयाच्या सोई सुविधा त्यात येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाच्या उपाययोजनेस बाजार समित्यांचे आधुनिकीकरण, बाजार, समितीनिहाय विकास आराखडा, बाजार समित्यांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात येणाऱ्या अडीअडचणी व उत्पन्न वाढीसाठी करावयाच्या उपाययोजना आदी चर्चा करण्यात येणार आहे.

अॅग्रोवन

# पुणे येथे सोमवारी बाजार समित्यांची राज्यस्तरीय परिषद

## उपमुख्यमंत्री अजित पवार उद्‍घाटक; पणनमंत्र्यांची उपस्थिती

**अॅग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : पारंपरिक बाजार व्यवस्थेतून बाजार समित्यांना बाहेर काढत, पारदर्शी व्यवहार, अत्याधुनिक बाजार व्यवस्था आणि पणन सुधारणांवर चर्चा करण्यासाठी राज्यातील सर्व बाजार समित्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या राज्यव्यापी परिषदेचे पणन मंडळाच्या वतीने सोमवारी (ता. २४) बाणेर येथे आयोजन करण्यात आले आहे.

या परिषदेचे उद्‍घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते सकाळी १० वाजता होणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून पणनमंत्री जयकुमार रावल, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे उपस्थित राहणार आहेत. राज्यात ३०५ बाजार समित्या व त्यांचे ६२३ उपबाजारांच्या माध्यमातून राज्यात उत्पादित शेतीमालाची विक्री व्यवस्था विकसित करण्याचे कामकाज गेल्या ४० वर्षांपासून सुरू आहे. या कामकाजात सुसूत्रता आणि आधुनिकता आणण्यासाठी परिषदेचे आयोजन करण्यात आल्याचे पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी सांगितले.

परिषदेमध्ये राज्यातील बाजार समित्यांचे आधुनिकीकरण, बाजार समितीनिहाय विकास आराखडा, बाजार समित्यांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात येणाऱ्या अडीअडचणी व उत्पन्न वाढीसाठी करावयाच्या उपाययोजना यावर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

### आरोप-प्रत्यारोपांमुळे मागील परिषद झाली होती रद्द

तत्कालीन पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या उपस्थितीत निगडी येथे परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र १२(१) च्या परवानग्यांमध्ये भ्रष्टाचार होत असल्याच्या बाजार समिती संघाच्या आरोपांनंतर सत्तार यांनी आगपाखड करत भर परिषदेमधून काढता पाय घेतला होता. यावर बाजार समिती पदाधिकाऱ्यांनी सत्तार यांच्या विरोधात घोषणाबाजी केली होती. पणन मंडळाचा या सर्व आयोजनाचा लाखो रुपये खर्च वाया गेला होता.

Pune, Main
22/02/2025 Page No. 16

Agrowon, 22/02/225

# कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या कारभारातील सुधारणांसाठी समिती

अॅग्रोवन वृत्तसेवा

मुंबई : राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी पणन महासंघाच्या व्यवस्थापकीय संचालकांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती नेमण्यात आली आहे. ही समिती बाजार समित्यांचा अभ्यास करून २० मार्चपर्यंत अहवाल सादर करणार आहे.

खासगी बाजार परवाना नुतनीकरण, एकल परवाना फी वाढ, पणन संचालक स्तरावरून विविध प्रकल्पांसाठी नियुक्त केलेल्या सल्लागारांची फी निश्‍चिती, पणन मंडळाच्या अंशदानातून जमा होणारी रक्कम, पर्यवेक्षण फी, बाजार समिती कर्मचाऱ्यांना ग्रुप विम्याचा लाभ आदी बाबींचा ही समिती अभ्यास करणार आहे.

सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांच्या अध्यक्षतेखाली १२ फेब्रुवारी रोजी आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत पणन संचालनालय आणि पणन मंडळाच्या कामांबाबत सुधारणा असल्याचे लक्षात आले. त्यामुळे ज्या सुधारणा करायच्या त्याचा सांगोपांग अभ्यास होणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त करण्यात आले. त्यामुळे पणन महासंघाच्या व्यवस्थापकीय संचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार शासन आदेश काढत समिती नेमली आहे.

या समितीत पणन सचालनालयाचे सहसंचालक सदस्य सचिव असतील तर पणन संचालक, राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक, पणन विभागाचे उपसचिव या समितीचे सदस्य असतील.

मुंबई तरुण भारत
Pune Edition | 2025-02-21 | Page- 9
epaper.mahamtb.con

# 'संत्रा महोत्सवा'स कोथरूडमध्ये सुरुवात

**पुणे :** कोथरूड पुणे येथील गांधी भवनात दि. २१ फेब्रुवारी रोजी 'कृषी पणन मंडळा'ने आयोजित केलेल्या 'संत्रा महोत्सव'ची संत्रा उत्पादक शेतकरी व संत्रा खरेदीदार ग्राहक यांचे हस्ते महोत्सवाची फित कापून सुरुवात करण्यात आली. या संत्रा महोत्सवात नागपूर व अमरावती भागातील एकूण ५० शेतकऱ्यांनी सहभाग घेतला आहे. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी मृग बहारातील साधारणपणे २५ टन संत्रा विक्रीसाठी उपलब्ध केला आहे. महोत्सवात साधारणपणे आकारानुसार रु. ८० ते रु. १०० प्रति किलो दर उत्पादक आकारत आहेत. महोत्सवात संत्र्या सोबत फ्रेश ज्युस व इतर उत्पादने महोत्सवातील २५ स्टॉलवर उपलब्ध असल्याने, त्याचे खरेदिवेळी ग्राहकांनी समाधान व्यक्त केले आहे. 'महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळा'मार्फत दरवर्षी विविध महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. या संत्रा महोत्सवाचा लाभ पुणेकरांनी घ्यावा, असे आवाहन 'कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक, संजय कदम यांनी केले .

Sanjwarta, 21/02/2025

# कोथरूड येथे 'संत्रा महोत्सव २०२५' ची सुरूवात



**पुणे (दैनिक लोकमान्य सांजवार्ता प्रतिनिधी) :** कोथरूड पुणे येथील गांधी भवनात आज कृषि पणन मंडळाने आयोजीत केलेल्या 'संत्रा महोत्सव २०२५' ची संत्रा उत्पादक शेतकरी व संत्रा खरेदिदार ग्राहक यांचेहस्ते महोत्सवाची फित कापून सुरवात करण्यात आली.

सदर संत्रा महोत्सवात नागपूर व अमरावती भागातील एकुण ५० शेतक-यांनी सहभाग घेतला असुन, संत्रा उत्पादक शेतक-यांनी मृग बहारातील साधारणपणे २५ टन संत्रा विक्रीसाठी उपलब्ध केला आहे. महोत्सवात साधारणपणे साईजनुसार रू. ८०/- ते रु. १००/- प्रति किलो दर उत्पादक आकारत आहेत.

सदर संत्रा हा मृग बहारातील असुन, चविला गोड आहे. महोत्सवात संत्र्या सोबत फ्रेश ज्युस व इतर उत्पादने महोत्सवातील २५ स्टॉलवर उपलब्ध असल्याने, त्याचे खरेदिवेळी ग्राहकांनी समाधान व्यक्त केले आहे.

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' संकल्पने अंतर्गत आंबा, संत्रा, द्राक्षे, काजु, गुळ, बेदाणा, मिलेट्स अशा विविध महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ बगळून शेतक-यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा हा उद्देश या महोत्सवाच्या आयोजनामागे असतो.

कृषि पणन मंडळामार्फत दरवर्षी आयोजीत करण्यात येणा-या विविध महोत्सवाचा प्रतिसाद पाहता, विदर्भातील शेतक-यांसाठी गांधी भवन, कोथरूड येथे सदर संत्रा महोत्सवाचे आयोजीन केले आहे. अशा महोत्सवांची व्याप्ती वाढवावी व शेतमाल उत्पादकांना जास्तीत जास्त विक्रीचे विविध पर्याय उपलब्ध करून देणेबाबत राज्याचे पणन मंत्री तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ मा.ना.श्री. जयकुमार रावल यांनी सूचित केलेले होते. यास अनुसरूनच कृषि पणन मंडळामार्फत 'संत्रा महोत्सव-२०२५' चे आयोजन केले आहे. सदर महोत्सव हा दि.२०/०२/२०२५ ते दि.२६/०२/२०२५ या कालावधीत गांधी भवन, कोथरूड, पुणे येथे आयोजीत केलेला असुन याचा लाभ सर्व पुणेकरांनी घ्यावा, असे आवाहन कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक, श्री. संजय कदम यांनी केले आहे.

Sakal, 21/02/2025

# संत्री महोत्सवाचे कोथरूडमध्ये उद्घाटन

**मार्केट यार्ड, ता. २० :** कृषी पणन मंडळाने आयोजित केलेल्या 'संत्री महोत्सवा'चे उद्घाटन गुरुवारी करण्यात आले. संत्री उत्पादक शेतकरी आणि खरेदीदार ग्राहक यांच्या हस्ते महोत्सवाची फीत कापून सुरुवात करण्यात आली. कोथरूड येथील गांधी भवनात हा महोत्सव भरविण्यात आला आहे.

शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा, हा उद्देश या महोत्सवाच्या आयोजनामागे आहे. कृषी पणन मंडळामार्फत दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या विविध महोत्सवाचा

पान २ वर »



# संत्री महोत्सवाचे कोथरूडमध्ये उद्घाटन



» पान १ वरून

प्रतिसाद पाहता, विदर्भातील शेतकऱ्यांसाठी कोथरूड येथे संत्रा महोत्सवाचे आयोजन केले आहे. या महोत्सवात नागपूर आणि अमरावती भागातील ५० शेतकऱ्यांनी सहभाग घेतला आहे. मृग बहारातील अंदाजे २५ टन संत्री विक्रीसाठी उपलब्ध केली आहेत. महोत्सवात आकारमानानुसार ८० ते १०० रुपये प्रतिकिलो संत्री विकली जात आहे. मृग बहारातील संत्री असल्याने चवीला गोड असून, संत्र्यासोबत ज्यूस आणि इतर उत्पादने महोत्सवातील २५ स्टॉलवर उपलब्ध असल्याचे कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी सांगितले.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com



संत्रा महोत्सवाचे उद्‌घाटन शेतकरी व ग्राहकांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

# संत्रा महोत्सवाला कोथरूडमध्ये सुरुवात

- प्रतिकिलोला ८० ते १०० रुपये : शेतकरी ते थेट ग्राहक उपक्रमातून विक्रीला सुरुवात

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या पुढाकाराने संत्रा उत्पादक शेतकरी ते थेट ग्राहक या उपक्रमातून कोथरूडमधील गांधी भवनमध्ये 'संत्रा महोत्सव २०२५' ला सुरुवात झाली आहे. मृग बहरातील या रसरशीत व चवीने गोड असलेला संत्र्यांची विक्री आकारमानानुसार प्रतिकिलोला ८० ते १०० रुपये दराने सुरू झाली आहे. २६ फेब्रुवारीपर्यंत हा महोत्सव सुरू राहणार असल्याची माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.



संत्रा उत्पादक शेतकरी व खरेदीदार ग्राहकांच्या हस्ते संत्रा महोत्सवाचे फीत कापून उद्‌घाटन करण्यात आले. नागपूर व अमरावती भागातील एकूण ५० शेतकऱ्यांनी यामध्ये सहभाग घेतला असून मृग बहारातील साधारणपणे २५ टन संत्रा विक्रीसाठी उपलब्ध केला आहे. महोत्सवात संत्र्यांसोबत फ्रेश ज्यूस व इतर उत्पादने महोत्सवातील २५ स्टॉलवर उपलब्ध आहेत.

पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' संकल्पने अंतर्गत आंबा, संत्रा, द्राक्षे, काजू, गूळ, बेदाणा, मिलेट्स अशा विविध महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा, हा उद्देश या महोत्सवाच्या आयोजनामागे असतो.

महोत्सवांची व्याप्ती वाढवावी व शेतमाल उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त विक्रीचे विविध पर्याय उपलब्ध करून देण्याबाबतच्या सूचना पणनमंत्री तथा पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी दिल्या होत्या. त्याला अनुसरूनच 'संत्रा महोत्सवाचे आयोजन केले आहे. तरी जास्तीत जास्त पुणेकर ग्राहकांनी या संधीचा लाभ घेऊन संत्रा खरेदी करण्याचे आवाहनही कदम यांनी केले आहे.

Navin Sandya, 21/02/205

# कोथरूड येथे 'संत्रा महोत्सव २०२५' ची सुरूवात



**पुणे :** कोथरूड पुणे येथील गांधी भवनात आज कृषि पणन मंडळाने आयोजीत केलेल्या 'संत्रा महोत्सव २०२५' ची संत्रा उत्पादक शेतकरी व संत्रा खरेदिदार ग्राहक यांचेहस्ते महोत्सवाची फित कापून सुरवात करण्यात आली. सदर संत्रा महोत्सवात नागपूर व अमरावती भागातील एकुण ५० शेतकऱ्यांनी सहभाग घेतला असुन, संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी मृग बहारातील साधारणपणे २५ टन संत्रा विक्रीसाठी उपलब्ध केला आहे. महोत्सवात साधारणपणे साईजनुसार रू. ८०/- ते रु. १००/- प्रति किलो दर उत्पादक आकारत आहेत. सदर संत्रा हा मृग बहारातील असुन, चविला गोड आहे. महोत्सवात संत्र्या सोबत फ्रेश ज्युस व इतर उत्पादने महोत्सवातील २५ स्टॉलवर उपलब्ध असल्याने, त्याचे खरेदिवेळी ग्राहकांनी समाधान व्यक्त केले आहे.

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' संकल्पने अंतर्गत आंबा, संत्रा, द्राक्षे, काजु, गुळ, बेदाणा, मिलेट्स अशा विविध महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा हा उद्देश या महोत्सवाच्या आयोजनामागे असतो. कृषि पणन मंडळामार्फत दरवर्षी आयोजीत करण्यात येणाऱ्या विविध महोत्सवाचा प्रतिसाद पाहता, विदर्भातील शेतकऱ्यांसाठी गांधी भवन, कोथरूड येथे सदर संत्रा महोत्सवाचे आयोजीन केले आहे.

अशा महोत्सवांची व्याप्ती वाढवावी व शेतमाल उत्पादकांना जास्तीत जास्त विक्रीचे विविध पर्याय उपलब्ध करून देणेबाबत राज्याचे पणन मंत्री तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ मा.ना.श्री.जयकुमार रावल यांनी सूचित केलेले होते. यास अनुसरूनच कृषि पणन मंडळामार्फत 'संत्रा महोत्सव-२०२५' चे आयोजन केले आहे.

सदर महोत्सव हा दि.२०/०२/२०२५ ते दि.२६/०२/२०२५ या कालावधीत गांधी भवन, कोथरूड, पुणे येथे आयोजीत केलेला असुन याचा लाभ सर्व पुणेकरांनी घ्यावा, असे आवाहन कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक, श्री. संजय कदम यांनी केले आहे.

Agrowon, 21/02/2025

# भारतीय द्राक्षाला न्यूझीलंडची दारे उघडण्याची शक्यता

ॲग्रोवन वृत्तसेवा

**पुणे :** भारतीय द्राक्षासाठी न्यूझीलंडच्या बाजारपेठेची दारे उघडी होण्याची शक्यता आहे. त्यासाठी उभय देशांमध्ये सकारात्मक चर्चा चालू असून, न्यूझीलंडचे एक शिष्टमंडळ सध्या राज्याच्या दौऱ्यावर आहे.



न्यूझीलंड व भारतीय उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची एक बैठक सोमवारी (ता. १७) मुंबईतील अपेडाच्या कार्यालयात झाली. चर्चेत अपेडाच्या महाव्यवस्थापिका विनिता सुधांशू, उपमहाव्यवस्थापक प्रशांत वाघमारे, फलोत्पादन संचालक डॉ. कैलास मोते, केंद्रीय

## चाचणी खेपेला मान्यता मिळणे शक्य

न्यूझीलंड शिष्टमंडळाच्या प्रमुख श्रीमती केरेन पौग बैठकीत काही मुद्दे स्पष्ट केले. त्या म्हणाल्या, की कृषी आयात निर्यात सुरू करण्याच्या प्रक्रिया वेळखाऊ आहेत. परंतु आम्ही राज्यातील बागांना प्रत्यक्ष भेटीनंतर चाचणी खेप करण्यासाठी परवानगी देण्याबाबत लवकरच निर्णय घेऊ.

कृषी मंत्रालयाच्या वनस्पती अलगीकरण

पान ४ वर »

भारतीय द्राक्षाला न्यूझीलंडची दारे उघडण्याची शक्यता

» पान १ वरून

(प्लॅन्ट क्वारंटाइन) विभागाचे सहसंचालक डॉ. एस. ग्यानसबंधन तसेच न्यूझीलंड शिष्टमंडळातील केरेन पौग, श्रीमती लिली ब्रेलफोर्ड तसेच श्रीमती आदर्शना मिस्त्री यांचा समावेश होता.

**...म्हणून आयात पुन्हा चालू करा**

या वेळी फलोत्पादन संचालक डॉ. कैलास मोते यांनी निर्यातक्षम द्राक्ष उत्पादन पद्धतीची शास्त्रोक्त माहिती शिष्टमंडळाला दिली. ''देशातील ९४ टक्के द्राक्षे एकट्या महाराष्ट्रातून निर्यात होतात. २०२३-२४ मध्ये निर्यात ३.२४ लाख टनांहून अधिक होती. सध्या नेदरलँड, पोलंड, रोमानिया, जर्मनी, इंग्लंड, चीनसह अशा बऱ्याच देशांना भारतीय द्राक्षे निर्यात होतात. जैवसुरक्षेच्या कारणास्तव न्यूझीलंडने भारतीय द्राक्ष आयात बंद ठेवली आहेत. तथापि, आता गुणवत्तापूर्ण उत्पादन होत असल्याने आयात पुन्हा सुरू करावी,'' असे डॉ. मोते यांनी केले.

राज्याच्या कृषी विभागामार्फत ग्रेपनेटप्रणालीतून निर्यातक्षम शेतकऱ्यांची नोंदणी होते. कीड व रोग नियंत्रण उत्तम पद्धतीने केले जाते. राज्यात कृषी माल निर्यात मार्गदर्शन कक्षदेखील सुरू करण्यात आले आहेत. चालू वर्षी निर्यातक्षम शेतनोंदणी एक लाखांच्या पुढे गेली आहे. त्यापैकी ४२ हजार ३०० उत्पादक केवळ द्राक्ष पिकाचे आहेत. त्यामुळे न्यूझीलंडची बाजारपेठ खुली झाल्यास भारतीय शेतकऱ्यांना लाभ मिळेल, असेही या वेळी सांगण्यात आले. दरम्यान, या बैठकीनंतर शिष्टमंडळाने राज्याच्या काही भागांना भेटी देण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर याच विषयावर आज (ता.२०) पुन्हा दुसरी बैठक घेण्याचे निश्चित केले आहे.

# समुद्रमार्गे सोलापूरचे डाळिंब पोहोचले ऑस्ट्रेलियाला

सुदर्शन सुतार : अॅग्रोवन वृत्तसेवा



- समुद्रमार्गे वाहतुकीचा पहिलाच प्रयोग यशस्वी
- तब्बल ३९ दिवसांचा 'शिपमेंट'चा प्रवास
- भारताला ऑस्ट्रेलियन बाजारपेठेची संधी

सोलापूर : समुद्रमार्गे पहिल्यांदाच सोलापूर जिल्ह्यातील डाळिंब ऑस्ट्रेलियात पोहोचले. पहिल्या टप्प्यात सुमारे ५.७ टन आणि दुसऱ्या टप्प्यात ६.५६ टन अशा पद्धतीने एकूण १२.२६ टन डाळिंबाची निर्यात झाली आहे. तब्बल ३९ दिवसांचा प्रवास (सव्वा महिना) या डाळिंबाने केला. भगव्या वाणाचे हे गुणवत्तापूर्ण डाळिंब ऑस्ट्रेलियन ग्राहकांच्याही चांगलाच पसंतीस उतरला आहे. या प्रयोगामुळे डाळिंबाला भविष्यात ऑस्ट्रेलियाची मोठी बाजारपेठ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

अपेडाच्या पुढाकाराने अॅग्रोस्टार आणि के. बी. एक्स्पोर्ट्सच्या सहकार्याने सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातून डाळिंबाच्या भगव्या वाणाची उच्चतम अशा गुणवत्तेच्या पहिल्या प्रतीच्या डाळिंबाची पहिलीच व्यावसायिक चाचणी शिपमेंट समुद्रमार्गे ऑस्ट्रेलियाला यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली. समुद्रमार्गे वाहतुकीचा डाळिंबामध्ये पहिल्यांदाच असा प्रयोग करण्यात आला.

डिसेंबरमध्ये पाठवण्यात आलेली आणि तब्बल ३९ दिवसांच्या प्रवासानंतर पहिली शिपमेंट ६ जानेवारी २०२५ ला ऑस्ट्रेलियातील ब्रिस्बेनला आणि दुसरी शिपमेंट १३ जानेवारी २०२५ ला सिडनीला पोहोचली. पहिल्या शिपमेंटमधील ५.७ टन डाळिंब १,९०० पेट्यांमध्ये पॅक केले गेले. तर दुसऱ्या शिपमेंटमधील ६.५६ टन डाळिंब १,८७२ पेट्यांमध्ये ठेवण्यात आली. प्रत्येक पेटीमध्ये ३ किलो प्रीमियम फळे ठेवण्यात आली होती. अनुक्रमे ब्रिस्बेन आणि सिडनीच्या बाजारात या डाळिंबाची विक्री झाली. विशेषकरून डाळिंबाचे वजन, आकारमान, भगव्या आकर्षक रंगासह गोड, रुचकर चव आणि आरोग्यदायी महत्त्व या गुणवैशिष्ट्यांमुळे हे डाळिंब तिथल्या ग्राहकांच्या पसंतीस उतरली आहेत.

> “ फळांच्या निर्यातीत वर्षानुवर्षे वाढ होत आहे, सध्या २९ टक्क्यांपर्यंत फळांची निर्यात होत आहे. त्यात डाळिंबाची निर्यातही जवळपास २० टक्क्यांपर्यंत वाढली आहे, याचा विचार करता डाळिंबाला मोठी संधी आहे. त्याचसाठी आम्ही प्रयत्न करतो आहोत, त्यातूनच आता ऑस्ट्रेलियाची मोठी बाजारपेठ मिळाली आहे.
>
> -**अभिषेक देव,** अध्यक्ष, अपेडा, मुंबई

### समुद्रमार्गे कमी खर्च

ऑस्ट्रेलियात भारतीय डाळिंबाच्या निर्यातीसाठी मागच्या वर्षी फेब्रुवारी २०२४ मध्ये कृती आराखडा आखण्यात आला होता. त्यानुसार तिथल्या यंत्रणेशी करार करण्यात आला. त्यानंतर जुलै २०२४ मध्ये पहिल्यांदा हवाईमार्गे एक खेप पाठवण्यात आली. परंतु पुढे वाढती मागणी आणि कमी खर्चामुळे समुद्री मार्गे वाहतुकीचा पर्याय वापरण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यातही आता यश मिळाले आहे. त्यामुळे ऑस्ट्रेलियाची मोठी बाजारपेठ डाळिंबाला मिळणार आहे.

सकाळ अॅग्रोवन
गुरुवार, २० फेब्रुवारी २०२५


# पणन मंडळाचा पुण्यात गुरुवारपासून 'संत्रा महोत्सव'

**पुणे :** राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने 'शेतकरी ते ग्राहक थेट विक्री' योजनेअंतर्गत संत्रा महोत्सवाचे गुरुवारपासून (ता. २०) कोथरूड येथील गांधीभवन येथे आयोजन करण्यात आले आहे.

अमरावती, नागपूर येथील ५० शेतकरी महोत्सवात सहभागी होणार आहेत. विविध २५ स्टॉलवरून मृग बहरातील चवीला गोड अशा अस्सल नागपुरी संत्री उपलब्ध होणार आहेत. संत्र्याचा चवदार ताजा रस, संत्रा बर्फी व इतर संत्रा उत्पादने उपलब्ध होणार आहेत. हा महोत्सव २६ फेब्रुवारीपर्यंत सुरू असणार आहे, असे आवाहन पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले आहे.

पुण्य नगरी

# कोथरूडमध्ये २० फेब्रुवारीपासून संत्रा महोत्सव

**। पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत दर वर्षी उत्पादक ते ग्राहक थेट विक्री संकल्पनेअंतर्गत कोथरूड येथील गांधी भवन येथे २० ते २६ फेब्रुवारीदरम्यान संत्रा महोत्सव-२०२५चे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली आहे.

संत्रा उत्पादकांची नोंदणी प्रक्रिया ही पणन मंडळाच्या अमरावती व नागपूर विभागीय कार्यालयाकडे करण्यात आलेली आहे. या वेळी सुमारे ५० संत्रा उत्पादक सहभागी होणार आहेत. या उत्पादकांना कोथरूड येथील गांधी भवन येथे सुमारे २५ स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या उत्पादकांमार्फत उत्तम प्रतीचा मृग बहारातील



चवीला गोड असणारा अस्सल नागपुरी संत्रा, संत्र्याचा चवदार ताजा रस, संत्रा बर्फी व इतर संत्रा उत्पादने ग्राहकांना थेट उत्पादकांकडून उपलब्ध होणार आहेत. अधिक माहितीसाठी सहायक सरव्यवस्थापक मंगेश कदम ७५८८०२२२०१ यांच्याशी संपर्क साधावा. विदर्भातील उच्च प्रतीच्या नागपुरी संत्रा व इतर उत्पादित पदार्थांचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कदम यांनी केले आहे.

Pune Edition
Feb 19, 2025 Page No. 11
Powered by: erelego.com

Vishweshwar, 18/02/2025

# कृषि पणन मंडळाचा 'संत्रा महोत्सव' २० फेब्रुवारी २०२५ पासून कोथरूड येथे सुरू

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' संकल्पने अंतर्गत विविध महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा हा उद्देश या महोत्सवाच्या आयोजनमागे आहे.

सन २००३ पासून सुरू असलेल्या पणन मंडळाच्या आंबा महोत्सवास तसेच मागील वर्षी पासून सुरू करण्यात आलेल्या मिलेट महोत्सवास पुणेकरांचा चांगला प्रतिसाद लाभला. या मिलेट महोत्सवामध्ये प्रायोगित तत्वावर काही संत्रा उत्पादकही सहभागी झाले होते व त्यांच्याकडील संत्रा खरेदीलाही ग्राहकांनी भरभरून प्रतिसाद दिलेला आहे. यास्तव सदर महोत्सवांची व्याप्ती वाढवावी व शेतमाल उत्पादकांना जास्तीत जास्त विक्रीचे विविध पर्याय उपलब्ध करून देणेबाबत राज्याचे पणन मंत्री तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ मा.ना.श्री.जयकुमार रावल यांनी सूचित केलेले होते. यास अनुसरूनच चालू वर्षी कृषि पणन मंडळामार्फत 'संत्रा महोत्सव-२०२५'चे आयोजन गांधी भवन, कोथरूड, पुणे येथे करण्यात येणार आहे.

संत्रा उत्पादकांची नोंदणी प्रक्रिया हि पणन मंडळाच्या अमरावती व नागपूर विभागीय कार्यालयाकडे करण्यात आलेली असुन यावेळेस सुमारे ५० संत्रा उत्पादक सहभागी होणार आहेत. सदर उत्पादकांना पुणे येथील गांधी भवन, कोथरूड येथे सुमारे २५ स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या उत्पादकांमार्फत उत्तम प्रतिचा मृग बहारातील चवीला गोड असणारा अस्सल नागपूरी संत्रा, संत्र्याचा चवदार ताजा रस, संत्रा बर्फी व इतर संत्रा उत्पादने ग्राहकांना थेट उत्पादकांकडून उपलब्ध होणार आहे.

सदर महोत्सव दि.२० ते २६ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत चालू असणार आहे. तरी विदर्भातील उच्च प्रतिच्या नागपूरी संत्रा व इतर उत्पादित पदार्थांचा लाभ सर्व ग्राहकांनी घ्यावा, असे आवाहन पणन मंडळाचे कार्यकारी संचालक, श्री. संजय कदम यांनी केले.

मुंबई तरुण भारत
Pune Edition | 2025-02-18 | Page- 7
epaper.mahamtb.con

थोडक्यात

## कोथरूड येथे दि. २० फेब्रुवारीपासून संत्रा महोत्सव

**पुणे :** ''पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या निर्देशानुसार 'महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळा'मार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' संकल्पनेअंतर्गत गांधी भवन, कोथरूड येथे दि. २० फेब्रुवारी ते दि. २६ फेब्रुवारी रोजीदरम्यान 'संत्रा महोत्सव-२०२५'चे आयोजन करण्यात आले आहे,'' अशी माहिती 'महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळा'चे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली आहे. संत्रा उत्पादकांची नोंदणी प्रक्रिया ही पणन मंडळाच्या अमरावती व नागपूर विभागीय कार्यालयाकडे करण्यात आलेली असून यावेळी सुमारे ५० संत्रा उत्पादक सहभागी होणार आहेत. या उत्पादकांना पुणे येथील गांधी भवन, कोथरूड येथे सुमारे २५ स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या उत्पादकांमार्फत उत्तम प्रतीची मृग बहारातील चवीला गोड असणारी अस्सल नागपुरी संत्री, संत्र्याचा चवदार ताजा रस, संत्रा बर्फी व इतर संत्रा उत्पादने ग्राहकांना थेट उत्पादकांकडून उपलब्ध होणार आहेत. अधिक माहितीकरिता साहाय्यक सरव्यवस्थापक मंगेश कदम ७५८८०२२२०१ यांच्याशी संपर्क साधावा. विदर्भातील उच्च प्रतीची नागपुरी संत्री व इतर उत्पादित पदार्थांचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कदम यांनी केले.

Powered by iDocuments

Sakal, 18/02/2025

# कोथरूडमध्ये संत्री महोत्सव

**पुणे, ता. १७ :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडून 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' संकल्पनेअंतर्गत कोथरूड येथील गांधी भवनमध्ये संत्री महोत्सव-२०२५' चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव गुरुवार (ता. २०) ते बुधवार (ता. २६) दरम्यान होणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली आहे. संत्री उत्पादकांची नोंदणी प्रक्रिया ही पणन मंडळाच्या अमरावती व नागपूर विभागीय कार्यालयाकडे करण्यात आलेली असून, या वेळी सुमारे ५० संत्री उत्पादक सहभागी होणार आहेत.

या उत्पादकांना पुणे येथील गांधी भवन, कोथरूड येथे सुमारे २५ दालने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या उत्पादकांमार्फत उत्तम प्रतीची मृग बहारातील चवीला गोड असणारी अस्सल नागपुरी संत्री, संत्र्याचा चवदार ताजा रस, संत्री बर्फी व इतर संत्री उत्पादने ग्राहकांना थेट उत्पादकांकडून उपलब्ध होणार आहेत. विदर्भातील उच्च प्रतीची नागपुरी संत्री व इतर उत्पादित पदार्थांचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कदम यांनी केले.

Rashtraroop, 18/02/2025

# कृषि पणन मंडळाचा 'संत्रा महोत्सव' २० फेब्रुवारी २०२५ पासून कोथरूड येथे सुरू

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' संकल्पने अंतर्गत विविध महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतक-यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा हा उद्देश या महोत्सवाच्या आयोजनमागे आहे.

सन २००३ पासून सुरू असलेल्या पणन मंडळाच्या आंबा महोत्सवास तसेच मागील वर्षी पासून सुरू करण्यात आलेल्या मिलेट महोत्सवास पुणेकरांचा चांगला प्रतिसाद लाभला. या मिलेट महोत्सवामध्ये प्रायोगित तत्वावर काही संत्रा उत्पादकही सहभागी झाले होते व त्यांच्याकडील संत्रा खरेदीलाही ग्राहकांनी भरभरून प्रतिसाद दिलेला आहे. यास्तव सदर महोत्सवांची व्याप्ती वाढवावी व शेतमाल उत्पादकांना जास्तीत जास्त विक्रीचे विविध पर्याय उपलब्ध करून देणेबाबत राज्याचे पणन मंत्री तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ मा.ना.श्री.जयकुमार रावल यांनी सूचित केलेले होते. यास अनुसरूनच चालू वर्षी कृषि पणन मंडळामार्फत 'संत्रा महोत्सव-२०२५'चे आयोजन गांधी भवन, कोथरूड, पुणे येथे करण्यात येणार आहे.

संत्रा उत्पादकांची नोंदणी प्रक्रिया हि पणन मंडळाच्या अमरावती व नागपूर विभागीय कार्यालयाकडे करण्यात आलेली असुन यावेळेस सुमारे ५० संत्रा उत्पादक सहभागी होणार आहेत. सदर उत्पादकांना पुणे येथील गांधी भवन, कोथरूड येथे सुमारे २५ स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या उत्पादकांमार्फत उत्तम प्रतिचा मृग बहारातील चवीला गोड असणारा अस्सल नागपूरी संत्रा, संत्र्याचा चवदार ताजा रस, संत्रा बर्फी व इतर संत्रा उत्पादने ग्राहकांना थेट उत्पादकांकडून उपलब्ध होणार आहे.

सदर महोत्सव दि.२० ते २६ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत चालू असणार आहे. तरी विदर्भातील उच्च प्रतिच्या नागपूरी संत्रा व इतर उत्पादित पदार्थांचा लाभ सर्व ग्राहकांनी घ्यावा, असे आवाहन पणन मंडळाचे कार्यकारी संचालक, श्री. संजय कदम यांनी केले.

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# खरेदी करा अस्सल नागपुरी संत्री

- संत्र्यांचा ताजा रस, संत्राबर्फी व इतरही संत्रा उत्पादनांची राहणार रेलचेल
- कृषी पणन मंडळाच्या 'संत्रा महोत्सवा'ला २० फेब्रुवारीपासून सुरुवात
- मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांची माहिती

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

चालू वर्षीच्या हंगामातील विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांमार्फत उत्तम प्रतीचा मृग बहारातील चवीला गोड असणारा अस्सल नागपुरी संत्रा, संत्र्याचा चवदार ताजा रस, संत्राबर्फी व इतर संत्रा उत्पादने ग्राहकांना थेट उत्पादकांकडून खरेदी करण्याची संधी उपलब्ध होत आहे. कोथरूड येथील गांधी भवनामध्ये गुरुवारपासून (दि. २०) सुरू होणारा 'संत्रा महोत्सव' २६ फेब्रुवारीपर्यंत चालणार असून, या कालावधीत संत्रा खरेदीची संधी उपलब्ध होत आहे.

राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत यंदाच्या उत्पादक ते थेट ग्राहक विक्री संकल्पनेअंतर्गत 'संत्रा महोत्सव-२०२५'चे आयोजन करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली आहे.

संत्रा उत्पादकांची नोंदणी प्रक्रिया ही पणन मंडळाच्या अमरावती व नागपूर विभागीय कार्यालयाकडे केली असून, या वेळी सुमारे ५० संत्रा उत्पादक सहभागी होणार आहेत. या उत्पादकांना पुणे येथील गांधी भवन, कोथरूड येथे सुमारे २५ स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

पणन मंडळाने पुण्यात काही दिवसांपूर्वी 'मिलेट महोत्सव' आयोजित केला होता. त्यामध्ये प्रायोगिक तत्त्वावर काही संत्रा उत्पादकही सहभागी झाले होते. त्यांच्याकडील संत्रा खरेदीलाही ग्राहकांनी चांगला प्रतिसाद दिला. ग्राहकांनी 'संत्रा महोत्सवा'तील खरेदीचा लाभ घेण्याचे आवाहन कदम यांनी पत्रकान्वये केले आहे.

Pune Edition
Feb 18, 2025 Page No. 03

Navin Sandya, 18/02/2025

# कृषि पणन मंडळाचा 'संत्रा महोत्सव' २० फेब्रुवारी २०२५ पासून कोथरूड येथे सुरू

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' संकल्पने अंतर्गत विविध महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतक-यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा हा उद्देश या महोत्सवाच्या आयोजनमागे आहे.

सन २००३ पासून सुरू असलेल्या पणन मंडळाच्या आंबा महोत्सवास तसेच मागील वर्षी पासून सुरू करण्यात आलेल्या मिलेट महोत्सवास पुणेकरांचा चांगला प्रतिसाद लाभला. या मिलेट महोत्सवामध्ये प्रायोगित तत्वावर काही संत्रा उत्पादकही सहभागी झाले होते व त्यांच्याकडील संत्रा खरेदीलाही ग्राहकांनी भरभरून प्रतिसाद दिलेला आहे. यास्तव सदर महोत्सवांची व्याप्ती वाढवावी व शेतमाल उत्पादकांना जास्तीत जास्त विक्रीचे विविध पर्याय उपलब्ध करून देणेबाबत राज्याचे पणन मंत्री तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ मा.ना.श्री.जयकुमार रावल यांनी सूचित केलेले होते. यास अनुसरूनच चालू वर्षी कृषि पणन मंडळामार्फत 'संत्रा महोत्सव-२०२५'चे आयोजन गांधी भवन, कोथरूड, पुणे येथे करण्यात येणार आहे.

संत्रा उत्पादकांची नोंदणी प्रक्रिया हि पणन मंडळाच्या अमरावती व नागपूर विभागीय कार्यालयाकडे करण्यात आलेली असुन यावेळेस सुमारे ५० संत्रा उत्पादक सहभागी होणार आहेत. सदर उत्पादकांना पुणे येथील गांधी भवन, कोथरूड येथे सुमारे २५ स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या उत्पादकांमार्फत उत्तम प्रतिचा मृग बहारातील चवीला गोड असणारा अस्सल नागपूरी संत्रा, संत्र्याचा चवदार ताजा रस, संत्रा बर्फी व इतर संत्रा उत्पादने ग्राहकांना थेट उत्पादकांकडून उपलब्ध होणार आहे.

सदर महोत्सव दि.२० ते २६ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत चालू असणार आहे. तरी विदर्भातील उच्च प्रतिच्या नागपूरी संत्रा व इतर उत्पादित पदार्थाचा लाभ सर्व ग्राहकांनी घ्यावा, असे आवाहन पणन मंडळाचे कार्यकारी संचालक, श्री. संजय कदम यांनी केले.

# संत्री महोत्सवात ५० उत्पादक

म. टा. प्रतिनिधी, पुणे

उत्पादक ते ग्राहक थेट विक्री धोरणानुसार 'राज्य कृषी पणन मंडळा'तर्फे येत्या २० ते २६ फेब्रुवारी दरम्यान 'संत्री महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. कोथरूड येथील गांधी भवन येथे होणाऱ्या या महोत्सवात थेट शेतकऱ्यांकडून संत्री खरेदी करता येणार आहेत, अशी माहिती 'राज्य कृषी पणन मंडळा'चे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

मंडळातर्फे दर वर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेनुसार विविध महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा, हा उद्देश या महोत्सवाच्या आयोजनामागे असतो. संत्रा उत्पादकांची नोंदणी प्रक्रिया पणन मंडळाच्या अमरावती व नागपूर विभागीय कार्यालयाकडे करण्यात आली असून यंदा ५० संत्री उत्पादक सहभागी होणार आहेत. या उपक्रमात उत्तम प्रतीची उत्पादने ग्राहकांना उपलब्ध होणार आहेत.

Loksatta, 18/02/2025

# कोथरूडमध्ये उद्यापासून संत्री महोत्सव

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' संकल्पनेअंतर्गत संत्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कोथरूड परिसरातील गांधी भवन येथे २० ते २६ फेब्रुवारी या कालावधीत हा महोत्सव होईल, अशी माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

संत्री उत्पादकांची नोंदणी प्रक्रिया पणन मंडळाच्या अमरावती आणि नागपूर विभागीय कार्यालयाकडे करण्यात आलेली असून, सुमारे ५० संत्री उत्पादक या महोत्सवात सहभागी होणार आहेत.

या उत्पादकांना २५ स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या उत्पादकांमार्फत उत्तम प्रतिचा मृग बहारातील चवीला गोड असणारा अस्सल नागपुरी संत्री, संत्र्याचा चवदार ताजा रस, संत्री बर्फी आणि इतर संत्री उत्पादने ग्राहकांना थेट उत्पादकांकडून उपलब्ध होणार आहेत.

लोकमत

# गुरुवारपासून संत्रा महोत्सव



**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' संकल्पने अंतर्गत गांधी भवन, कोथरूड येथे दि. २० ते २६ फेब्रुवारी दरम्यान संत्रा महोत्सवाचे आयोजन केले आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली आहे.

Hello Pune
Page No. 1 Feb 18, 2025
Powered by: erelego.com

Bharat Prayas , 18/02/2025

# कोथरूड में २० फरवरी से संतरा महोत्सव शुरू होगा

**पुणे :** विपणन मंत्री जयकुमार रावल के निर्देशानुसार, महाराष्ट्र राज्य कृषि विपणन बोर्ड ने 'उत्पादक से उपभोक्ता तक प्रत्यक्ष बिक्री' की अवधारणा के तहत हर साल २० से २६ फरवरी तक कोथरूड के गांधी भवन में 'संतरा महोत्सव-२०२५' का आयोजन किया है, यह जानकारी महाराष्ट्र राज्य कृषि विपणन बोर्ड के कार्यकारी निदेशक संजय कदम ने दी।

संतरा उत्पादकों के लिए पंजीकरण प्रक्रिया मार्केटिंग बोर्ड के अमरावती और नागपुर संभागीय कार्यालयों में की गई है और इस बार लगभग ५० संतरा उत्पादक इसमें भाग लेंगे। इन उत्पादकों को गांधी भवन, कोथरुड, पुणे में लगभग २५ स्टॉल उपलब्ध कराए जाएंगे। इन उत्पादकों के माध्यम से, वसंत ऋतु के सर्वश्रेष्ठ हिरन के मीठे स्वाद वाले प्रामाणिक नागपुरी संतरे, स्वादिष्ट ताजा संतरे का रस, संतरे की बर्फी और अन्य संतरे के उत्पाद सीधे उत्पादकों से उपभोक्ताओं को उपलब्ध होंगे। अधिक जानकारी के लिए कृपया सहायक महाप्रबंधक मंगेश कदम से ७५८८०२२२०१ पर संपर्क करें। श्री कदम ने नागरिकों से अपील की कि वे विदर्भ में उत्पादित उच्च गुणवत्ता वाले नागपुरी संतरे और अन्य उत्पादों का लाभ उठाएं।

पुण्य नगरी

# काजू उत्पादक शेतकऱ्यांना काजू बीसाठी शासन अनुदान योजना

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यातील काजू उत्पादक शेतकऱ्यांना २०२४च्या काजू हंगामासाठी शासनाने बी शासन अनुदान योजनेस ९ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयाने मान्यता देण्यात आली. योजनेच्या अंमलबजावणीसाठी नोडल एजन्सी म्हणून महाराष्ट्र राज्य काजू मंडळ यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

योजनेंतर्गत राज्यातील काजू उत्पादक शेतकऱ्यांना काजू बीसाठी प्रति किलो दहा रुपयांप्रमाणे किमान ५० किलो व कमाल २ हजार किलो या मर्यादेत शासन अनुदान घोषित केलेले आहे. या योजनेंतर्गत १९ जुलै २०२४ रोजी परिपत्रकान्वये योजनेच्या अंमलबजावणीबाबत पणन मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करून त्यास राज्यभर प्रसिद्धी देण्यात आली. योजनेंतर्गत प्रस्ताव सादर करण्यास चार वेळा मुदतवाढ देण्यात आली. प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२४ होती. अंतिम मुदतीत योजनेंतर्गत एकूण ५ हजार १८५ काजू उत्पादक शेतकऱ्यांचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. त्यांपैकी छाननीअंती पात्र २ हजार ७४१ प्रस्ताव ११ फेब्रुवारी २०२५ रोजी राज्य शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत. या पात्र प्रस्तावांना एकूण ३३६.५२ लाख रुपये अनुदान मिळणे अपेक्षित आहे. पात्र प्रस्तावांमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील १ हजार ५२५ व रत्नागिरी जिल्ह्यातील ४४३ व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ७७३ प्रस्तावांचा समावेश आहे. उर्वरित प्रस्तावांच्या त्रुटींची पूर्तता करून घेण्याचे कामकाज सुरू असून त्यातील पात्र ठरलेले प्रस्ताव लवकरच शासनास सादर करण्यात येतील, असे महाराष्ट्र राज्य काजू मंडळाचे मुख्य कार्यकारी संजय कदम यांनी सांगितले.

Pune Edition
Feb 13, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव मिश्रक व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# काजू बी अनुदान प्रस्ताव शासनाला सादर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य सरकारकडे काजू बी अनुदानासाठी प्रस्तावाच्या छाननीअंती पात्र दोन हजार ७४१ प्रस्ताव मंगळवारी (दि.११) मान्यतेसाठी पाठविले आहेत. या पात्र प्रस्तावांना एकूण तीन कोटी ३६ लाख ५२ हजार रुपयांइतके अनुदान मिळणे अपेक्षित आहे. उर्वरित प्रस्तावांच्या त्रुटींची पूर्तता करून घेण्याचे काम सुरू असून त्यातील पात्र ठरलेले प्रस्ताव लवकरच शासनाला सादर करण्यात येतील, अशी माहिती महाराष्ट्र राज्य काजू मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कदम यांनी दिली.

- कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्गमधील २७४१ प्रस्तावांचा समावेश, ३.३७ कोटींचे अनुदान
- काजू मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कदम यांची माहिती

सन २०२४ च्या काजू हंगामासाठी शासनाने राज्यातील काजू उत्पादक शेतकऱ्यांसाठी काजू बी शासन अनुदान योजनेस दिनांक ९ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयाने मान्यता दिली होती. तसेच, योजनेच्या अंमलबजावणीसाठी नोडल एजन्सी म्हणून महाराष्ट्र राज्य काजू मंडळ यांची नियुक्ती केली आहे. योजनेंतर्गत राज्यातील काजू उत्पादक शेतकऱ्यांना काजू बीसाठी प्रतिकिलो १० रुपये याप्रमाणे किमान ५० किलो व कमाल २००० किलो या मर्यादेत शासन अनुदान घोषित केलेले आहे.

या योजनेंतर्गत दिनांक १९ जुलै २०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये योजनेच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर माहिती पणन मंडळाच्या www.msamb.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करून त्याला राज्यभर प्रसिद्धी देण्यात आली. योजनेंतर्गत प्रस्ताव सादर करण्यास चार वेळा मुदतवाढ देण्यात आली. प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२४ ही होती. अंतिम मुदतीत योजनेंतर्गत एकूण पाच हजार १८५ काजू उत्पादक शेतकऱ्यांचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. पात्र प्रस्तावांमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील १५२५ व रत्नागिरी जिल्ह्यातील ४४३ आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ७७३ प्रस्तावांचा समावेश असल्याचे कदम यांनी कळविले आहे.

पुढारी ANCHOR

Pune Edition
Feb 12, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

# शेतमालाला भाव नाही; 'तारण ठेवा-कर्ज घ्या'

## कमी भावाच्या काळात शेतकरी घेऊ शकतात कर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर** : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडून शेतमालाला चांगला भाव मिळवून देण्याच्या उद्देशाने कृषी उत्पन्न बाजार समित्यामार्फत 'शेतमाल तारण कर्ज योजना' सन १९९०-१९९१ पासून सुरू करण्यात आली. या योजनेतून तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सूर्यफूल, चना, भात (धान), करडई, ज्वारी, बाजरी, मका, गहू, वाघ्या घेवडा (राजमा), बेदाणा, हळद, काजू बी, सुपारी आदींना लाभ दिला जातो. शेतकरी कमी भावाच्या काळात ही उत्पादने बाजार समितीकडे तारण ठेवू शकतात. यासाठी बाजार समितीकडून मोफत गोदाम उपलब्ध करुन दिले जाते.

**'शेतमाल तारण कर्ज योजना' ही बाजार समिती व शेतकरी दोघांच्याही फायद्याची आहे. शेतकऱ्यांना माल कमी भावात विक्री न करता पणन मंडळाच्या शेतमाल तारण कर्ज योजनेचा लाभ घेता येतो. गोदामात साठवलेल्या मालाच्या सुरक्षिततेसाठी विमा काढण्यात येतो. व्याजदर कमी आहे.**

**अजय कडू**, उपसरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, विभागीय कार्यालय

## ७५ टक्के रक्कम लगेच मिळणार

शेतमाल तारण कर्ज योजना



### चार वर्षांत ३,७५५ शेतकऱ्यांनी घेतला लाभ

**नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली या मंडळाच्या नागपूर विभागात गेल्या चार वर्षांत ३,७५५ शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घेतला.**

### काय आहे शेतमाल तारण योजना ?

शेतमालाला कमी भाव असतानाच्या काळात शेतमालाला गोदाम तसेच कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देणाऱ्या योजनेत विशेषतः सुगीच्या काळात बाजारपेठेत एकाच वेळेस एकाच प्रकारचा मोठ्या प्रमाणात शेतमाल शेतकरी विक्रीस आणतात, तेव्हा शेतमालाचे भाव कमी होतात.

अशा वेळी शेतकऱ्याच्या मालाला तारण देणारी महत्त्वाकांक्षी अशी योजना आहे. शेतकरी कमी भाव असलेल्या काळात ही उत्पादने बाजार समितीकडे तारण ठेवू शकतात.

### नागपूर जिल्ह्यात तारण ठेवणारे शेतकरी किती ?

| वर्ष | शेतकरी | संख्या तारण कर्जवाटप | वजन क्विंटल |
|---|---|---|---|
| २०२१-२२ | ११५३ | ११,२७,८७,४६१ | ५४,५०५.१४ |
| २०२२-२३ | १२९५ | १३,०१,५८,७६३ | ५९,३७१.६८ |
| २०२३-२४ | ८०४ | ९,३६,०३,८९२ | ४३,७५७.८३ |
| २०२४-२५ | ५०३ | ४,९५,५३,०८२ | २४,४७४.८५ |

### व्याजदर किती?

वार्षिक फक्त ६ टक्के व्याजदर आहे. शेतकऱ्यास शेतमालाच्या त्यावेळी असलेला बाजारभाव किंवा शासनाने जाहीर केलेली आधारभूत किंमत यापैकी जी कमी असेल त्यानुसार ७५ टक्के रक्कमेइतके कर्ज लगेच मिळेल. कर्जाचा निधी पणन मंडळामार्फत बाजार समित्यांना वार्षिक फक्त ३ टक्के इतक्या कमी व्याजदरात दिला जातो.



# चाळीसगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतमाल तारण कर्ज योजनेतून शेतकऱ्याला कर्ज वाटप



**चाळीसगाव**-अवकाळी पाऊस व प्रतिकूल परिस्थितीमुळे शेतकरी पूर्ण उध्वस्त झाला आहे.यात भर म्हणजे शेतीमालाला योग्य भाव नसेल तर शेतकरी फार मेटाकुटीला येतो. यासाठी पर्यायी उपाय योजना म्हणून चाळीसगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांनी शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्याचा निर्णय घेतला होता. या योजनेची प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू झाली आहे.शेतमाल तारण कर्ज योजना प्रकर्षाने राबवण्याचा निर्णय घेतला असताना पिंपरखेड येथील शेतकरी शिवाजी बारकू ठुबे यांना शेतमाल तारण योजनेतून ५० हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला.

यावेळी बाजार समितीचे सभापती मच्छिंद्र राठोड, संचालक रवींद्र पाटील, राहुल पाटील, सचिव जगदिश लोधे, सहसचिव सतीश पाटील, लेखापाल ज्ञानेश्वर गायके तसेच बाजार समितीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यात शेतमालावर १८० दिवसांसाठी मालाचे एकूण किमतीवर ७५ टक्के पर्यंत कर्ज वार्षिक सहा टक्के दराने दिले जाते. त्यामुळे आपला शेतीमाल सुरक्षित ठेवण्याकरता तसेच वाढत्या बाजार भावाचा फायदा घेण्यासाठी शेतमाल तारण कर्ज योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन बाजार समितीचे सभापती मच्छिंद्र राठोड यांनी केले आहे

या योजनेच्या अंतर्गत कर्जासाठी मुग, उडीद ,करडई ज्वारी, बाजरी, मका, सोयाबीन,सूर्यफूल,चना,भात (धान) गहू, वाघ्या घेवडा (राजमा) बेदाणा, हळद ,काजू बी, सुपारी या शेतीमालाच्या एकूण किमतीवर ७५ टक्के पर्यंत कर्ज सहा महिन्यांसाठी दिले जाते.

लोकमत

# 'ई-नामशी जोडणार सर्व बाजार समित्या'

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** देशांतर्गत कृषी उत्पन्न बाजार समित्या एकत्रितपणे जोडणाऱ्या ई-नाम प्रणालीचा राज्यात प्रभावीपणे वापर झाला पाहिजे. यासाठी नव्याने राज्यातील १६ कृषी उत्पन्न बाजार समित्या ई-नामशी जोडल्या जाणार आहेत. याद्वारे सर्व अद्ययावत ठेवल्या जाणार आहेत, असे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या पुणे येथील बैठकीत ते बोलत होते. तसेच बाजार समिती परिसर विकसित करण्याकरिता उत्पन्नाचे स्रोत वाढविण्यावर भर द्यावा, असे निर्देशही त्यांनी दिले.

Hello Pune
Page No. 3 Feb 07, 2025
Powered by: erelego.com

Sakal, 06/02/2025

# पणन सुविधा अधिक बळकट करा : पणनमंत्री रावल

## पणन मंडळाच्या बैठकीत अधिकाऱ्यांना सूचना

**मार्केट यार्ड, ता. ५ :** राज्यातील बाजार समित्या सक्षम करण्यासाठी पणन सुविधा बळकट कराव्या लागतील. पणन मंडळाने शेतकऱ्यांच्या व्यापक हितासाठी पणन सुविधा बळकट करण्यावर अधिक भर द्यावा. कृषिमालाचे होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व सोई-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना पणन मंत्री जयकुमार रावल यांनी बुधवारी (ता. ५) पणन मंडळाच्या बैठकीत केल्या.

राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र राज्य काजू मंडळासोबत पणन मंत्री रावल यांची बैठक झाली. यावेळी काटोल बाजार समितीचे सभापती चरणसिंह ठाकूर, सिल्लोड बाजार समितीचे केशवराव तायडे, राज्य समिती सहकारी संघाचे सभापती प्रवीणकुमार नाहाटा, कृषी आयुक्त सूरज मांढरे, सहकार आयुक्त दीपक तावरे, काजू मंडळाचे संचालक डॉ. परशुराम पाटील, पुणे बाजार समितीचे सचिव राजाराम धोंडकर उपस्थित होते.

### ‘ई-नाम’शी १६ बाजार समित्या जोडणार

■ **देशांतर्गत कृषी उत्पन्न बाजार समित्या एकत्रितपणे जोडणाऱ्या ‘ई - नाम’ प्रणालीत अनेक बाजार समिती यापूर्वी जोडल्या गेल्या आहेत. आता नव्याने राज्यातील १६ बाजार समित्या ‘ई - नाम’शी जोडल्या जाणार आहेत, असे जयकुमार रावल यांनी सांगितले.**

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

पुढारी ANCHOR

# पणन मंडळाच्या थकीत कर्जांची बाजार समित्यांकडून वसुली करा

- पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या सूचना
- १६५ बाजार समित्यांकडे २४.३८ कोटींचे पणनचे अंशदान थकीत
- राज्यातील सर्व बाजार समित्या ई-नामशी जोडणार



कृषी पणन मंडळ व काजू मंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत बोलताना पणनमंत्री जयकुमार रावल व उपस्थित मान्यवर.

पुणे : पुढारी वृत्तसेवा

**राज्य कृषी पणन मंडळाची राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडील थकीत कर्जाची वसुली करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी, अशा सूचना राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिल्या. दरम्यान, १६५ बाजार समित्यांकडे पणन मंडळाचे सुमारे २४.३८ कोटी रुपयांचे अंशदान थकीत असल्याचे सांगण्यात आले.**

राज्यातील काही बाजार समित्या यापूर्वी ऑनलाइन व्यापाराच्या ई-नाम प्रणालीशी जोडल्या गेल्या असून, सर्व बाजार समित्या आम्ही जोडणार आहोत. आता पुन्हा नव्याने राज्यातील १६ कृषी उत्पन्न बाजार समित्या ई-नामशी जोडल्या जाणार असून, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अद्ययावत ठेवल्या जाणार आहेत.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र राज्य काजू मंडळाच्या संचालक मंडळाची बैठक पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी आमदार तथा काटोल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती चरणसिंह ठाकूर, सहकार आयुक्त दीपक तावरे, कृषी आयुक्त सुरज मांढरे, पणन संचालक विकास रसाळ, उपकृषी पणन सल्लागार भवेषकुमार जोशी, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रवीणकुमार नाहाटा, सिल्लोड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती केशवराव तायडे, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, महाराष्ट्र राज्य काजू मंडळाचे संचालक डॉ. परशुराम पाटील, संचालक व काजू प्रक्रिया उद्योजक रूपेश बेलोसे आदी उपस्थित होते.

### काजू उद्योगांना देणार चालना

राज्यातील काजू उद्योगांना येणाऱ्या काळात चालना देण्यासाठी प्रभावी धोरण बनवले जाणार असून, राज्याचा काजू उद्योग विकसित व्हावा, देशाच्या आणि जगाच्या बाजारपेठेत महाराष्ट्राचा काजू मोठ्या प्रमाणावर विक्रीकरिता उपलब्ध व्हावा, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचेही महाराष्ट्र राज्य काजू मंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत रावल यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य काजू मंडळाने व्हिएतनाम देशाच्या धर्तीवर काजू प्रक्रिया उद्योग उभारण्याबाबत प्रस्ताव सादर करून योजना तयार करावी. या उद्योगातून अधिकाधिक उद्योजक निर्माण होण्यासाठी प्रोत्साहनपर निधी देण्याचा विचार करावा. गुणवत्तापूर्ण काजू उत्पादनानंतर अपेडाच्या माध्यमातून काजू निर्यातीमध्ये वाढ करावी. काजू मंडळावर तज्ज्ञ व्यक्ती तसेच सरव्यवस्थापकाची विहित पद्धतीचा अवलंब करून नेमणूक करण्यात यावी, असेही रावल यांनी या वेळी सांगितले.

### पणनमंत्री म्हणाले...

- शेतमाल बाजारभावाच्या लिलावाच्या माहितीसाठी बाजार समित्यांमध्ये स्क्रीन लावा
- कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात अतिक्रमण होणार नाही याबाबत दक्षता घ्या
- पणनच्या सुरू असलेल्या प्रकल्पांना विभागीय अधिकाऱ्यांनी वारंवार भेटी द्याव्यात
- देशांतर्गत बाजार समित्या एकत्रितपणे जोडणाऱ्या ई-नाम प्रणालीने शेतकऱ्यांना फायदा
- बाजार समित्यांनी विकासासाठी उत्पन्न स्रोत वाढविण्यावर भर द्यावा
- काजू फळपीक विकास योजनेंतर्गत एक हजार मेट्रिक टन क्षमतेचे गोदाम उभारा
- अंमलबजावणीसाठी प्रकल्प सल्लागार नेमणुकीची कार्यवाही करा

My Pune Edition
Feb 06, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# तळेगाव दाभाडेत आंतरराष्ट्रीय फुलबाजार वेगाने उभारा

## पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या अधिकाऱ्यांना सूचना; पणन मंडळाच्या ५० एकर जागेवर शंभर कोटींचा प्रकल्प

## फुले, कटफ्लॉवर्सच्या देशांतर्गत व्यापार व निर्यातीचे होणार हब

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**तळेगाव दाभाडे येथे आंतरराष्ट्रीय फुलबाजार निर्माण करण्याची कार्यवाही वेगाने करावी. शेतकऱ्यांना अधिकाधिक लाभ मिळेल, यादृष्टीने कृषी पणन मंडळाच्या योजना प्रभावीपणे राबवाव्यात, अशा महत्त्वपूर्ण सूचना राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी बुधवारी (दि. ५) दिल्या आहेत. जुन्या पुणे-मुंबई हायवेलगत पणन मंडळाच्या ५० एकर जागेवर उभारण्यात येणारा सुमारे शंभर कोटी रुपयांहून अधिक रकमेचा हा अत्याधुनिक प्रकल्प फुले व कटफ्लॉवर्सच्या देशांतर्गत व्यापाराबरोबरच निर्यातीचे हब ठरणार आहे.**



जयकुमार रावल

### प्रकल्पासाठी अपेडाकडून ७५ कोटींचे अनुदान अपेक्षित

केंद्र सरकारच्या अपेडा संस्थेकडून आंतरराष्ट्रीय फुलबाजाराच्या उभारणीसाठी ७५ टक्के अनुदानाने रक्कम मिळविण्यात येत आहे; जेणेकरून पणन मंडळावरील प्रकल्पाचा खर्च कमी होईल. याशिवाय केंद्र व राज्य सरकारच्या अन्य योजनांमधून विविध सुविधांसाठीही निधीची जमवाजमव करण्याचे नियोजन आहे. या ठिकाणी अद्ययावत ऑनलाइन शेतमाल लिलावगृह असेल. फुलांचे पॅकिंग, ग्रेडिंग, सॉर्टिंग, प्री-कूलिंग, कोल्ड स्टोअरेज, विमानतळापर्यंत शेतमाल नेण्यासाठी रेफर व्हॅनसह अन्य सुविधा पुरविण्यात येतील. खरेदीदार व्यापारी, निर्यातदार, प्रक्रियादार यांनाही निर्यातीसाठीच्या सुविधा देण्यात येणार असल्याची माहिती बैठकीनंतर चौकशी करता सूत्रांनी सांगितले.

राज्य कृषी पणन मंडळाच्या संचालक मंडळाची बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. ५) पार पडली, त्या वेळी त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. कृषी उत्पन्न बाजार समित्या अधिक सक्षम करण्यासाठी पणन सुविधा बळकट करणे आवश्यक आहे. आगामी काळात पणन मंडळाने शेतकऱ्यांच्या व्यापक हितासाठी यावर भर द्यावा, तसेच शेतकऱ्यांची गैरसोय होणार नाही व कृषिमालाचे होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचनाही रावल यांनी दिल्या.

कृषी पणन मंडळाच्या ताब्यातील जागेचा पुरेपूर उपयोग झाला पाहिजे. कृषी पणन मंडळात प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करावी. कामकाजात पारदर्शकता राहील, याकरिता विहित पद्धतीचा अवलंब करून कार्यवाही करावी. त्याकरिता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासोबतच तज्ज्ञ सल्लागाराची मदत घ्यावी. प्रलंबित कामांबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचनाही रावल यांनी दिल्या.

दरम्यान, मावळ तालुक्यातील तळेगाव दाभाडे येथे एमआयडीसी फ्लोरिकल्चर पार्कमध्ये पणन मंडळाच्या जागेत यापूर्वीच कटफ्लॉवर्स व्यापारासाठी कोल्ड स्टोअरेज, पॅकिंग हाऊससारख्या सुविधा निर्यातदारांना गेली दहा वर्षे दिल्या जात आहेत. त्यातील बरीचशी फुले ही मुंबईत विक्री केली जातात. मात्र, अत्याधुनिक सुविधांनी परिपूर्ण असा हा प्रकल्प आंतरराष्ट्रीय दर्जाचा करण्यात येणार आहे. पणन मंडळाच्या यापूर्वीच्या बैठकीत त्याच्या सविस्तर प्रकल्प अहवालाचे (डीपीआर) सादरीकरण करण्यात येऊन त्यावर शिक्कामोर्तब झालेले आहे.

पश्चिम महाराष्ट्रासह अहिल्यानगर, नाशिक येथे फुलशेती चांगली असून, या आंतरराष्ट्रीय बाजारामुळे ऑनलाइन व्यापार, देशांतर्गत व निर्यातीस मोठा वाव राहील. त्यानुसार आढावा घेतल्यानंतर पणनमंत्र्यांनी हा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्याची माहिती बैठकीनंतर सूत्रांकडून मिळाली.

Pune Gramin Edition
Feb 06, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# अर्थसंकल्पातील 'मिशन कडधान्य'

**अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पाची सुरुवातच शेती हे विकासाचे पहिले इंजिन आहे, या वाक्याने केल्यामुळे कृषी क्षेत्रासाठी मोठ्या योजना मांडल्या जातील, अशी अपेक्षा निर्माण झाली. मोठ्या घोषणा झाल्या नसल्या, तरी कृषी अर्थव्यवस्थेशी निगडित काही वेगळे कार्यक्रम निश्चित जाहीर झाले आहेत. सहा वर्षांच्या कालावधीसाठी कडधान्य मिशन आणि पंचवार्षिक स्वरूपाचे कपास अभियान, या दोन कार्यक्रमांची घोषणा करण्यात आली, हे निश्चितच स्वागतार्ह आहे.**

**- श्रीकांत कुवळेकर**

अर्थाचा 'अर्थ'

कडधान्य कार्यक्रमांतर्गत सहा वर्षांत यापैकी तूर, मूग आणि मसूर या तीन डाळींचे देशांतर्गत उत्पादन वाढवून त्यात आत्मनिर्भर होणे, असे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. अर्थात, कडधान्यांच्या बाबतीत असे काही होणे अपेक्षितच होते. कारण, मागील वर्षभर तरी तूर, उडीद, मसूर, मूग आणि चणा या पाच कडधान्यांच्या किमती विक्रमी पातळीवर पोहोचल्याने केंद्र सरकार अनेकदा टीकेचे धनी झाले होते. जगात क्रमांक एकचा कडधान्य उत्पादक आणि उपभोक्ता असलेला भारत पाच-सहा वर्षांनंतर परत एकदा क्रमांक एकचा आयातदार झाला होता.

वार्षिक २७० लाख टन खप असणाऱ्या देशाचे कडधान्य उत्पादन २३५ लाख टनांच्या आसपास घसरले होते. त्यामुळे २०१६ नंतर प्रथमच देशावर ५० लाख टनांपेक्षा जास्त कडधान्य आयात करण्याची नामुष्की आली होती. यात उडीद, तूर आणि मसूर चढ्या किमतीने आयात करावे लागल्यामुळे यावर्षी आयात बिल सुमारे ३०,००० कोटी रुपयांवर जाणार आहे. म्हणजेच, एवढ्या मोठ्या प्रमाणात परकीय चलन देशाला गमवावे लागणार आहे. ही परिस्थिती सुधारण्यासाठी कडधान्य आत्मनिर्भरतेला प्राथमिकता देण्यात आली आहे, हे सांगायला अर्थतज्ज्ञाची आवश्यकता नाही.

थोडे इतिहासात डोकावले तर लक्षात येईल की, कडधान्य स्वयंपूर्णतेचा हा कार्यक्रम आज पहिल्यांदाच सुरू केलेला नाही. मागील १२ वर्षांत किमान तीन वेळा असे प्रयत्न केले गेले. त्यासाठी केंद्रपरस्कृत राष्ट्रीय अन्नसुरक्षा मिशन, राज्य सरकारतर्फे राबवण्यात येणारी राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि खेड्यात चालवलेले एकात्मिक डाळ उत्पादन अभियान यासारख्या योजना अर्थसंकल्पामधूनच मांडल्या गेल्या. त्याचे तात्कालिक परिणाम काही प्रमाणात दिसले तरी त्याचे पुढे काय झाले, याबाबत निश्चित माहिती किंवा डेटा उपलब्ध नाही. परंतु, यावेळचे मिशन अधिक निग्रही आहे आणि त्यामुळे ते बऱ्यापैकी यशस्वी होऊन पुढील दोन वर्षांत, म्हणजेच सलग चार कृषी हंगाम संपेपर्यंत आपण निदान ९० टक्के स्वयंपूर्णता गाठलेली असेल, असे मानायला हरकत नाही. याला तशीच कारणेदेखील आहेत. यापूर्वीचे कार्यक्रम आणि यावेळच्या अभियानात एक मोठा फरक म्हणजे पूर्वीच्या कार्यक्रमात उत्पादनवाढ हे एकच सूत्र स्वीकारले गेले होते. त्याला अनुसरून जेव्हा उत्पादन वाढ झाली तेव्हा ते उत्पादन विकण्यासाठी कुठल्याही प्रकारचा सरकारी हस्तक्षेप न झाल्यामुळे किमती हमीभावाच्याही खाली घसरल्या आणि पुढील हंगामात शेतकऱ्यांनी कडधान्याचे क्षेत्र घटवले. परिणामी, दर दोन वर्षांनी कमी-अधिक प्रमाणात डाळींची टंचाई होतच राहिली. मात्र, मागील १५ महिन्यांत डाळींच्या महागाईने केंद्राला अक्षरश: रडवले असल्याने यावेळी सरकार मिशन मोडमध्ये आले आहे.

या योजनेत शाश्वतता येण्यासाठी केंद्राने शेतकऱ्यांनी पिकवलेली सर्व कडधान्ये पुढील निदान चार वर्षे सरकारी एजन्सीजद्वारे संपूर्ण खरेदीची हमी दिली आहे. त्यामुळेच या योजनेला घवघवीत नाही, तरी बऱ्यापैकी यश मिळेल. घवघवीत यश न मिळण्याचे कारणही तसेच आहे. कारण, ज्यावेळी देशांतर्गत कडधान्य उत्पादन मागणीच्या ८५ टक्के पातळीच्या पुढे सरकू लागते तसतसे कडधान्यांच्या किमती जोरात घसरू लागतात. अनेकदा त्या हमीभावाच्या २५-३० टक्के खाली जातात. कारण, अशावेळी म्यानमार, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, रशियासह अनेक आफ्रिकन देश, जे विविध कडधान्ये केवळ भारतीय बाजारपेठेसाठीच पिकवतात, ते किमती खूप खाली आणतात आणि भारतात डंपिंग करतात. असे करण्याचे कारण म्हणजे, भारत आणि काही अंशी चीन व पाकिस्तान सोडले तर त्या त्या देशांत कडधान्ये हे पशुखाद्य म्हणूनच जास्त वापरले जाते. त्यामुळे मिळेल त्या किमतीत ते भारतात डंपिंग करतात. परंतु, त्यामुळे येथील किमती घसरून शेतकऱ्यांचे अमाप नुकसान होते. जर केंद्राने डाळींचे आयात-निर्यात धोरण खुले केले आणि कडधान्य बाजारावरील इतर नियंत्रणे उठवली, तर शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा अधिक भाव मिळून उत्पादनातील वाढ अधिक शाश्वत, सातत्यपूर्ण राहील. याचा अनुभव आपण अनेकदा घेतला आहे.

केंद्राने एक लक्षात घेण्याची गरज आहे, ते म्हणजे भारतीय शेतकऱ्यांना कसे पिकवायचे याचे धडे न देता फक्त चांगला भाव जरी दिला तरी ते देशाला उत्पादन वाढवून देतात. हे आपण अनेकदा अनुभवले आहे. शेवटी ''भाव भगवान छे'' ही गुजराती म्हण कृषी क्षेत्रालाही तंतोतंत लागू ठरते आणि हा चांगला भाव मिळावा म्हणून पर्यायी बाजारपेठा विकसित करण्यावर भर देणारा कार्यक्रम सहा वर्षांच्या कडधान्य मिशनला समांतरपणे आखणे तेवढेच महत्त्वाचे आहे.

यामध्ये ई-नाम, ओएनडीसी आणि वायदे बाजार हेही आले. त्यामुळे स्पर्धात्मक बाजार निर्माण होऊन उत्पादकाला चांगली किंमत मिळेल आणि हे मिशन खरेखुरे यशस्वी झाले असे म्हणता येईल. म्हणजे देश डाळींचा केवळ पहिल्या क्रमांकाचा उत्पादक, उपभोक्ता न राहता तो मोठा निर्यातदार म्हणून नावारूपाला येईल. या व्यापारी फायद्याबरोबरच बाय प्रॉडक्ट म्हणून लोकसंख्येच्या प्रोटिन कमतरतेचा प्रश्न सोडवण्यासदेखील मदत होईल. कारण, कडधान्ये ही प्रोटिनचा सर्वात स्वस्त, सर्वांना परवडणारा स्रोत आहेत, असे म्हटले जाते.

Ahilyanagar Edition
Feb 04, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

गांवकरी
www.gavakari.net
04 Feb 2025 - Page 11

# मिलेट महोत्सवाचा शानदार समारोप

**नाशिक : प्रतिनिधी**

पौष्टिक तृणधान्यांचे महत्त्व, शाश्वत शेती आणि अन्न सुरक्षेवर भर दिला जाणाऱ्या मिलेट महोत्सवाला शेतकरी, उद्योजक आणि आरोग्यप्रेमी नागरिकांचा लाभलेला उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेता येणारी सदृढ पिढी निर्माण करण्याच्या दृष्टीने अशाप्रकारचे मिलेट महोत्सव नियमितपणे होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मिलेट महोत्सवाचे अध्यक्ष तथा मविप्रचे सरचिटणीस नितीन ठाकरे यांनी केले.

कृषी पणन मंडळाच्या नाशिक विभागीय कार्यालयामार्फत गंगापूर रोडवरील मविप्रच्या उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालयात आयोजित 'मिलेट महोत्सव-२०२५'च्या समारोपाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी ड. ठाकरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांसाठी आयोजित मिलेट रॅलीत सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.



तीन दिवसांपासून सुरु असलेल्या या महोत्सवात तब्बल १५ लाखांची आर्थिक उलाढाल झाल्याची माहिती आयोजकांनी दिली. मिलेटपासून तयार केलेली नावीन्यपूर्ण उत्पादने, तज्ज्ञ मार्गदर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रम यामुळे हा महोत्सव विशेष ठरला.

कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक एस. वाय. पुरी यांनी सहभागाची स्मृतीचिन्हे वितरित केली. कार्यक्रमाच्या शेवटी विभागीय व्यवस्थापक बी. सी. देशमुख यांनी आभार मानले.

या प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनामध्ये हेमंत अत्तरदे, सचिन पाटील, नारायण टापसे, वृषाली गोडसे, विशाल पाटोळे, महेश वसईकर, सनी काटे, धनराज देशटवार आणि सचिन उगले यांनी मोलाचा वाटा उचलला. त्यांच्या उत्कृष्ट व्यवस्थापनामुळे हा महोत्सव यशस्वीपणे पार पडल्याचे आयोजकांनी सांगितले.

**१५ लाखांची उलाढाल**

महोत्सवामध्ये तृणधान्यापासून तयार करण्यात आलेल्या विविध खाद्यपदार्थांचे ३० स्टॉल्स उभारण्यात आलेले होते. यात नाशिकसह, सोलापूर, जळगाव, सातारा, नांदेड, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, धुळे, पुणे जिल्हयातील विविध समूह व बचतगट सहभागी झाले होते. ग्राहकांना ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर या तृणधान्यांसह यापासून तयार करण्यात आलेले ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली मिक्स, भाकरवडी, शेवया, नुडल्स, आईस्क्रिम, खाकरे, शेव, चिवडा, रागीचा डोसा मिक्स इत्यादी नावीण्यपूर्ण अशी उत्पादने थेट उत्पादकांकडून खरेदी करण्याची संधी प्राप्त झाली. अशाप्रकारे दि. ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी या तीन दिवसांत तब्बल १५ लाखांची उलाढाल झाल्याची माहिती आयोजकांनी यांनी दिली.

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
04 Feb 2025 - Page 2 city

# मिलेट महोत्सव नियमित व्हावा

## समारोपप्रसंगी अ‍ॅड. नितीन ठाकरे यांचे प्रतिपादन

**नाशिक । प्रतिनिधी**

पौष्टिक तृणधान्यांचे महत्त्व, शाश्वत शेती आणि अन्नसुरक्षेवर भर दिला जाणाऱ्या मिलेट महोत्सवाला शेतकरी, उद्योजक आणि आरोग्यप्रेमी नागरिकांचा लाभलेला उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेता येणारी सदृढ पिढी निर्माण करण्याच्या दृष्टीने अशा प्रकारचे मिलेट महोत्सव नियमितपणे होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मिलेट महोत्सवाचे अध्यक्ष तथा मविप्रचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे यांनी केले.




कृषी पणन मंडळाच्या नाशिक विभागीय कार्यालयामार्फत गंगापूर रोडवरील मविप्रच्या उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालयात आयोजित 'मिलेट महोत्सव-२०२५'च्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अ‍ॅड. ठाकरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांसाठी आयोजित मिलेट रॅलीत सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. तीन दिवसांपासून सुरु असलेल्या या महोत्सवात तब्बल १५ लाखांची आर्थिक उलाढाल झाल्याची माहिती आयोजकांनी दिली. मिलेटपासून तयार केलेली नावीन्यपूर्ण उत्पादने, तज्ज्ञ मार्गदर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रम यामुळे हा महोत्सव विशेष ठरला.

कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक एस. वाय. पुरी यांनी सहभागाची स्मृतिचिन्हे वितरित केली. कार्यक्रमाच्या शेवटी विभागीय व्यवस्थापक बी. सी. देशमुख यांनी आभार मानले.

या प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनामध्ये हेमंत अत्तरदे, सचिन पाटील, नारायण टापसे, वृषाली गोडसे, विशाल पाटोळे, महेश वसईकर, सनी काटे, धनराज देशटवार आणि सचिन उगले यांनी मोलाचा वाटा उचलला. त्यांच्या उत्कृष्ट व्यवस्थापनामुळे हा महोत्सव यशस्वीपणे पार पडल्याचे आयोजकांनी सांगितले.

### १५ लाखांची उलाढाल

महोत्सवामध्ये तृणधान्यापासून तयार करण्यात आलेल्या विविध खाद्यपदार्थांचे ३० स्टॉल्स उभारण्यात आलेले होते. यात नाशिकसह, सोलापूर, जळगाव, सातारा, नांदेड, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, धुळे, पुणे जिल्ह्यातील विविध समूह व बचतगट सहभागी झाले होते. ग्राहकांना ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर या तृणधान्यांसह यापासून तयार करण्यात आलेले ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली मिक्स, भाकरवडी, शेवया, नुडल्स, आईस्क्रिम, खाकरे, शेव, चिवडा, रागीचा डोसा मिक्स इत्यादी नावीन्यपूर्ण अशी उत्पादने थेट उत्पादकांकडून खरेदी करण्याची संधी प्राप्त झाली. अशाप्रकारे तीन दिवसांत तब्बल १५ लाखांची उलाढाल झाल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# कृषी क्षेत्राला दिशा देणारा केंद्रीय अर्थसंकल्प

२०२५-२६ या वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प नुकताच सादर झाला. तशी एकंदरीतच गेल्या काही वर्षांपासून अर्थसंकल्पाबाबत काहीशी उदासीनता निर्माण झालेली दिसते. त्यामानाने यावेळी या वर्षाच्या अर्थसंकल्पात व्यक्तिगत करदरात केलेले बदल व १२ लाख रुपये उत्पन्न असणाऱ्यांसाठी करमुक्तीच्या निर्णयामुळे मध्यमवर्ग सुखावला आहे. अर्थसंकल्पाबाबत उदासीनतेचे एक कारण म्हणजे, भारतीय अर्थव्यवस्थेत येणारी सर्वसाधारण स्थिरता. अशा स्थिरतेत अर्थव्यवस्था ही प्रगतिशील असते व ओघात निर्माण होणाऱ्या समस्यांनुसार अपेक्षित बदल सामावून घेणारी असते. त्यामुळे फार मूलभूत व कठोर अशा निर्णयांची गरज नसते. सरकारही आपले धोरण आर्थिक प्रश्नाकडून समाजकल्याणाकडे वळवू शकते. भारतीय अर्थव्यवस्थेच्या



कृषिवार्ता
अनिल जवळेकर

स्थिरतेकडे होत असलेल्या या वाटचालीचे श्रेय निश्चितच सध्याच्या सरकारला द्यावे लागेल. गेल्या दहा वर्षांतील धोरणांचा तो परिपाक म्हणता येईल. याचाच अर्थ भारतीय अर्थव्यवस्थेला अस्थिर करणाऱ्या घटना घडत नाहीत, असा अजिबात नाही. तशा घटना होत असतात. कधी जाणीवपूर्वक राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय पातळीवर त्या पद्धतशीरपणे घडविल्याही जातात. तसेच, या स्थिरतेचा अर्थ भारतीय अर्थव्यवस्थेसमोर कोणतेच प्रश्न नाहीत, असाही नाही. बेरोजगारीची व कृषी उत्पादन-उत्पादकतेची समस्या जशी आहे, तशीच महागाईही डोके वर काढतच असते. कृषी विकासाचा लाभार्थी सामान्य शेतकरी होत नाही, हेही लक्षात ठेवावे लागते. शिवाय, आंतरराष्ट्रीय राजकीय-आर्थिक परिस्थितीचा प्रभाव भारतीय अर्थव्यवस्थेवर पडतच असतो व त्याचा परिणाम म्हणून अर्थव्यवस्थेची स्थिरता धोक्यात येऊ शकते. अशा वेळी नवीन अर्थसंकल्प विकासाची दिशा व अर्थव्यवस्थेची स्थिरता कायम ठेवून प्रश्नांना कसे सामोरे जात आहे, ते पाहणे देखील तितकेच महत्त्वाचे असते.

**यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात कृषी आणि ग्रामीण विकासाला सर्वाधिक महत्त्व देण्यात आले असून स्वयंपूर्ण शेती, सिंचन सुधारणा, वित्तपुरवठा सुलभता आणि पायाभूत सुविधा विकास यांवर दिलेला भर उपयुक्त ठरेल. अर्थात, या योजनांची यशस्वी अंमलबजावणी झाली, तर भारतातील शेती अधिक सक्षम, आधुनिक आणि किफायतशीर होईल, यात वाद नाही.**



या लेखात अर्थसंकल्पातील कृषी क्षेत्राबाबत तरतुदींचा विचार केला आहे.

### भारतीय कृषी व शेतकऱ्यांच्या समस्या

२०२४-२५ वर्षाचे आर्थिक सर्वेक्षण भारतीय कृषी क्षेत्राबाबत तसे उत्साहवर्धकच सांगते. २०१६-१७ ते २०२२-२३ या काळात कृषी विकासदर साधारणपणे पाच टक्के राहिला आहे, ही बाब उल्लेखनीय म्हणावी लागेल. याच काळात 'कोविड' महामारी येऊन गेली व त्या काळात मजबुतीने आधारभूत राहिलेले क्षेत्र म्हणजे कृषी! २०२३-२४ वर्षात कृषीचा विकासदर कमी झाला असला, तरीही सरत्या वर्षाच्या (२०२४-२५) दुसऱ्या तिमाहीमध्ये तो ३.५ टक्के राहिला आहे. त्यामुळे कृषी विकासाचे चित्र आशादायक आहे. कृषी उत्पन्नाचा विचार केला, तर तेही गेल्या दहा वर्षांत ५.२ टक्के वाढले आहे. कृषी समस्यांचा विचार केला, तर हे लक्षात येते की, भारतीय कृषी पिकांची उत्पादकता इतर देशाच्या तुलनेत खूप कमी आहे व तीच वाढवण्याची आज नितांत गरज आहे. कृषी क्षेत्राचा देशाच्या सकल उत्पन्नातील वाटा १६ टक्के असला, तरी रोजगार पुरवण्यात हा वाटा ४६ टक्के आहे. म्हणजे निश्चितच कृषीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या कमी होणे गरजेचे आहे. तसेच, आर्थिक सर्वेक्षण अन्नधान्य मुख्यत्वे गहू व तांदूळ यांच्या वाढत्या उत्पादनाचा उल्लेख करून डाळी, तेलबिया वगैरेंची उत्पादनवाढ आवश्यक असल्याचे सांगते. महिलांचा कृषी व ग्रामीण विकासातील सहभाग वाढत आहे व त्यांच्याही समस्या आहेत. त्यामुळे प्रक्रिया उद्योगावर भर देणे आवश्यक आहे. सहकारिता कृषी व्यवस्थेचा पाया राहिला आहे व तोही मजबूत करण्याची गरज आहे.

### कृषी व केंद्रीय अर्थसंकल्प

अर्थमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पात विकासाचे 'पहिले इंजिन' म्हणून कृषी क्षेत्राचे महत्त्व अधोरेखित केले आहे. कृषीची उत्पादकता व आत्मनिर्भरता वाढवणे, कृषी उत्पादनात वैविध्य आणणे, शाश्वततेकडे कृषी विकास नेणे व ग्रामीण भागात रोजगार व उत्पन्नवाढीच्या संधी निर्माण करणे, असा धोरणात्मक विचार या अर्थसंकल्पात आहे. सध्या अमलात असलेल्या योजना 'राष्ट्रीय विकास योजना', 'नैसर्गिक कृषी व कृषिनोत्ती' (मुख्यत्वे तेलबीया उत्पादन वाढ), सिंचन योजना, पीकविमा योजना, किसान सन्मान, किसान मानधन, व्याज सवलत वा किंमत हमीसारख्या अनेक योजना चालूच राहणार आहेत व त्या कृषी विकासात आपला वाटा उचलत आहेत. काही नवीन उपक्रम या अर्थसंकल्पात घोषित करणात आले आहेत.

- **'प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजना'**: ही योजना सुरुवातीला १०० जिल्ह्यांत राबवली जाणार आहे व त्यामध्ये शेतकऱ्यांना आधुनिक कृषी पद्धतींचा लाभ देण्यासाठी पंचायतस्तरावर गोदाम सुविधा निर्माण, सिंचन व्यवस्था आणि शेतीसाठी वित्तपुरवठा सुधारणा वगैरे उपक्रम असणार आहेत. ही योजना सुमारे १.७ कोटी शेतकऱ्यांना लाभ देईल, अशी अपेक्षा आहे.
- **डाळींचे उत्पादन वाढवण्यासाठी आत्मनिर्भरता मिशन** : भारत सध्यातरी डाळींची आयात करून आपली गरज भागवतो. त्यामुळे डाळींच्या उत्पादनात आत्मनिर्भरता येणे महत्त्वाचे आहे. यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तूर, उडीद, मसूर उत्पादन वाढवण्यासाठी सुधारित बियाणे, उत्पादन साठवणूक आणि सरकारी खरेदी हमी या बाबी या उपक्रमात महत्त्वाच्या आहेत.
- **भाज्या व फळांसाठी सर्वसमावेशक योजना** : फळे आणि भाजीपाला उत्पादन वाढवण्यासाठी ही उपाययोजना आहे. 'एफपीओ' आणि सहकारी संस्थांचा यात साहाय्यक असतील.
- **'राष्ट्रीय मिशन ऑन हायब्रीडसीड्स'**: यासाठी बजेट तरतूद : १०० कोटी केली आहे. उच्च उत्पादनक्षम आणि हवामान-संवेदनशील बियाण्यांचे संशोधन आणि प्रसार यात मुख्य असणार आहे.
- **'प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना'** (PMMSY) : यासाठी अर्थसंकल्पात २,४६५ कोटींची तरतूद आहे. मत्स्य उत्पादन वाढवून निर्यातीला चालना देण्यासाठी ही उपाययोजना म्हणता येईल.
- **कृषी वित्तपुरवठा आणि अनुदान योजना** : 'किसान क्रेडिट कार्ड (KCC)' मर्यादेचा विस्तार करण्यात येणार आहे. व्याज सवलतीसाठीची कर्जमर्यादा तीन लाखांवरून पाच लाखांपर्यंत वाढवण्यात आली आहे. ७.७ कोटी शेतकरी, मच्छीमार आणि दुग्धव्यावसायिक लाभार्थी असणार आहेत.
- **ग्रामीण समृद्धी आणि स्थैर्य कार्यक्रम** : ग्रामीण भागातील रोजगारनिर्मिती. महिला, युवक, लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी उपक्रम सुरू करणे वगैरे यात अपेक्षित आहेत.
- **'प्रधानमंत्री अन्नदाता आय संरक्षण योजना'** : या योजनेसाठी अर्थसंकल्पात ६ हजार, ९४१ कोटी रुपयांची तरतूद केली गेली आहे. खरेदी किंमत हमी आणि सरकारी खरेदीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न यात आहे.
- बिहारसाठी 'मखाना बोर्ड'ची स्थापना करण्यात येणार आहे. हा बोर्ड मखाना उत्पादन, प्रक्रिया, पुरवठा साखळी अशा सर्वच बाबतीत प्रयत्न करणार आहे. बिहारचे शेतकरी याचे मुख्य लाभार्थी असतील.
- कापूस उत्पादकांसाठी उपक्रमही घोषित केला आहे, ज्यात कापसाची उत्पादकता वाढवणे महत्त्वाचे असेल.

एकूणच या अर्थसंकल्पाचा कृषी आणि ग्रामीण विकासावर अपेक्षित परिणाम होणार आहे. कृषी विकासात येऊ शकणारे अडथळे दूर करण्याचे प्रयत्न महत्त्वाचे ठरणार आहेत. पर्यावरणबदलाने प्रभावित शेतकऱ्यांना मदत करणे यात सर्वात महत्त्वाचे आहे. यात शेतकऱ्यांना 'किसान सन्मान निधी'द्वारे प्रत्यक्ष मदत करत असताना पर्यावरणबदलांना सामोरे जाण्यासाठी नवीन बी-बियांणांचा विकास व प्रसार उपयुक्त ठरणार आहे. त्यादृष्टीने या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. आत्मनिर्भरतेसाठी डाळी उत्पादन वाढवण्याबरोबरच डाळी उत्पादन खरेदीची हमी देणे व त्याची व्यवस्था करणे आवश्यकच होते, तेही या अर्थसंकल्पात उल्लेखित आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, कृषी उत्पादनात वैविध्य आणण्याचे प्रयत्न भविष्य काळात दिशा देणारे ठरतील. हरितक्रांतीनंतर गहू व तांदूळ याच पिकांवर प्रामुख्याने भर देण्यात आला होता व त्यांच्या हमी किमतीवरची खरेदी व्यवस्था महत्त्वाची होऊन बसली होती. तीच आता त्रासदायक ठरताना दिसते. पंजाबचा शेतकरी सध्यातरी या पिकांसाठीच्या हमी किमतीसाठी कायदेशीर तरतुदीची मागणी करत आहे व त्यासाठी आंदोलनाचा मार्ग पत्करला आहे. कदाचित कृषी उत्पादनात पिकांची वैविध्यता येण्यास आता तरी सुरवात होईल, ही अपेक्षा करायला हरकत नाही. ◆◆

aniljavalekar@gmail.com

Agrowon, 03/02/2025

# बारामती बाजार समितीत रेशीम कोषास झळाळी

## प्रति किलोस मिळाला ७७० रुपये उच्चांकी भाव : ४४५ किलोची आवक

**बारामती :** बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रेशीम बाजारामध्ये गुरुवारी (ता. ३०) रेशीम कोषास प्रति किलोस ७७० असा उच्चांकी बाजार मिळाला. बाजारात ४४५ किलो रेशीम कोषाची आवक झाली. या वेळी किमान ४५० रुपये आणि सरासरी ७२० प्रतिकिलो दर निघाले. चंद्रकांत दत्तू गुळुमकर (रा. साबळेवाडी, ता. बारामती) यांच्या कोषास प्रतिकिलोस ७७० रुपये दर मिळाला. त्यांना एक लाख ७८ हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले.

रेशीम कोष उत्पादक शेतकऱ्यांनी आपला कोष विक्रीस आणताना ग्रेडिंग व स्वच्छ करून आणावा, म्हणजे कोषास जादा दर मिळेल. तसेच शेतकऱ्यांनी परस्पर बाहेरील व्यापाऱ्यांना कोष विक्री करू नये. आपला कोष रेशीम कोष बारामती बाजारातच विक्री करावा. बारामती रेशीम कोष बाजारामध्ये ई-नाम प्रणाली सुरू असल्याने चांगली विक्री व्यवस्था आहे. त्यामुळे इतर व बाहेरील राज्यातील बाजारांप्रमाणे दर मिळत आहेत. बारामती बाजार समितीतर्फे शेतकरी व रिलर्स यांना संबंधित सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असे आवाहन बाजार समितीचे सभापती विश्वास आटोळे व उपसभापती रामचंद्र खलाटे यांनी केले आहे.



### दीड कोटी रुपयांची उलाढाल

बारामती बाजार समितीमध्ये रेशीम कोष खरेदी विक्री ई- नाम प्रणालीद्वारे सुरू असून, डिंसेबर २०२४ व जानेवारी २०२५ या दोन महिन्यात ३०७ शेतकऱ्यांचा २६ टन कोष विक्री झाला असून, दीड कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. पुणे जिल्ह्यात तुती लागवड दिवसेंदिवस वाढत आहे. बारामती रेशीम मार्केटमध्ये ऑनलाइन लिलाव व पारदर्शक व्यवहार, अचूक वजन यामुळे शेतकरी कोष घेऊन येत आहेत, अशी माहिती सचिव अरविंद जगताप यांनी दिली.

> **शासनामार्फत बारामती मुख्य यार्डमध्ये रेशीम कोष बाजार व कोषोत्तर प्रक्रिया, प्रशिक्षण इमारतीचे बांधकाम सुरू असून त्या ठिकाणी शेतकरी व व्यापाऱ्यांना सर्व सुविधा उपलब्ध होणार आहेत. बारामती हे भविष्यात रेशीम कोष उत्पादक व रिलर्स करिता एक भव्य बाजारपेठ होणार आहे.**
> **- महेंद्र ढवळे, उपसंचालक, रेशीम संचालनालय, नागपूर**

रेशीम संचालनालयाचे उपसंचालक महेंद्र ढवळे यांनी शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सुविधांची माहिती दिली. त्यांच्या समस्या व अडचणी समजावून घेतल्या व अडचणी सोडविण्याचे आश्वासन दिले.

यावेळी प्रादेशिक रेशीम कार्यालयाच्या सहाय्यक संचालक डॉ. कविता देशपांडे, जिल्हा रेशीम विकास अधिकारी संजय फुले, अहिल्यानगरचे रेशीम विकास अधिकारी संदीर आगवणे, तसेच बारामती बाजार समितीचे सूर्यकांत मोरे, सोमनाथ जगताप उपस्थित होते.

Sakal, 01/02/2025

# तृणधान्य विक्रीसाठी शासन करणार प्रयत्न

## कृषिमंत्री ॲड. कोकाटे : मिलेट महोत्सवाचे उद्‌घाटन

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. ३१ : तृणधान्याचे महत्त्व अधिक लोकाभिमुख होण्यासाठी व शेतकऱ्यांना कायमस्वरूपी विक्री व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येतील, असे प्रतिपादन कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी केले.

कृषी पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयातर्फे गंगापूर रोडवरील मविप्र शिक्षण संस्थेच्या उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालयात 'मिलेट महोत्सव-२०२५' आयोजित करण्यात आला आहे. त्याचे उद्घाटन कृषी मंत्र्याच्या हस्ते शुक्रवारी (ता. ३१) झाले. या वेळी राज्य कृषी पणन मंडळ पुण्याचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, नाशिकचे उपसरव्यवस्थापक एस. वाय. पुरी, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. डी. भाकरे, मिसेस इंडिया इंटरनॅशनल डॉ. शुभदा जगदाळे, प्राचार्य विलास देशमुख उपस्थित होते. ग्राहकांना ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर ही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारे पदार्थ तसेच ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, भाकरवडी, शेवया, नुडल्स, आइस्क्रीम, खाकरे, शेव, चिवडा, रागीचा डोसा मिक्स इत्यादी नावीन्यपूर्ण अशी उत्पादने थेट उत्पादकांकडून प्रदर्शन तसेच विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. याबरोबरच मिलेट उत्पादन, मूल्यवर्धित प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व याविषयी नामांकित तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, चर्चासत्र, प्रश्नमंजूषा, अनुभव कथन असे कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत.



**नाशिक** : 'मिलेट महोत्सव-२०२५'चे उद्घाटन करताना कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे.

महोत्सव रविवार (ता.२) पर्यंत नागरिकांसाठी खुला असणार आहे. या ठिकाणी तृणधान्यापासून तयार करण्यात आलेल्या विविध खाद्यपदार्थांचे ३० स्टॉल्स उभारण्यात आलेले आहेत. यात नाशिकसह, सोलापूर, जळगाव, सातारा, नांदेड, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, धुळे, पुणे जिल्ह्यातील समूह सहभागी झाले आहेत.

पुण्य नगरी

# तृणधान्याचे महत्त्व लोकाभिमुख होण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करणार

## ना. ॲड. माणिकराव कोकाटे : 'मिलेट महोत्सव-२०२५

**नाशिक** : तृणधान्यांमधील पोषणमूल्यांमुळे त्यांचे आहारातील आरोग्यविषयक महत्त्व अनन्यसाधारण आहे. हे लक्षात घेऊन नागरिकांनी दैनंदिन आहारात तृणधान्यांचा समावेश वाढविणे आवश्यक आहे. तृणधान्याचे महत्व अधिक लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर प्रयत्न करण्यात येतील, असे प्रतिपादन कृषिमंत्री ॲड.माणिकराव कोकाटे यांनी केले.




कृषी पणन मंडळाचे विभागीय कार्यालय नाशिकच्या वतीने उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालय गंगापूर रोड, नाशिक येथे आयोजित 'मिलेट महोत्सव-२०२५' या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणेचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे ,कृषी पणन मंडळ विभागीय कार्यालय नाशिकचे उपसरव्यवस्थापक एस. वाय. पुरी, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. डी. भाकरे, मिसेस इंडिया इंटरनॅशनल डॉ. शुभदा जगदाळे, प्राचार्य विलास देशमुख यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

ना. कोकाटे म्हणाले की, आहारात पौष्टिक तृणधान्याची व्याप्ती वाढवून येणारी सुदृढ पिढी निर्माण करण्यासाठी कृषी व पणन विभागाशी संलग्न सर्व विभागांना सर्वतोपरी प्रयत्न करावे लागणार आहेत. देशातील ५० टक्के नागरिक हे शेती व्यवसायाशी संबंधित असून, शेतीमध्ये अनेक आमूलाग्र बदल होताना दिसत आहेत. शेतीतील नवनवीन प्रयोगांच्या माध्यमातून नवीन वाण, पीकपद्धती विकसित होत आहेत. या शेती उत्पादनांना त्यांच्या गाव, तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी विक्री व्यवस्था व बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी पणन मंत्र्यांसमवेत चर्चा करून शासनस्तरावर प्रयत्न करणार असल्याचेही ॲड. कोकाटे यांनी सांगितले. मिलेट महोत्सवासोबत कृषी प्रदर्शने जिल्ह्यासोबतच तालुका व गाव पातळीवर व्हावीत; तसेच या प्रदर्शनांची नागरिकांमध्ये माहिती होण्यासाठी जनजागृती करावी, असेही त्यांनी सांगितले.

■ या मिलेट मोहोत्सवात तृणधान्यापासून तयार करण्यात आलेल्या विविध खाद्यपदार्थांचे ३० स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. यात नाशिकसह, सोलापूर, जळगाव, सातारा, नांदेड, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, धुळे, पुणे जिल्ह्यातील समूह सहभागी झाले आहेत. ग्राहकांना ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर ही तृणधान्ये व त्यापासून तयार करण्यात येणारे पदार्थ तसेच ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, भाकरवडी, शेवया, नुडल्स, आइस्क्रीम, खाकरा, शेव, चिवडा, रागीचा डोसा मिक्स आदी नावीन्यपूर्ण उत्पादने थेट उत्पादकांकडून प्रदर्शन व विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# तृणधान्यांचे महत्त्व लोकाभिमुख होणे गरजेचे

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

तृणधान्यांमधील पोषणमूल्यांमुळे त्यांचे आहारातील आरोग्यविषयक महत्त्व अनन्यसाधारण आहे. हे लक्षात घेऊन नागरिकांनी दैनंदिन आहारात तृणधान्यांचा समावेश वाढविणे आवश्यक आहे. तृणधान्याचे महत्त्व अधिक लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने तसेच जिल्हा व तालुकास्तरावर तृणधान्य उत्पादक शेतकऱ्यांना कायमस्वरूपी विक्री व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येतील, असे प्रतिपादन कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी केले.

गंगापूर रोडवरील उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालय येथे कृषी पणन मंडळाच्या नाशिक विभागीय कार्यालयाच्या वतीने आयोजित तीन दिवसीय मिलेट महोत्सव-२०२५ चे उद्घाटन मंत्री कोकाटे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, कृषी पणन मंडळ विभागीय कार्यालय उपसरव्यवस्थापक एस. वाय. पुरी, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. डी. भाकरे, मिसेस इंडिया इंटरनॅशनल डॉ. शुभदा जगदाळे, प्राचार्य विलास देशमुख उपस्थित होते.

या प्रदर्शनांची नागरिकांमध्ये माहिती होण्यासाठी जनजागृती करावी, असे आवाहनही मंत्री कोकाटे यांनी केले.



**नाशिक : मिलेट महोत्सवात स्टॉलधारकांशी संवाद साधताना कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे**

## स्टॉलधारकांशी साधला संवाद

मंत्री कोकाटे यांनी तृणधान्य महोत्सवाच्या निमित्ताने तृणधान्यांपासून तयार करण्यात आलेल्या खाद्यपदार्थांच्या स्टॉलला भेट देत स्टॉलधारकांशी संवाद साधला. हा महोत्सव २ फेब्रुवारीपर्यंत नाशिककरांसाठी सुरू असणार आहे. या ठिकाणी तृणधान्यापासून तयार करण्यात आलेल्या विविध खाद्यपदार्थांचे ३० स्टॉल उभारलेले आहेत.

शब्दांना सत्याची धार
प्रहार

# तृणधान्य विक्री व्यवस्थेसाठी प्रयत्न : कृषिमंत्री कोकाटे

## मविप्र उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालयात मिलेट महोत्सवाचे उद्घाटन

**◆ नाशिक (प्रतिनिधी):**

तृणधान्यांमधील पोषणमुल्यांमुळे त्यांचे आहारातील आरोग्यविषयक महत्व अनन्यसाधारण आहे. हे लक्षात घेवून नागरिकांनी दैनंदिन आहारात तृणधान्यांचा समावेश वाढविणे आवश्यक आहे. तृणधान्याचे महत्व अधिक लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने तसेच जिल्हा व तालुकास्तरावर तृणधान्य उत्पादक शेतकऱ्यांना कायमस्वरूपी विक्री व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीन शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येतील, असे प्रतिपादन कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी केले.



कृषी पणन मंडळाचे विभागीय कार्यालय, नाशिक यांच्यामार्फत गंगापूर रोडवरील मविप्रच्या उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालयात आयोजित 'मिलेट महोत्सव-२०२५' कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणेचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, कृषी पणन मंडळ विभागीय कार्यालय नाशिकचे उपसरव्यवस्थापक एस. वाय. पुरी, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. डी. भाकरे, मिसेस इंडिया इंटरनॅशनल डॉ. शुभदा जगदाळे, प्राचार्य विलास देशमुख यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

कृषी मंत्री ॲड. कोकाटे म्हणाले की, आहारात पौष्टिक तृणधान्याची व्याप्ती वाढवून येणारी सदृढ पिढी निर्माण करण्यासाठी कृषी व पणन विभागाशी सलग्न सर्व विभागांना सर्वोतोपरी प्रयत्न करावे लागणार आहेत. देशातील ५० टक्के नागरिक हे शेती व्यवसायाशी संबंधित असून, शेतीमध्ये अनेक आमूलाग्र बदल होताना दिसत आहेत. शेतीतील नवनवीन प्रयोगांच्या माध्यमातून नवीन वाण आणि पीकपद्धती विकसित होत आहेत. या शेती उत्पादितांना त्यांच्या गाव, तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी विक्री व्यवस्था व बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी पणन मंत्री यांच्यासमवेत चर्चा करून शासनस्तरावर प्रयत्न करणार असल्याचे कृषी मंत्री ॲड. कोकाटे यांनी सांगितले. तसेच मिलेट महोत्सवासोबत जी कृषी प्रदर्शने जिल्ह्यासोबतच तालुका व गाव पातळीवर व्हावीत. तसेच या प्रदर्शनांची नागरिकांमध्ये माहिती होण्यासाठी जनजागृती करावी, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी महर्षि उदाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास त्यांनी माल्यार्पण केले. तत्पूर्वी, कृषी मंत्री ॲड. कोकाटे यांनी तृणधान्य महोत्सवाच्या निमित्ताने तृणधान्यांपासून तयार करण्यात आलेल्या खाद्यपदार्थांच्या स्टॉलला भेट देत स्टॉल धारकांना संवाद साधला. यावेळी उपसरव्यवस्थापक श्री. पुरी व प्राचार्य डॉ.भाकरे यांनी मनोगत व्यक्त केले. 'मिलेट महोत्सव-२०२५' २ फेब्रुवारीपर्यंत नागरिकांसाठी सुरू असणार आहे. या ठिकाणी तृणधान्यापासून तयार करण्यात आलेल्या विविध खाद्यपदार्थांचे ३० स्टॉल्स उभारण्यात आलेले आहेत. यात नाशिकसह, सोलापूर, जळगाव, सातारा, नांदेड, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, धुळे, पुणे जिल्ह्यातील समूह सहभागी झाले आहेत. ग्राहकांना ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर ही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारे पदार्थ तसेच ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, बाकरवडी, शेवया, नूडल्स, आईस्क्रिम, खाकरे, शेव, चिवडा, रागीचा डोसा मिक्स इत्यादी नावीण्यपूर्ण अशी उत्पादने थेट उत्पादकांकडून प्रदर्शन तसेच विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. याबरोबरच मिलेट उत्पादन, मूल्यवर्धित प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्व याविषयी नामांकित तज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, चर्चासत्र, प्रश्नमंजुषा, अनुभव कथन असे कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत.